



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २९ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# मफलर तर फक्त निमित्त, मागे 'बडा चेहरा'-आ.पवार



## अजितदादांच्या अपघातावरून रोहित पवारांचा मोठा दावा; 10 ऑक्टोबरला पुराव्यांसह 'त्या' चेह-याचा पर्दाफाश करणार

**पुणे/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत अनेक वेळा पत्रकार परिषदा घेतल्या. आमदार रोहित पवार यांनी हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय सातत्याने व्यक्त केला असून या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी अनेकदा केली आहे. त्यानंतर आज पुन्हा एकदा रोहित पवारांनी पत्रकार परिषदेत बोलताना भुवया उंचावणारी वक्तव्ये केली आहेत.

रोहित पवार म्हणाले, अजित दादांच्या घटनेची एक महत्त्वाची प्रेस कान्फरन्स मी घेणार होतो, कारण दादांना जाउन आठ महिने झाले. सरकार हातावर हात ठेवून बसलेला आहे. कुठंच सरकारकडून, सीआयडीकडून कुठंच काही तिथं तपास होत नाही. सगळं थंडावले असं या सरकारला तिथं वाटतं आणि सगळ्यांना असं वाटतं की लोकं विसरून गेले. अजित दादांना लोकं विसरणार नाहीत. जेव्हा जेव्हा लोकांत आम्ही जातो, तेव्हा ते लोकं, शेतकरी, मजूर आम्हाला सांगतात, 'आज जर अजित दादा असते, तर सरकारकडून जो काही विलंब केला जातो तो झाला नसता. लगेचच्या लगेच मदतसुद्धा जाहीर झाली असती.' कारण दादांना लोकांची अडचण समजून घेण्याची एक वेगळी ताकद होती. ते त्या गोष्टी समजून घ्यायचे, ते लोकांत ते गेले असते आणि लगेच निर्णय प्रशासनावर दाब आणून तो त्यांनी तिथं घेतला असता. पण दुर्दैवाने दादा नसल्यामुळे सामान्य शेतक-याचा, मजुराचा आणि लोकांचा, या महाराष्ट्राचा खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेला आहे.

पुढे रोहित पवारांनी म्हटलं की, आता याच्यात सरकारला आणि सरकारमध्ये असणारे काही पावरफुल लोकं आहेत त्यांना जर वाटत असेल की, आम्ही शांत बसलोय, तर असं नाही. मफलर हे फक्त कारण. मफलरच्या मागे एक चेहरा आहे आणि त्या चेह-याचं नाव हे येणा-या १० तारखेला म्हणजे शनिवारी, १० ऑक्टोबरला शनिवारी १० ते ११ वाजता मुंबईमध्ये प्रेस कॉन्फरन्स घेउन ते आम्ही पर्दाफाश तिथं करणार म्हणजे करणार. १००ऽ प्रेझेंटेशन होणार. आता दुष्काळाची परिस्थिती असल्यामुळे आणि जे इलेक्शन कमिशनर बद्दलचे एक वातावरण या देशामध्ये आज निर्माण झालेलं आहे, त्याच्यामध्ये काही प्रोटेस्ट, आंदोलनं या देशामध्ये सुरू आहेत, त्यामुळे कुठंतरी दादांच्या विषयावर जे काही महत्त्वाचे मुद्दे आम्ही घेउन पुढे घेउन येणार आहोत, त्याकडे दुर्लक्ष होउ नये म्हणून आजची प्रेस कॉन्फरन्स ही १० तारखेला आपण पुढे नेलेली आहे.

पुढे रोहित पवार म्हणाले, एक तर हे मोठे जे दोन्ही नेते, हे दोन्ही तीन नावं तुम्ही घेतली, ( छगन भुजबळ, अरविंद केजरीवाल) त्यांचा या केसशी काही देणं-घेणं नाही. मफलर जो आहे, मफलरचे जे डिझाइन आहे, त्या डिझाइनचा मफलर एका कुठल्यातरी कार्यक्रमाला एका मोठ्या व्यक्तीने, नेत्याने जो घातला होता, त्याचं नाव हे आम्ही डिक्लेअर करणार आहोत. जी व्यक्ती अजित दादांच्या केसमध्ये जबाबदार असणारी जी कंपनी व्हीएसआर आणि व्हीएसआरला सांभाळणारं जे कोणी व्यक्ती आहे, त्या दोघांना कुठंतरी ही व्यक्ती, जी राजकीय मोठा नेता आहे, ते वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. ते कसं, पुराव्यासकट मी आपल्या सर्वांसमोर १० ऑक्टोबरला सकाळी १० ते ११ वाजता त्या ठिकाणी मी आणणार आहे. ➩(पान २ वर)

# ज्ञानेश कुमारांविरोधात काँग्रेसचे देशभरात आंदोलन






**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत देशातील विविध राज्यांमध्ये सोमवारी निदर्शने करण्यात आली. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, हरियाणा, छत्तीसगड आणि उत्तराखंडमध्ये काँग्रेस कार्यकर्ते निदर्शने करत आहेत.उत्तर प्रदेशातील आग्रा येथे काँग्रेस कार्यकर्त्यांनी ज्ञानेश कुमार यांच्या घरावर काळी शाई फासली आणि लिहिले ज्ञानेश कुमार गद्दार, मत चोर. राजस्थानच्या जयपूरमध्ये शहीद स्मारक येथे सभा झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढला. पोलिसांनी बॅरिकेडिंग करून काँग्रेस कार्यकर्त्यांना रोखले. पोलिसांनी माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि प्रदेश काँग्रेस अध्यक्ष गोविंद सिंह डोटासरा यांच्यासह कार्यकर्त्यांवर वाटर कॅननचा वापर केला.

लखनौमध्ये काँग्रेस कार्यकर्ते पोलिसांशी भिडले, काशीत महिला बांगड्या घेउन पोहोचल्या होत्या. वाराणसीत काँग्रेसच्या आंदोलनादरम्यान महिला कार्यकर्त्यांनी बांगड्या घेउन आंदोलन केले. मध्य प्रदेशात मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या विरोधात भोपाळमध्ये काँग्रेसचे आंदोलन सुरू आहे. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष जीतू पटवारी यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला घेराव घालण्यासाठी पोहोचले आहेत. यादरम्यान पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाली. काही कार्यकर्ते बॅरिकेड्सवरही चढले. बिहारमध्ये मतदार यादीतील कथित मतचोरी आणि लोकशाही अधिकारांशी केलेल्या छेडछाडीच्या निषेधार्थ काँग्रेसने आज देशभरात जिल्हास्तरावर आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे.बिहारमधील प्रत्येक जिल्ह्यातही काँग्रेस आक्रोश मार्च काढत आहे. पाटणा महानगर काँग्रेस समितीने कदमकुआं येथून आक्रोश मार्च काढण्यात आला. छत्तीसगडमधील दुर्गमध्ये काळे कपडे घालून काँग्रेसची रॅली काढण्यात आली दुर्ग आणि रायगडमध्ये काँग्रेस कलेक्टरेटला घेराव घालण्यासाठी रॅली निघाली होती.हरियाणा काँग्रेस आज मतचोरीच्या आरोपावरून आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी संपूर्ण प्रदेशात आंदोलन करत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये डीसी कार्यालयांसमोर होणा-या आंदोलनासाठी पक्षाने वेगवेगळ्या नेत्यांची नियुक्ती केली आहे. उत्तराखंडमधील ८ जिल्ह्यांत मतचोरीविरोधात काँग्रेसचे आंदोलन सुरू आहे. डेहराडून, नैनीताल, हल्द्वानी, टिहरी, बागेश्वर, रुडकी, रुद्रपूर, उत्तरकाशी आणि पिथौरागढ येथे काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरून विरोध प्रदर्शन करत होते.

# SIR हटाओ, देश बचाओ... ज्ञानेश कुमारांची प्रतिकात्मक धिंड

## ठाण्यात जितेंद्र आव्हाडांसह राष्ट्रवादीचा संताप




**ठाणे/प्रतिनिधी :** एसआयआरसह नवमतदार नोंदणीसाठीच्या फार्ममधील तरतुदी बदलण्याच्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयावर दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी तब्बल १४ वेळा आक्षेप नोंदवूनही ज्ञानेशकुमार यांनी हुकूमशाही पद्धत राबविली आहे. हा लोकशाहीचा खून असल्याचा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत ठाण्यात मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेशकुमार यांची प्रतिकात्मक गाढवावरून ➩(पान २ वर)

# मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात काँग्रेसचे राज्यभर आंदोलन

**पुणे/प्रतिनिधी :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आणि निवडणूक आयोगाच्या एकूणच कारभारावर गंभीर आक्षेप घेत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने आज राज्यभर आक्रमक



आंदोलन पुकारण्यात आले आहे. ज्ञानेश कुमार यांना त्यांच्या पदावरून तत्काळ हटवण्याची मागणी या वेळी होत आहे.गेल्या काही दिवसांपासून ईव्हीएम, मतदार याद्यांमधील कथित गोंधळ आणि निवडणूक आयोगाच्या एकतर्फी वाटणा-या भूमिकेवरून विरोधी पक्षांनी सातत्याने रान उठवले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही नुकतीच ➩(पान २ वर)

# यायचे असेल तर आमच्यात या-शरद पवार

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाबत विविध प्रकारच्या चर्चा सुरू असतात, अशा कोणत्याही चर्चेला काही अर्थ नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात भक्कमपणे काम करत आहे. ज्याला कोणाला यायचे आहे, त्यांनी आमच्यात यावे. आम्ही कुणाच्या सहभागी होणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मांडली. दुष्काळ, एमपीएससीतील घोटाळा, एसआयआर प्रक्रियेतील वादाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सोमवारी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे राज्य कार्यकारणीची बैठक झाली. या कार्यकारणीच्या बैठकीत प्रामुख्याने दुष्काळ आणि पक्ष संघटनेवर प्रामुख्याने भर देण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या बाबत अनेक चर्चा माध्यमांमध्ये रंगतात असतात, अशा कोणत्याही चर्चेला काहीच अर्थ नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मोठ्या ताकदीने राज्यभरात काम करत आहे, त्यामुळे आमच्या बाबत कोणत्याही प्रकारची चर्चा करू नका. ज्याला कुणाला यायचे ➩(पान २ वर)



चव्हाण सेंटर येथे राज्य कार्यकारणीची बैठक

# तृणमूल काँग्रेस पक्षाचे नाव आणि चिन्ह कोणाचे?

## न्यायालयाचे निवडणूक आयोगाला 4 महिन्यांत निकाल देण्याचे निर्देश!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत फुटीनंतर पक्षाचे नाव आणि मूळ पक्षचिन्ह गोठवण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. या प्रकरणी सोमवारी सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला पक्षनाव आणि चिन्हाबाबतचा हा विवाद चार महिन्यांच्या आत सोडवण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या संदर्भातील वृत्त द इंडियन एक्सप्रेस या वृत्तसंस्थेने दिले आहे.




न्यायालयाने दोन्ही गटांना आपापले म्हणणे मांडण्यासाठी चार आठवड्यांची मुदत दिली आहे. त्यानंतर पुढील तीन महिन्यांत निवडणूक आयोगाने यावर अंतिम निर्णय घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे एकंदरीत आगामी चार महिन्यांत तृणमूल काँग्रेसच्या मूळ चिन्हाचा निर्णय लागणार आहे. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगाच्या अंतरिम निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. पक्षात अंतर्गत बंडखोरी झाल्यानंतर निवडणूक आयोगाने ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसः -८२१७; हे नाव आणि पक्षाचे अधिकृत चिन्ह जोडाफूल (फूल आणि गवत) वापरण्यास अंतरिम स्थगिती दिली होती. निवडणूक आयोगाने १८ सप्टेंबर रोजी तृणमूल काँग्रेसचे नाव आणि चिन्ह गोठवण्याचे आदेश दिले होते. पक्षातील ममता बॅनर्जी गट आणि अरुप राय यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर गट, या दोन्ही गटांना विवाद मिटेपर्यंत नवीन नाव आणि चिन्ह वापरण्याचे निर्देश देण्यात आले होते. विशेष म्हणजे, पोटनिवडणुकीची घोषणा झाल्यानंतर अवघ्या १० दिवसांत हा निर्णय आला होता. सध्या ममता बॅनर्जी यांचा गट फुटबालर या चिन्हावर, तर बंडखोर गट पाकीट या चिन्हावर ही निवडणूक लढवत आहे. ➩(पान २ वर)

# सोने 3,160 रूपयांनी स्वस्त; चांदीही 10 हजारांनी घसरली

**जळगाव / प्रतिनिधी-** आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोन्याच्या दरात घसरण पाहायला मिळत आहे. आज २८ सप्टेंबर रोजी दिल्लीमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर १,५२,८२० रुपये प्रति १० ग्रॅम इतका आहे. गेल्या आठवडाभरात देशातील वेगवेगळ्या शहरांमध्ये २४ कॅरेट सोन्याच्या दरात तब्बल ३,१६० रुपयांपर्यंत घट झाली आहे. त्याचबरोबर २२ कॅरेट सोन्याचा दरही सुमारे २,९०० रुपयांनी कमी झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोन्याच्या दरात घसरण दिसून येत आहे. सध्या स्पॉट गोल्डचा दर ४,२८२.९८ डालर प्रति औंस आहे. गेल्या एका आठवड्यात आंतरराष्ट्रीय बाजारातील सोन्याचा भाव २.१ टक्क्यांनी घसरला आहे. सोन्याबरोबरच चांदीच्या दरातही घसरण सुरू आहे. २८ सप्टेंबरला चांदीचा दर २,४४,९०० रुपये प्रति किलो इतका झाला आहे. गेल्या एका आठवड्यात चांदीच्या दरात तब्बल १० हजार रुपयांची घट झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात स्पॉट सिल्व्हरचा दर सध्या ६४.२६ ➩(पान २ वर)



## ज्ञानेश कुमारांना मोठा दिलासा

# तातडीच्या सुनावणीस कोर्टाचा नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयोगाने घेतलेल्या काही निर्णयांबाबत तसेच प्रशासकीय प्रक्रियांबाबत दाखल करण्यात आलेल्या याचिकेची मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठासमोर तातडीने सूचीबद्ध करून सुनावणी घेण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु, ही मागणी न्यायालयाने फेटाळून लावली. याबाबत वकील असीम सरोदे यांनी पत्रकारांना माहिती दिली.



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात याचिका दाखल करण्यात आली आहे. ज्ञानेश कुमार यांनी घेतलेले निर्णय कायद्याच्या चौकटीत बसणार नाहीत. सोबतच्या दोन निवडणूक आयुक्तांशी चर्चा करून एकमताने निर्णय घेण्याऐवजी एकट्याने निर्णय घेण्याची नवीन प्रक्रिया त्यांनी सुरू केलेली आहे. ज्ञानेश कुमार यांनी घेतलेल्या सगळ्या निर्णयांची छाननी झाली पाहिजे. त्याची तपासणी आणि चौकशी झाली पाहिजे, न्यायालयाने त्याबाबतची सगळी कागदपत्रे मागवून घेतली पाहिजेत. त्यांनी घेतलेल्या निर्णयांना स्थगिती दिली पाहिजे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे, अशी माहिती वकील असीम सरोदे यांनी दिली.

ज्ञानेश कुमार यांच्यामागे कोण आहेत, ज्यांनी त्यांना अशा प्रकारे संविधानिक भ्रष्टाचार करण्याची परवानगी दिली, हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, असा आरोप वकील असीम सरोदे यांनी केला. तसेच केंद्रीय निवडणूक आयोगाने एसआयआरची जी प्रक्रिया राबवली, त्यात अनेक मतदारांची नावे काढून टाकण्यात आली आहेत, या प्रक्रियेला स्थगिती द्यावी, आधीचीच मतदार यादी पुनर्स्थापित करण्यात यावी. महाराष्ट्रात येउ घातलेल्या सर्व निवडणुकांना स्थगिती देण्यात यावी. नव्या 'चक्क' प्रक्रियेत तयार झालेल्या मतदार याद्यांचा वापर न करता, निवडणुका घेण्यात याव्यात, अशी महत्त्वाची मागणी करण्यात आलेली आहे. या प्रकरणी तातडीने सुनावणी घेण्याची ➩(पान २ वर)

# महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची केंद्र शासनाने घेतली गंभीर दखल

## केंद्रीय पथक महाराष्ट्रात पाहणी करणार | कृषिमंत्री चौहान वरिष्ठ अधिका-यांसह राज्याच्या दौ-यावर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राज्यातील परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून, वरिष्ठ अधिका-यांसह महाराष्ट्राचा दौरा करणार असल्याची माहिती केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली.नवी दिल्लीतील पुसा येथील भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृहात आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी संमेलन रब्बी अभियान २०२६ च्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय कृषी राज्यमंत्री



रामनाथ ठाकूर व भागीरथ चौधरी, केंद्रीय कृषी सचिव अतीश चंद्रा, भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. एम. एल. जाट यांच्यासह केंद्र व विविध राज्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश क्षेत्र दुष्काळाच्या विळख्यात असल्याचे नमूद करत चौहान यांनी केंद्र सरकार राज्यातील परिस्थितीबाबत गंभीर असल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्रासह कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीचे केंद्रीय पथक प्रत्यक्ष पाहणी करून आकलन करणार आहे. कर्नाटकात ३ ऑक्टोबर रोजी केंद्रीय पथक दाखल होणार असून, त्यानंतर महाराष्ट्रातही पथक पाठविण्यात येणार आहे. आपण स्वतः वरिष्ठ अधिका-यांसह या राज्यांचा दौरा करणार असल्याचे चौहान यांनी सांगितले.

**पाण्याचा ताळेबंद पाहूनच रब्बीचे नियोजन-** महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामातील पीक नियोजन उपलब्ध पाण्याच्या ताळेबंदावर आधारित असावे, असे चौहान यांनी स्पष्ट केले. प्रत्येक राज्य आणि जिल्ह्याने सिंचनासाठी उपलब्ध पाणी तसेच जमिनीतील ओलावा यांचे मूल्यमापन करून त्यानुसार पिकांची निवड करावी.पाणीटंचाई असलेल्या महाराष्ट्रातील भागांमध्ये कमी पाण्यात येणारी कडधान्ये आणि तेलबिया पिकांना प्राधान्य द्यावे. पुरेशी सिंचन सुविधा असलेल्या भागात उपलब्ध पाण्यानुसार अन्य पिकांचे नियोजन करावे. उपलब्ध पाण्यापेक्षा अधिक पाण्याची गरज असलेले पीक घेतल्यास नंतर पाणीटंचाईमुळे पीक संकटात येण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला.महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील दुष्काळी परिस्थितीचा संदर्भ देताना पाण्याची उपलब्धता, जमिनीतील ओलावा आणि त्यानुसार योग्य पीक यांचे नियोजन आधीच करणे आवश्यक असल्याचे चौहान यांनी सांगितले. पेरणीला विलंब झाल्यास उत्पादन आणि ➩(पान २ वर)



paper www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# वीरकृपा इंटरप्राईजेसची जीएसटी विभागाकडून तपासणी

## ■ तीन दिवसांपासून चौकशी सुरू
## ■ रेकॉर्ड आणि कॉम्प्युटर डेटा केला चेक

**अमरावती/प्रतिनिधीः-**स्थानिक चित्रा टॉकीज जवळ असलेल्या प्रसिद्ध वीरकृपा कॉस्मेटिक अँड परफ्युम वर्ल्ड या प्रतिष्ठानावर गेल्या तीन दिवसांपासून जीएसटी विभागाच्या




पथकाकडून तपासणी केली जात असल्याची माहिती समोर आली आहे.माहितीनुसार नागपूर वरून आलेल्या जीएसटी विभागाच्या टीमने ही कारवाई केली आहे. दुकानाचे शटर बंद ठेवून तपासणी गोपनीय पद्धतीने पुढे नेण्यात आली. सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार जीएसटी विभागाची ही कारवाई २५ सप्टेंबर पासून सुरू झाली असून सलग तीन दिवस चालली.या काळात प्रतिष्ठाना बाहेर सामान्य हालचाली मर्यादित होत्या. अधिकाऱ्यांच्या टीमने दुकानाच्या आतमध्ये राहून रेकॉर्डची तपासणी केली.

बिलापासून ते जीएसटीशी संबंधित सर्व रेकॉर्ड आणि कॉम्प्युटर मध्ये उपलब्ध असलेल्या व्यापारी डेटाची सखोल चौकशी केली.मात्र, तपासणीत नेमके काय समोर आले,हे विभागाकडून अधिकृत निष्कर्ष जाहीर झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

**कोट्यवधींच्या कराची चर्चा-**दरम्यान, सूत्रांनी सांगितले कि,प्रतिष्ठानच्या व्यवहारात कोट्यवधी रुपयांची कथित जीएसटी अनियमितता समोर आल्याची जोरदार चर्चा शहरात सुरू आहे. मात्र ही रक्कम नेमकी किती आहे, कोणत्या कालावधीतील व्यवहाराशी संबंधित आहे आणि प्रत्यक्षात काही कर अनियमितता आढळली आहे की नाही, याबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. विभागाने स्पष्ट केले आहे की, तपासणीत काही गडबड आढळल्यास पुढील कारवाई केली जाईल.तीन दिवस चाललेल्या या कारवाईमुळे अमरावतीच्या व्यापारी वर्गात खळबळ उडाली आहे.

# शिवसेना उबाठाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

## शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत दिल्या जाण्याची मांगणी

**अमरावती/प्रतिनिधीः-**शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची आर्थिक मदत देण्याचा प्रमुख मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने आज सोमवार २८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. खासदार अरविंद सावंत आणि आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात इर्विन चौक परिसरातून बैलबंडीसह मोर्चाला सुरुवात झाली. विविध मागण्यांचे फलक हातात घेत शेतकरी आणि कार्यकर्ते



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. पिकांचे नुकसान, पावसातील खंड आणि निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचा मुद्दा आंदोलन कर्त्यांनी उपस्थित केला.राज्य सरकारने दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केलेल्या घोषणेवरही आंदोलनकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. केवळ 'कोरडा दुष्काळ' जाहीर करून शेतकऱ्यांच्या पदरी प्रत्यक्ष आर्थिक मदत पडणार नसेल, तर या घोषणेचा उपयोग काय, असा सवाल यावेळी करण्यात आला. जिल्हाधिकारी दिलेल्या निवेदनात शेतकऱ्यांना तातडीने आणि थेट आर्थिक मदत मिळावी, सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, पीककर्जाची सरसकट कर्जमाफी करावी आणि दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे त्यांना आर्थिक सहायता द्यावी. मेळघाट मध्ये शंभर टक्के नापिकी असल्याने विशेष पॅकेज घोषित करावे. पूर्ण ट्रिगर लावून पीक विम्याची रक्कम त्वरित वितरित करा, ई पीक पाहणी सॅटेलाईट द्वारा करावी. यूपीआय पेमेंट वर लागणारा कर रद्द करा, विद्युत ग्राहकांना स्मार्ट मीटर काढून जुने मीटर लावून द्यावे यासह इतर मागण्या करण्यात आल्या. मोर्चा दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संदर्भातील सरकार विरोधी टीकात्मक फलक ही झळकले. विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. मोर्चामध्ये आमदार गजानन लवटे, किशोर ठाणेकर, सुधीर सूर्यवंशी, पराग गुडधे, मनोज कडू, प्रफुल भोजने सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या ३२ गोवंशाला जीवदान, ३ मृत

## -१७ लाखांचा लाखांचा मुद्देमाल जप्त, लालखडी मार्गावर गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-**अवैध गोवंश तस्करी करणाऱ्या विरोधात गुन्हे शाखा युनिट १ च्या पथकाने धडक कारवाई करत ३२ गोवंशाला जीवदान दिले तर तिघांचा मृत्यू झाला होता. आयशर ट्रक, एक मोबाईल फोन सह एकूण १७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी अब्दुल अजहर अब्दुल नजीर (वय ३०, रा. बिस्मिल्ला नगर) याला ताब्यात घेण्यात आले. तर मोहम्मद मुदस्सिर, मोहम्मद शफी (रा. लालखडी) आणि ट्रक चालक रशीद (रा. नागपूर) हे दोघे फरार आहेत. फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. माहितीनुसार सोमवार २८ सप्टेंबरच्या सकाळी रोजी गुन्हे शाखेच्या पथकाला पेट्रोलिंग दरम्यान गुप्त माहिती मिळाली की, लालखडी रोड, टॉवर लाईन, बाबा पॅलेसच्या पुढे असलेल्या एका मोकळ्या मैदानात विटकरी रंगाच्या आयशर ट्रक एमएच-४०-सीएम-३२३० मध्ये कत्तलीच्या उद्देशाने गोवंशाला कोंबून आणले आहे.माहितीची खातरजमा होताच पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी छापा टाकला. त्यावेळी दोन लोक ट्रकमधून गोवंशाला खाली उतरवत होते. पोलिसांनी तात्काळ महानगरपालिकेचे पशु वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाचारण केले.तपासा दरम्यान ट्रक मध्ये २८ गायी आणि ७ वासरे अत्यंत क्रूर आणि अमानवीय पद्धतीने एकाच छोट्या दोरीने चारा-पाणी न देता बांधून ठेवण्यात आले होते.पशु वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासणी नंतर ३ गोवंश मृत घोषित केले, तर उर्वरित ३२ जनावरे जखमी अवस्थेत आढळली. जनावरांच्या मालकी हक्का बाबत कोणतेही वैध कागदपत्र सादर न केल्याने सर्व ३२ जिवंत गोवंशांना देखभाल आणि संरक्षणासाठी दस्तुर नगर येथील गौरक्षण संस्थेत पाठवण्यात आले आहे. एका आरोपीला पोलिसांनी अटक केली.


## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)**
**चांदुर बाजार, जि. अमरावती,**

**आर.एम.जे.सी. ४५६/२०२६ ने. ता. २९/१०/२०२६**
अर्जदार :-१. कौसल्या किसनराव भानगे, **वय ८० वर्षे, व्यवसाय घरकाम**
२. चित्रा ज्ञानेश्वर बोरवार, **वय ४६ वर्ष, व्यवसाय घरकाम**
३. वंदना रामदास पारिसे, **वय ४४ वर्ष, व्यवसाय घरकाम**
४. गजानन किसनराव भानगे, **वय ४२ वर्ष व्यवसाय मजुरी**
**अर्जदार क्र. १, ३ व ४ रा. निंभोरा ता. चांदुर बाजार जि. अमरावती**
**अर्जदार क्र. २ रा. वार्ड नं. २, रेवसा, ता. भातकुली जि. अमरावती**
.......विरुध्द........ गैरअर्जदार :- निरंक
बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत **अर्जदार वरील ठीकाणी राहतात.** मृतक किसनराव कात्याजी भानगे **यांचा मृत्यु** दि. १९/०५/२०२६ **रोजी निंभोरा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे.**

**यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.नं. ४५६/२०२४ **नुसार अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**
**आज दि. २८/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार**
**सहायक अधिक्षक दिवाणी**
**व फौजदारी न्यायालय चांदूर बाजार**


## पान १ व १० वरून

### जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये

उच्च शिक्षण, शिक्षणाधिकारी प्राथमिक, माध्यमिक, तर शेतीवर आश्रित शेतकरी व मजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू न देण्याची जबाबदारी तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

अमरावती, भातकुली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदूर बाजार आणि दर्यापूर तालुक्याच्या यंत्रणांना जिल्हाधिकारी येरेकर यांनी सर्व संबंधित विभागांना परस्पर समन्वयाने काम करून उपाययोजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले आहेत.

### साधूच्या वेशातील भामट्यांने

रोजी दुपारी १:३० ते २:०० वाजताच्या सुमारास साधूच्या वेशात आलेल्या दोन भामट्यांनी त्यांच्या व्यावसायिक दुकानात प्रवेश केला. सुरुवातीला या भामट्यांनी अत्यंत नम्रपणे चहा पिण्याची इच्छा व्यक्त करून चहा पाजण्याची विनंती केली. जयस्वाल यांनी विश्वासाने त्यांना चहा पाजला. चहा घेत असतानाच या तथाकथित साधूंनी विविध धार्मिक गोष्टी, 'मोहिनी विद्या' आणि गप्पा मारून त्यांना पूर्णपणे जाळ्यात ओढले. जयस्वाल यांचे लक्ष विचलित झाले असल्याचे पाहून, भामट्यांनी हातचालाखी करत त्यांच्या हातातील सुमारे ३ लाख रुपये किमतीची हिऱ्याची अंगठी आणि ३,००० रुपयांची नगदी रोकड अत्यंत चाणाक्षपणे लंपास केली. साधू निघून गेल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे आणि हातातील हि-याची अंगठी व रोकड गायब असल्याचे जयस्वाल यांच्या लक्षात आले, त्यांनी तात्काळ पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दाखल केली आहे. धार्मिक वातावरणाचा फायदा घेऊन व्यापाऱ्याला अशा प्रकारे गंडवल्यामुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे व संतापाचे वातावरण पहायला मिळत आहे. पोलिसांनी हा प्रकार करणाऱ्याचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून केली जात आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### शेतकऱ्यांच्या बँकेला राजकारणासाठी

आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर कर्जप्रकरणाबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले. या आश्वासनानंतर संबंधितांनी उपोषण मागे घेतले.

**मग बँकेला लक्ष्य करण्याचे कारण काय?**

एका प्रकरणात ९आधीची कर्जबाकी निरंक करण्याची अट, दुसऱ्या प्रकरणात इतर बँकेच्या कर्जासाठी नो-ड्यूजची आवश्यकता आणि दोन प्रकरणे बँकेकडे अद्याप अप्राप्त- मग या कागदोपत्री वस्तुस्थितीला बाजूला ठेवून जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नावाने राजकीय धुरळा उडविण्याची गरज काय? बँकेने नावनिहाय आणि कागदोपत्री आपली भूमिका स्पष्ट केली आहे. शेतकऱ्यांची बँक ही राजकीय संघर्षाचे मैदान नसून शेतकरी सभासदांचा आर्थिक आधार आहे. त्यामुळे आरोपांपेक्षा कागदपत्रे काय सांगतात, हेच आता महत्त्वाचे आहे.

### विदर्भाच्या राजाची भव्य विसर्जन

मंदिराचे अध्यक्ष महेश साहू, सचिव विनोद डागा, माजी महापौर विलास इंगोले, नगरसेवक बबलू शेखावत, एड. प्रशांत देशपांडे आदी उपस्थित होते.

**मोसीकॉलमध्ये होणार विसर्जन-** मिरवणूक मार्गावर आकर्षक रांगोळीची सजावट करण्यात येणार असून, विसर्जनस्थळी मोसिकोल येथे सुमारे २ हजार ५०० भाविकांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली आहे. एलईडी स्क्रीनवर विसर्जन सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

### पिकांसाठी अप्पर वर्धा धरणातून

पाणीसाठा नियोजित पद्धतीने वापरणे अत्यंत गरजेचे आहे. या अनुषंगाने आमदार राजेश वानखडे यांनी जलसंपदा विभागाची आज बैठक घेऊन संपूर्ण सिंचनाच्या पाणीसाठ्याच्या नियोजनाची विस्तृत माहिती अधीक्षक अभियंता यांच्याकडून जाणून घेतली.

या बैठकीला आमदार राजेश वानखडे यांचे सह तिवसा विधानसभा संयोजक प्रदीप गौरखेडे,माजी तिवसा तालुकाप्रमुख भाजप निलेश श्रीखंडे , संजय देशमुख,अधीक्षक अभियंता अम पाटबंधारे विभाग राजभोज, कार्यकारी अभियंता मेटकर व कार्यकारी अभियंता उमप प्रामुख्याने उपस्थित होते.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या नियोजनासोबतच कालवे दुरुस्ती पाट-सऱ्यांची दुरुस्ती यांची कामे तातडीने हाती घेऊन उपलब्ध पाणीसाठा पूर्णतः शेतकऱ्यांच्या उपयोगी पडावा याचे काटेकोर नियोजन करून पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी अशा सूचना सुद्धा याप्रसंगी आमदार राजेश वानखडे यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

### दै.हिंदुस्थानचे संपादक उल्हास मराठे

विशेष ओळख होती. मराठे परिवारापुरतेच नव्हे, तर दै. हिंदुस्थानशी संबंधित अनेक कुटुंबांशी आणि परिचितांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जपले. सुख-दुःखाच्या प्रसंगी आपुलकीने धावून जाणाऱ्या ज्योतीताई अनेकांसाठी आधाराच्या व्यक्ती होत्या.

पत्रमहर्षी तथा दै. हिंदुस्थानचे संस्थापक स्व. बाळासाहेब मराठे यांच्या त्या स्नुषा होत. बाळासाहेब मराठे यांनी उभारलेल्या मूल्यनिष्ठ पत्रकारितेच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या परंपरेत त्यांनी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. दैनिक हिंदुस्थान परिवाराच्या प्रदीर्घ वाटचालीत पडद्यामागे राहून त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते.

ज्योती मराठे यांच्या निधनाने मराठे परिवारासह दैनिक हिंदुस्थान परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पती उल्हास मराठे, दीर डॉ. अनंत मराठे, मुले ॲड. रवींद्र मराठे व राहुल मराठे, पुतणे प्रमोद मराठे, डॉ. विनोद मराठे, दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, कार्यकारी व्यवस्थापक विवेक मराठे तसेच सुना स्नेहल व केतकी, नातवंडे ऋषिकेश, ऋग्वेद, तन्मय आणि अनय व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### अमरावती जिल्हा मजूर सहकारी

यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मजूर सहकारी संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी संघाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील, अशी भूमिका मांडली. सभासदांच्या समस्या शासनस्तरावर मांडून त्यांचे निराकरण करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. आमसभेला संघाचे पदाधिकारी, संचालक मंडळाचे सदस्य, विविध मजूर सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना

मांडली. राष्ट्रसंतांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव करण्यासाठी भारतरत्न देणे आवश्यक आहे. देशाच्या सामाजिक आणि ग्रामीण परिवर्तनासाठी राष्ट्रसंतांनी दिलेल्या योगदानाला राष्ट्रीय स्तरावर योग्य सन्मान मिळावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.यावेळी गुरुदेव भक्त प्रशांत कांबळे यांनी मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला. २६ जानेवारीच्या भारतरत्न पुरस्काराच्या यादीत राष्ट्रसंतांचे नाव नसल्यास २१ ऑक्टोबर रोजी गुरुकुंज मोझरी येथे राज्यातील सर्वात मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

### मफलर तर फक्त निमित्त,

अनेक लोकं मला विनंती करतायत की, तुम्ही तारीख सांगताय, मोठ्या व्यक्तीचं नाव तिथं तुम्ही घेणार आहात, तुम्ही तुमच्या प्रोटेक्शनबद्दल, तुम्ही तुमच्या सेफ्टीबद्दल काळजी घ्या. मला लोकांना सांगायचंय, काळजी करू नका. सेफ्टी लोकंच आमची घेतील. माझ्याबरोबरही काही लोकं तिथं असतात. पण जे काही आमच्याकडे प्रेझेंटेशन आहे, त्याच्या ब-याच कापी ब-याच ठिकाणी आम्ही ठेवलेल्या आहेत. त्यामुळे आपल्या जवळच्या व्यक्तीला न्याय देण्यासाठी आपला जीवसुद्धा जर धोक्यात असेल, तरी आपण न झुकता, न घाबरता आपल्याच व्यक्तीला न्याय देण्यासाठी प्रयत्न करणं ही आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे. जर जवळच्या व्यक्तीलाच आपण न्याय देउ शकत नसेल, तर उद्या जाउन गरिबाला, सामान्य लोकांना आपण न्याय कसा देणार आहोत? या भूमिकेत मी असल्यामुळे १० ऑक्टोबरला सकाळी १० ते ११ वाजता प्रेस कान्फरन्स होणार म्हणजे होणार आणि तिथं काही मुद्दे, काही पुरावे हे आम्ही तिथं आपल्या सर्वांसमोर आणल्याशिवाय राहणार नाही, असंही रोहित पवार म्हणालेत.

पुढे रोहित पवार म्हणाले, नाव मी घेणार आहे. पुराव्यासकट नाव घेणार आहे. त्यामुळे स्फोटक होउ शकतं. आता त्यात काय वेगळं राजकारण नाही. आम्ही ब-याच नेत्यांना वेळ दिला की तुम्ही काहीतरी प्रक्रिया फास्ट करा, तुम्ही अक्शन घ्या, सीबीआयकडे केस जावी यासाठी अजितदादांच्या पक्षाने एकदा पत्र दिलं, स्मरणपत्र दुस-यांना द्यावं लागलं. दादांनाच न्याय देउ शकत नसेल, तुमच्या नेत्यालाच तुम्ही न्याय देउ शकत नसता, तर विकासाचं काय? हे भजी तळायचे का? अशा परिस्थितीमध्ये आम्ही आमचा प्रयत्न तिथं सुरू आहे. त्यामुळे त्या दिवशीची पत्रकार परिषद ही तशीच छोटी असणार आहे. ती छोटी असली तरी ती महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे ते प्रेझेंटेशन झाल्यानंतरच आपल्या सर्वांना कळेल की वस्तुस्थिती काय आहे.

पुढच्या पत्रकार परिषदेबाबत रोहित पवार सांगताना म्हणाले, जेव्हा मी हे प्रेझेंटेशन करेन, ते बघितल्यानंतर तुमच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतील, ते तुम्ही मला सांगा. एखादी घटना घडत असताना ती एका विशिष्ट पद्धतीने प्लॅन केली गेली असेल, दादा गाडीने जाणार होते, मग त्यांना उशीर का झाला? त्याची कारणे दिली आहेत. ज्या विमानात ते बसले होते, त्या विमानात नक्की कोणत्या गोष्टी घडल्या, हे आम्ही कुठेना कुठे स्पष्टपणे सांगितले आहे. ब्लॅक बाक्स जळला असे भासवून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला जात होता आणि संबंधित व्यक्तीला वाचवायचे होते. परंतु आम्ही पुराव्यांसकट सांगितले की ब्लॅक बाक्सला काहीही झालेले नाही. ब्लॅक बाक्स सुरक्षित असल्याचे कळल्यानंतर त्याची चौकशी सुरू झाली आहे. आम्ही मागणी केली होती की तो कॅनडा किंवा यूएसला पाठवा, आणि दबावापोटी त्यांना तो पाठवावाच लागेल. एएआयबीचा चा रिपोर्ट यायला २-३ वर्षे लागतात. पण मुख्यमंत्री साहेबांना शब्द द्यावा लागला की अजित दादांच्या पुण्यतिथीच्या आधी हा रिपोर्ट येईल. त्यातील ब-याच गोष्टी माझ्याकडे आल्या आहेत, पण मी अधिकृत रिपोर्ट येण्याची वाट पाहत थांबलो आहे. १० तारखेचे प्रेझेंटेशन हे पूर्णपणे टेक्निकल (तांत्रिक) नसणार आहे. त्यात मी काही वेगळे मुद्दे मांडणार आहे, ज्यामुळे काही लोकांची वृत्ती आणि प्रवृत्ती कशी आहे हे समोर येईल. तांत्रिक प्रेझेंटेशन मी नंतर करेन, जेव्हा एएआयबीचा अधिकृत रिपोर्ट येईल. तो रिपोर्ट बरोबर आहे की चुकीचा, त्यात काय काय आणि कधी मॅनिपुलेशन केले गेले, कोणी कोणी केले, या सर्वांची माहिती मी नंतर मांडेन. पण १० तारखेच्या प्रेझेंटेशनमध्ये ती कंपनी, त्या कंपनीचे व्यवहार, त्यांना कोण-कोण सपोर्ट करतंय, कोण आणि कशा प्रकारे वाचवतंय, याचे सर्व पुरावे मी त्या दिवशी सादर करेन.

### SIR हटाओ, देश बचाओ...

प्रतिकात्मक धिंड काढण्यात आली. तर, सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी या दोघांचा गौरव करण्यात आला.

वर्तमानपत्राच्या माध्यमातून २३ सप्टेंबर रोजी माध्यमांमध्ये झालेला एका मोठ्या खुलाशातून गेल्या १० महिन्यांत निवडणूक आयोगाच्या अंतर्गत कारभारात सर्व काही ठीक चाललेले नाही. आयोगाच्या तीन सदस्यांपैकी दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयांवर तब्बल १४ वेळा लेखी स्वरूपात आपली तीव्र नाराजी आणि आक्षेप नोंदवल्याचं समोर आलं आहे. या खुलाशानंतर देशाच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून विरोधकांनी ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. आता, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष कार्यालय ते ठाणे महानगर पालिका मुख्यालयादरम्यान ज्ञानेशकुमार यांच्याविरोधात मोर्चा काढला. या मोर्चात ज्ञानेशकुमार यांची वेशभूषा केलेल्या इसमाला गाढवावर बसवून धिंड काढण्यात आली. गाढवाच्या गळ्यात, 'एक तडीपार चंद्रावर... ज्ञानेशकुमार गाढवावर' असा फलक लटकविण्यात आला होता. तर, दोन निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांची वेशभूषा केलेले दोन जण घोड्यावर स्वार झाले होते. लोकशाही वाचविण्यासाठी प्रयत्न करीत असल्याबद्दल त्यांच्या गळ्यात जितेंद्र आव्हाड आणि मनोज प्रधान यांनी पुष्पहार अर्पण केले. याप्रसंगी कार्यकर्त्यांकडून ज्ञानेश हटाव, निवडणूक आयोग बचाओ, राष्ट्रद्रोही राजीव और ज्ञानेश कुमार जुते मारो इनको चार, ज्ञानेश कुमारला अटक करा; लोकशाहीची हत्या थांबवा!; वोट चोर, गद्दी छोड, एसआयआर हटाओ देश बचाओ; ग्यानेश कुमार आहे चोर, मोदी-शहा चोरावर मोर, अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या आहेत. दरम्यान, एका इंग्रजी वृत्तपत्रातील बातमीनंतर ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध विरोधकांचा रोष वाढला असून काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तसेच, क?करोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनीही पुन्हा एकदा दिल्लीत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

### मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात

निवडणूक आयोगावर आणि भाजपवर सडकून टीका केली होती. याच पार्श्वभूमीवर, निवडणुका निष्पक्ष वातावरणात पार पडाव्यात आणि लोकशाहीचे रक्षण व्हावे, यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांनी तत्काळ राजीनामा द्यावा किंवा त्यांना केंद्र सरकारने पदावरून दूर करावे, अशी आग्रही मागणी काँग्रेसने या आंदोलनातून केली आहे.

**पुण्यातही जोरदार निदर्शने-** काँग्रेसच्या या राज्यव्यापी आंदोलनाचे तीव्र पडसाद पुण्यातही उमटत आहेत. पुणे शहर आणि जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज रस्त्यावर उतरून निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत कार्यकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. पुण्यासोबतच मुंबई, नागपूर, अशा अनेक प्रमुख शहरांमध्ये काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त कार्यालयांसमोर निदर्शने केली जात आहेत. या ठिकाणी प्रशासनाला मागण्यांचे निवेदन दिले जात असून, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीत सुधारणा न झाल्यास हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही काँग्रेस नेत्यांनी दिला आहे.

### यायचे असेल तर आमच्यात

आहे, त्यांनी आमच्या यावे, आम्ही कुठेही जाणार नाही, असा इशाराच पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला दिला.प्रसारमाध्यमातून सतत शरद पवार गट अजित पवार गटामध्ये किंवा काँग्रेसमध्ये विलीनीकरण होण्याची चर्चा रंगत असते, या चर्चेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी दिलेला इशारा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

**साहेबांचे टायमिंग सर्वांना ठाउक : तटकरे**

शरद पवारांच्या या वक्तव्यावर अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली. पवारांच्या राजकीय टायमिंगचा संदर्भ देत त्यांनी या वक्तव्यावर थेट भाष्य करणे टाळले. तटकरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले साहेबांचे टायमिंग संपूर्ण महाराष्ट्राला ठाउक आहे. अनेक प्रसंगी त्यांनी साधलेले टायमिंग अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. या विशिष्ट वेळी हे विधान करण्यामागचा त्यांचा नेमका काय हेतू असू शकतो, हे या क्षणी सांगणे कठीण आहे.

### तृणमूल काँग्रेस पक्षाचे नाव

**ममता बॅनर्जीचा न्यायालयात दावा काय?**

ममता बॅनर्जी यांनी दाखल केलेल्या याचिकेत निवडणूक आयोगाच्या या कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. ऋतव्रत बॅनर्जी यांनी २२ जून २०२६ रोजी दिलेले निवेदन चुकीचे व बिनबुडाचे असून त्यावर आधारित आयोगाची कारवाई बेकायदेशीर आहे, असा दावा त्यांनी केला आहे. निवडणूक जाहीर झाल्यानंतर अशा प्रकारे अंतरिम आदेश देउन मूळ चिन्ह गोठवणे म्हणजे लोकशाही तत्त्वांच्या विरोधात आहे. पोटनिवडणूक घोषित झाल्यानंतर मूळ स्थिती बदलणारा असा अंतरिम निर्णय निवडणूक आयोग घेउ शकतो का, हा महत्त्वाचा घटनात्मक प्रश्न या याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.

या याचिकेत ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोग तसेच पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते ऋतव्रत बॅनर्जी यांना प्रतिवादी केले आहे.

प्रतीक आदेश १९६८ अंतर्गत निर्णय होणारनिवडणूक आयोगाने दोन्ही गटांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर स्पष्ट केले होते की, या प्रकरणाची सखोल सुनावणी आवश्यक आहे. निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८ मधील तरतुदींनुसार यावर अंतिम निर्णय घेतला जाईल. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आयोगाला चार महिन्यांत हा गुंत सोडावा लागणार आहे.

### सोने 3,160 रूपयांनी स्वस्त;

डॉलर प्रति औंस आहे. मुंबईत २४ कॅरेट सोन्याचा दर १५,०१७ रु पये प्रति ग्रॅम आहे. तर २२ कॅरेट सोन्याचा दर १३,७६५ रु पये प्रति ग्रॅम आणि १८ कॅरेट सोन्याचा दर ११,२६३ रु पये प्रति ग्रॅम आहे. पुण्यातही सोन्याच्या दरात घसरणीचा परिणाम दिसत आहे. त्यामुळे सोने खरेदी करण्याचा विचार करणा-या ग्राहकांसाठी आजचे दर महत्त्वाचे ठरत आहेत. स्थानिक सराफ बाजारानुसार दरांमध्ये थोडा फरक असू शकतो.

सोन्या-चांदीच्या दरात चढ-उतार कायम राहण्याची शक्यता

कमोडिटी मार्केटमधील तज्ज्ञांच्या मते, सोन्या आणि चांदीच्या दरात चढ-उतार सुरू राहण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील आर्थिक आकडेवारी, पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि कच्च्या तेलाच्या किमती यांचा सोन्या-चांदीच्या दरांवर परिणाम होउ शकतो.

### ज्ञानेश कुमारांना मोठा दिलासा

मागणी आम्ही केली. परंतु, न्यायालयाच्या पूर्वव्यस्ततेमुळे त्यांनी लवकर तारीख देण्यात असमर्थता दर्शवली आहे. २२ ऑक्टोबर रोजी या प्रकरणाची सुनावणी होणार आहे, असे वकील असीम सरोदे यांनी सांगितले.

निवडणूक आयोगाच्या कायद्याचे उल्लंघन केले

निवडणूक आयोगाचे जे कायदे आहेत, त्यानुसार आयुक्तांनी काम करायला हवे. कायद्याची अक्षरे आणि त्याचा संदर्भ यानुसार काम केले पाहिजे. तसे त्यांनी केलेले नाही. निवडणूक आयोग कायद्यातील कलम १८ चे उल्लंघन करून निर्णय घेतला आहे. त्यामुळे लोकशाहीला बाधा निर्माण झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांनी तसे निर्णय कोणासाठी घेतले, त्यामागे राजकारण आहे का, कोणता राजकीय पक्ष आहे का, राजकीय नेते आहेत का, त्यांना निवडणूक जिंकून देण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांनी अशा प्रकारची प्रक्रिया राबवली का, असे सवाल करत वकील असीम सरोदे यांनी गंभीर आरोप केले. या सगळ्या प्रकाराबाबत चौकशी झाली पाहिजे आणि यासाठी ही याचिका महत्त्वाची ठरणार आहे, असे वकील असीम सरोदे म्हणाले.

न्यायालयाने काय म्हटले?

न्या. शर्मिला देशमुख आणि न्या. नीरज धोटे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाचा उल्लेख करण्यात आला. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, या प्रकरणात जीवन जगण्याचा व स्वातंत्र्याशी संबंधित तातडीचा मुद्दा नाही. तसेच न्यायालयाच्या व्यस्ततेचा विचार करून हे प्रकरण २२ ऑक्टोबर २०२६ रोजी घेण्यात येईल, असे न्यायालयाने सांगितले. याचिकेत भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली; मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार; निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू व विवेक जोशी; तसेच राज्य निवडणूक आयोग यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. ही याचिका प्रथमेश गोपाल गावकर, गौरव सूर्यकांत नाखरेकर, आदेश शशिकांत भाटकर आणि स्मिताली निलेश नार्वेकर यांनी दाखल केली असून, त्यांना वकील असीम सुहास सरोदे यांची कायदेशीर मदत करत आहेत.

### महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची

उत्पादनावर परिणाम होउ शकतो. त्यामुळे शेतक-यांनी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांची पूर्वतयारी करून वेळेत पेरणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

**महाराष्ट्रात कडधान्ये-तेलबियांचे क्षेत्र वाढविण्यावर भर**

धान कापणीनंतर रिकाम्या राहणा-या क्षेत्रात हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या कडधान्ये व तेलबिया पिकांची लागवड वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. कमी पाण्यात येणा-या या पिकांमुळे उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर होण्याबरोबरच देशाची कडधान्ये व खाद्यतेल क्षेत्रातील आत्मनिर्भरता वाढण्यास मदत होईल.राज्यांनी रब्बी हंगामातील कडधान्याखालील क्षेत्र आणि उत्पादनाचे निश्चित लक्ष्य ठरवावे तसेच शेतमालाच्या खात्रीशीर खरेदीची व्यवस्था आधीच तयार ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. राज्यांकडून वेळेत खरेदी न झाल्यास नाफेड आणि एनसीसीएफ या केंद्रीय संस्था थेट शेतक-यांकडून खरेदी करतील, असे चौहान यांनी स्पष्ट केले.

**बियाणे-खतांचा आगाउ आराखडा तयार करण्याच्या सूचना**

रब्बी हंगामासाठी बियाण्यांची मागणी, उचल आणि वितरणाचा आराखडा आगाउ तयार ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्रातील विविध हवामान पट्टे आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेउन योग्य वाणांची निवड व वेळेत उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला.कृषी विद्यापीठे, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतक-यांना योग्य वाण आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन देण्याचे आवाहन करण्यात आले.

**रब्बीतही 'खेत बचाओ' अभियान**

खतांचा संतुलित वापर करण्यासाठी खरीप हंगामात राबविण्यात आलेले खेत बचाओ अभियान रब्बीतही राबवावे, असे चौहान यांनी सांगितले. गरजेपेक्षा अधिक खतांचा वापर केल्याने उत्पादन खर्च वाढण्याबरोबरच जमिनीच्या आरोग्यावरही परिणाम होउ शकतो. त्यामुळे वैज्ञानिक शिफारशीनुसार खतांचा संतुलित वापर करण्यासाठी शेतक-यांमध्ये जनजागृती करावी, असे निर्देश देण्यात आले.

फार्मर आयडी, एग्रीस्टॅक आणि किसान क्रेडिट कार्डला गती

किसान क्रेडिट कार्डचे कव्हरेज वाढविण्यासोबतच फार्मर आयडी आणि एग्रीस्टॅकची अंमलबजावणी वेगाने पूर्ण करण्यावर केंद्राने भर दिला. डिजिटल पायाभूत सुविधांमुळे विविध योजनांचा लाभ थेट आणि अधिक प्रभावीपणे शेतक-यांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे चौहान यांनी सांगितले.

**दर आठवड्याला पीक परिस्थितीचा आढावा**

रब्बी हंगामात प्रत्येक राज्याने दर आठवड्याला पेरणीची प्रगती, उगवण, रोगांचा प्रादुर्भाव आणि बाजारभाव यांचा आढावा घ्यावा, असे निर्देश देण्यात आले. रिअल-टाइम माहितीच्या आधारे समस्या वेळीच ओळखून तातडीने उपाययोजना करण्यावर केंद्राचा भर आहे. दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी संमेलनाच्या दुस-या दिवशी, २९ सप्टेंबर रोजी सर्व राज्यांच्या कृषिमंत्र्यांसोबत केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर चर्चा होणार आहे. या चर्चेतून रब्बी हंगामासाठी समन्वित आणि परिणामाभिमुख कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## ज्ञानेशकुमार हटाव व 'वोट चोरी' साठी अटक करावी ; वाशिम जिल्हा काँग्रेसचे मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा काँग्रेस कमिटी कडून दि. २८ सप्टेंबर रोजी धरणे आंदोलन व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. संपूर्ण देशात निवडणूक प्रक्रियेतील एसआयआर संदर्भात गंभीर आरोप करत, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्यावर चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी राजुभाऊ चौधरी अध्यक्ष, वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटी याच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. वाशिम जिल्हाधिकाऱ्यांला समोर धरणे आंदोलन करण्यात आले व जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत आक्षेप नोंदवित निवडणूक आयोगाने स्वतंत्र व निष्पक्षपणे काम करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. एर्ध्ं प्रक्रियेदरम्यान मतदारांची नावे वगळणे, नवीन मतदारांच्या नोंदणीतील अनियमितता तसेच निवडणूक आयोगाच्या आयटी प्रणालीच्या केंद्रीकरणाबाबत निवेदनात प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

निवेदनानुसार, पश्चिम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे वगळली गेल्याचा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारसंख्येत मोठी वाढ झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या संदर्भातील आकडेवारीची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

तसेच, निवडणूक आयोगातील निर्णय प्रक्रियेबाबत माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तांचा दाखला देत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या निर्णयांची चौकशी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. 'लोकशाही व संविधानाचे संरक्षण करण्यासाठी संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात यावी,' अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

निवेदनात एर्ध्ं प्रक्रिया रद्द करावी, मतदार यादीतील वगळण्यात आलेली नावे पुन्हा समाविष्ट करावीत आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी, अशा विविध मागण्याही करण्यात आल्या आहेत. या धरणे आंदोलनात कांग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी काळया रंगाचा टी-शर्ट , काळी टोपी, काळा रुमाल, काळा स्टा?ल, काळी रिबीन, व काळा ड्रेस घालून सोबत महिलांना काळी साडी परिधान केलेली होती तर डफडे वाजवत 'ज्ञानेश्वर कुमार हटाव व त्याचे भ्रष्ट कारभारचा जाहीर निषेध केला' या प्रसंगी काँग्रेसजन यानी प्रचंड मोठी गर्दी केली होती. या कार्यक्रमास दिलीपराव सरनाईक सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, चंद्रकांत साठे, जावेद सौदागर, राजूभाऊ वानखडे, सोनाली लांडगे, मधुकरराव जुमडे, डॉ. श्याम गाभणे, किसनराव मस्के, परसरामजी भोयर, गजानन गोटे, विजयराव देशमुख, रामनाथ राठोड, रामेश्वर देवकर, नंदाताई गनोदे, मनीष भालेराव, भीमराव लोखंडे, दिलीप देशमुख, इफ्तिकार पटेल, गजानन राठोड, संजय शिंदे, अरविंद लाठीया, राजीक शेख, योगेश बळी, सागर गोरे, सय्यद आजम, शेख नजीर, उदेभान लांडगे, अमोल धोटे, जय चव्हाण, सय्यद गुलाब सय्यद मनवर, मीनाताई वाठोरे, संजय भानावत, समाधान माने, गजानन भोने, मौईनुद्दीन सौदागर, संजयराव देशमुख, आमिर खान पठाण, डॉ. अशोक करसडे, दादाराव देशमुख, वसंता भगत, सुभाष देवहंस यांच्या सह बहुसंख्य काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उज्वल देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरेश रत्नपारखी यांनी केले.

## गणेश विसर्जनातील वादातून शिवाजी बकाल यांच्या मृत्यूप्रकरणी १६ जणांवर गुन्हा

### तिवळीतील घटना ; मुलाचा तब्बल तेरा तास संघर्ष

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मालेगाव तालुक्यातील तिवळी येथे गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान झालेल्या वादानंतर मालेगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती शिवाजी बकाल यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी शिरपूर पोलिसांनी १६ जणांसह जगदंब गणेश मंडळातील इतर २० ते २५ कार्यकर्त्यांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. रविवारी (दि. २७) सकाळी साडेनऊच्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला.



शनिवारी (दि. २६) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास तिवळी येथील बसस्थानकासमोर गणेश विसर्जन मिरवणूक सुरू असताना गणेश मंडळाच्या क्रमांकावरून वाद झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या वादादरम्यान जगदंब गणेश मंडळातील कार्यकर्त्यांनी शिवाजी बकाल यांना धक्का दिल्याचा तसेच ट्रॅक्टर निष्काळजीपणे चालवून त्यांना धडक दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर बकाल यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी अनुप गजानन लहाने, सचिन सुभाष लहाने, संदीप भानुदास लहाने, कैलास अर्जुनराव लहाने, विकास कैलास लहाने, पांडुरंग गजानन लहाने, केशव गजानन लहाने, दीपक गजानन खिल्लारी, प्रदीप महादा लहाने, ज्ञानेश्वर अरुण लहाने, शुभम उद्धव लहाने, वैभव शंकर लहाने, सुनील उद्धव लहाने, निखिल मुरलीधर लहाने आणि ललित भुजंग शिंदे यांच्यासह जगदंब गणेश मंडळातील इतर २० ते २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वृत्त लिहिपर्यंत कोणालाही ताब्यात घेण्यात आले नव्हते.

दरम्यान, वडिलांच्या मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल व्हावा, यासाठी दीपक बकाल यांनी तब्बल तेरा तास शिरपूर पोलीस ठाण्यात संघर्ष केला. गुन्हा दाखल करण्यास विलंब होत असल्याचा आरोप करत त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन केले. अखेर रविवारी सकाळी गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांनी आंदोलन मागे घेतले. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, घटनेतील ट्रॅक्टर पोलिसांनी अद्याप ताब्यात घेतलेला नाही. या प्रकरणाचा पुढील तपास शिरपूर पोलीस करीत आहेत.

## समाज कल्याण विभागाव्दारे जनजागृती

**अकोला :** नागरिकांना शासनाच्या कामकाजाबाबत माहिती मिळावी, प्रशासनात पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढावे आणि नागरिकांना त्यांच्या माहितीच्या अधिकाराची जाणीव व्हावी, या उद्देशाने २८ सप्टेंबर रोजी समाजकल्याण विभागात 'माहितीचा अधिकार दिन' साजरा करण्यात आला, अशी माहिती समाजकल्याण सहाय्यक संचालक श्री. वाठ यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली. सेवा संकल्प अभियानांतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. माहितीचा अधिकार, माहिती मागणी करण्याची प्रक्रिया, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपील प्राधिकारी यांची भूमिका, तसेच नागरिकांना उपलब्ध असलेली अपील प्रक्रिया याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

## महावितरणच्या कारभारामुळे शेतकऱ्यांचा विद्युत पुरवठा तासन्तास खंडित

### मुख्यालयी कर्मचारी-अधिकारी उपलब्ध नसल्याने वीजपुरवठा सुरळीत होण्यास विलंब

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी व अधिकारी वेळेत उपलब्ध होत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर शेतकरी संबंधित लाईनमन तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधतात. मात्र, विविध कारणे सांगून दुरुस्तीच्या कामास विलंब होत. असल्याने शेतकऱ्यांना तासन्तास वीजपुरवठ्याची प्रतीक्षा करावी लागत असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील विद्युत पुरवठा सुरळीत राहण्यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी उपलब्ध राहणे आणि तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करणे गरजेचे आहे. विशेषतः शेतीसाठी पाण्याची आवश्यकता असलेल्या काळात वीजपुरवठा दीर्घकाळ खंडित राहिल्यास



त्याचा थेट परिणाम पिकांवर होण्याची शक्यता आहे. राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी विविध घोषणा करण्यात येत असताना प्रत्यक्षात विद्युत पुरवठा सुरळीत व नियमित मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. आधीच नैसर्गिक परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता अनियमित वीजपुरवठ्याचेही संकट उभे राहिले आहे.

महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची दखल घेऊन मंगरूळपीर तालुक्यातील विद्युत पुरवठा सुरळीत करावा, तक्रारींचे तातडीने निराकरण करावे आणि शेतकऱ्यांना आवश्यक त्या वेळेत वीज उपलब्ध करून द्यावी.

> सदर बाब महावितरणच्या निदर्शनास आली असून, शेतकरी बांधवांना होणाऱ्या गैरसोयीबाबत आम्ही दिलगीर आहोत. कंजरा कृषी फीडरवरील वाशिम रोड परिसरातील एबी स्विच प्रत्यक्ष पाहणी करून विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्याचे नेमके कारण तपासण्यात येत आहे. प्राथमिक दुरुस्ती करूनही वाऱ्यामुळे अथवा इतर तांत्रिक कारणांमुळे पुन्हा बिघाड झाल्यास तो कायमस्वरूपी दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
>
> शेतकऱ्यांना सुरळीत व विश्वासार्ह विद्युत पुरवठा मिळणे ही महावितरणची जबाबदारी असून, संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील. तसेच कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत करण्यात आलेल्या तक्रारीचीही योग्य ती चौकशी करण्यात येईल. शेतकरी बांधवांनी संयम राखावा. विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
>
> **कनिष्ठ अभियंता,** शेलुबाजार

## स्वच्छता ही सेवा अभियान २०२६ अंतर्गत वाशिम येथे स्वच्छता, आरोग्य व शाश्वत ग्रामीण विकासावर जनजागृती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अटारी, पुणे यांच्या संचालकांच्या निर्देशानुसार कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे 'स्वच्छता ही सेवा अभियान २०२६' अंतर्गत 'स्वच्छतेत सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये वैज्ञानिक पद्धतीने कचरा व्यवस्थापन, स्वच्छता व आरोग्यविषयक सवयी, जैविक व अजैविक कचऱ्याची योग्य विल्हेवाट, संसाधनांचे पुनर्वापर तसेच स्वच्छ व निरोगी ग्रामीण परिसंस्था याबाबत भागधारकांमध्ये जनजागृती करण्यात आली. स्वच्छता अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सामूहिक सहभाग व सकारात्मक वर्तनात्मक बदलाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. डॉ. रवींद्र काळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत ग्रामीण विकासामध्ये कृषी विज्ञान केंद्रांची भूमिका स्पष्ट केली. स्वच्छ परिसर, शास्त्रीय कचरा व्यवस्थापन आणि



आरोग्यदायी जीवनशैली या सुदृढ व सक्षम ग्रामीण समुदायाच्या मूलभूत गरजा असल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. डी. एन. इंगोले, विषय विशेषज्ञ (कृषी अर्थशास्त्र) यांनी कृषी व घरगुती कचऱ्याचा कार्यक्षम पुनर्वापर, कंपोस्ट निर्मिती, मूल्यवर्धन आणि 'कचऱ्यातून संपत्ती' या संकल्पनेद्वारे उत्पन्ननिर्मितीच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. मयूर देशमुख, विषय विशेषज्ञ (पशुविज्ञान) यांनी पशुधनातील कचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन, स्वच्छ पशुगृहे तसेच शेण व कृषी अवशेषांचा कंपोस्ट व सेंद्रिय निविष्ठा निर्मितीसाठी वापर करून संसाधनांचे पुनर्चक्रीकरण व शाश्वत कृषी विकास साधण्याबाबत मार्गदर्शन केले.

## चान्नी ग्रामपंचायतीच्या तक्रारीला नवे वळण? ; ६५ हजारांत विषय मॅनेज झाल्याची चर्चा

■ प्रतिनिधी | पातूर ■

चान्नी ग्रामपंचायतीतील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या कथित व्यवहारावरून सुरू झालेल्या तक्रारीने आता वेगळेच वळण घेतल्याची चर्चा आहे. प्रशासकाच्या कार्यकाळातील तब्बल १० लाख ६१ हजार ७५७ रुपयांच्या कथित व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी झाल्यानंतर, तक्रारीचा विषय ६५ हजारांच्या कथित देवाणघेवाणीतून मिटविण्याची चर्चा सुरू असल्याची कुजबुज परिसरात आहे.

> **तक्रारदार आणि प्रशासनाची भूमिका स्पष्ट होणार?**
>
> ६५ हजारांच्या कथित चर्चेबाबत तक्रारदार विजयकुमार ताले यांची अधिकृत भूमिका तसेच पंचायत समिती प्रशासनाची प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे संबंधितांची बाजू जाणून घेऊनच या चर्चेचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते.
>
> दरम्यान, १० लाख ६१ हजार ७५७ रुपयांच्या कथित व्यवहारांची कागदपत्रांसह अधिकृत चौकशी झाल्यासच या प्रकरणातील आरोपांमध्ये कितपत तथ्य आहे, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे गटविकास अधिकारी तक्रारीवर कोणती कारवाई करतात, चौकशी होते का आणि ६५ हजारांच्या कथित चर्चेची सत्यता तपासली जाते का, याकडे चान्नी परिसराचे लक्ष लागले आहे.

मात्र, या चर्चेला अद्याप कोणताही अधिकृत दस्तऐवजी पुरावा किंवा संबंधितांकडून अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे चर्चेच्या सत्यतेसह मूळ आर्थिक व्यवहारांची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे ठरले आहे.

सायवणी येथील विजयकुमार बळीराम ताले यांनी १० सप्टेंबर २०२६ रोजी पंचायत समिती पातूरच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या निधीशी संबंधित व्यवहारांची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. यासाठी खातेपुस्तके, बिल-व्हाउचर, मंजुरीची प्रक्रिया, निधीचा प्रत्यक्ष विनियोग तसेच संबंधित कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### लाखोंच्या व्यवहारांवर प्रश्न; आता ६५ हजारांची चर्चा कशासाठी?

तक्रार दाखल झाल्यानंतर '६५ हजारांत विषय मिटविण्याची चर्चा सुरू आहे', अशी चर्चा काही नागरिकांमध्ये असल्याचे समोर येत आहे. मात्र, ही केवळ चर्चेच्या पातळीवरील बाब असून तिची स्वतंत्र पुष्टी झालेली नाही. त्यामुळे ६५ हजारांची रक्कम नेमकी कशासाठी, कोणाच्या माध्यमातून आणि कोणत्या कारणाने देण्याची चर्चा आहे, याचा तपास होणे आवश्यक आहे.

### चौकशीपूर्वीच 'तडजोडी'ची चर्चा?

एका बाजूला लाखो रुपयांच्या कथित व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी होत असताना दुसऱ्या बाजूला तक्रारीचा विषय आर्थिक तडजोडीतून मिटविण्याची चर्चा होत असेल, तर ही बाबही प्रशासनाच्या चौकशीच्या कक्षेत येणे आवश्यक आहे. मात्र, केवळ चर्चेच्या आधारे कोणावरही गैरप्रकाराचा ठपका ठेवता येणार नाही. संबंधित कागदपत्रे, आर्थिक नोंदी आणि प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारेच वस्तुस्थिती निश्चित होऊ शकते. त्यामुळे पंचायत समिती प्रशासनाने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतील कथित व्यवहारांची चौकशी करण्याबरोबरच ६५ हजारांच्या कथित तडजोडीच्या चर्चेत तथ्य आहे किंवा नाही, याचीही स्वतंत्र पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे.

## शिवाजी बकाल यांच्या मरणोत्तर नेत्रदानातून माणुसकीचा प्रकाश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिवलग व्यक्तीच्या निधनानंतर दुःखावर मात करत शिवाजी बकाल यांच्या कुटुंबीयांनी मरणोत्तर नेत्रदानाचा प्रेरणादायी निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे गरजू व्यक्तींच्या आयुष्यात दृष्टीचा प्रकाश निर्माण होण्याची आशा निर्माण झाली आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रशल्यचिकित्सक व नेत्रदान पथकाने मरणोत्तर नेत्रबुबुळे काढून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथे पाठविली. नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे व नेत्रचिकित्सा अधिकारी सुधीर साळवे यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली.

## बांबर्डा (कानकिरड) येथे 'एक गाव, एक गणपती'ची परंपरा कायम

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शिवबा ग्रुप गणेशोत्सव मंडळाच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि सामाजिक एकोप्याने साजरा करण्यात आला. गावातील श्री गजानन महाराज मंदिर येथे श्री गणेशाची विधिवत स्थापना करण्यात आली. विशेष म्हणजे, बांबर्डा (कानकिरड) येथे गेल्या २० वर्षांपासून 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना अखंडपणे सुरू असून, यंदाही गावातील नवयुवकांनी एकत्रित येत गणेशोत्सव साजरा केला.

'एक गाव, एक गणपती' या संकल्पनेमुळे गावातील नागरिकांमध्ये एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा निर्माण



होण्यास हातभार लागत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने गावातील नवयुवक एकत्र येऊन उत्सवाचे नियोजन करतात. त्यामुळे धार्मिक उत्सवासोबतच युवकांच्या एकजुटीचे आणि सामूहिक सहभागाचे दर्शन यंदाच्या गणेशोत्सवात घडले. गणेशोत्सवाच्या कालावधीत श्री गणरायाच्या दर्शनासाठी ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## ४३० किलो गोवंश मांस जप्त ; अकोटमध्ये दोघे ताब्यात

### शौकत अली चौकातील कारवाई; १.०८ लाखांचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरातील शौकत अली चौक परिसरात गोवंश जातीचे सुमारे ४३० किलो मांस आढळून आल्याने अकोट शहर पोलिसांनी कारवाई करीत दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत मांसासह वजनकाटा, वजनमाप, लोखंडी सुरी आणि लाकडी ठोकळा असा एकूण १ लाख ८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

२८ सप्टेंबर रोजी अकोट शहर पोलिसांचे पथक परिसरात पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या माहितीच्या आधारे शौकत अली चौक येथे कारवाई करण्यात आली. यावेळी मोहम्मद हयाद शेख मुनीर (७५, रा. अंजनगाव नाका, आंबोळी वेस, अकोट, ह.मु. कुरेशी नगर) आणि मोहम्मद अस्लम मोहम्मद अन्सार (३१, रा. कुरेशी नगर, शौकत अली चौक, अकोट)



यांच्याकडे गोवंश जातीचे मांस आढळून आल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांच्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या मांसाची अंदाजे किंमत १ लाख ७ हजार ५०० रुपये आहे. याशिवाय ५०० रुपयांचा वजनकाटा, ३०० रुपयांचे वजनमाप, ३०० रुपयांची लोखंडी सुरी आणि १०० रुपयांचा लाकडी ठोकळा असा मुद्देमालही जप्त करण्यात आला. या प्रकरणी अकोट शहर पोलिस ठाण्यात अप. क्र. ७७५/२०२६ अन्वये प्राणी संरक्षण अधिनियमातील कलम ५, ५(क), ९(अ) तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम ३२५, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत. पोलिस अधीक्षक अर्जित चांडक, अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, सहायक पोलिस अधीक्षक तथा अकोट उपविभागीय पोलिस अधिकारी निखील पाटील आणि अकोट शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार पोलिस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अविनाश मोहिते, पोलिस उपनिरीक्षक निलेश बारहाते, एएसआय हिम्मत दंदी, पोलिस हेड कॉन्स्टेबल नरेंद्र जाधव, कपिल राठोड, सुबोध खंडारे आणि नितेश सोळंके यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३०२ ■ मंगळवार २९ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# शेवटचा सोमवार ठरला आंदोलनवार

## सरकारविरोधात एल्गार



**वर्धा जनमाध्यम :** सप्टेंबर महिन्याचा शेवटचा सोमवार वर्धा जिल्ह्यात विविध प्रश्नांवर सरकार आणि प्रशासनाचे लक्ष वेधणाऱ्या आंदोलनांनी गाजला. विद्यार्थ्यांपासून शेतकरी आणि बांधकाम कामगारांपर्यंत विविध घटकांनी आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून एल्गार पुकारला. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील सहा विद्यार्थ्यांचे निलंबन मागे घेण्याच्या निर्णयापासून ते निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधातील काँग्रेसच्या आंदोलनापर्यंत, देवळीतील शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन आणि वर्ध्यातील बांधकाम कामगारांचा आक्रोश मोर्चा यामुळे सोमवारी जिल्ह्यात आंदोलनांचे वातावरण निर्माण झाले.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेनेही दुष्काळ आणि पीक नुकसानीच्या प्रश्नावर हल्लाबोल करीत शासनाकडे हेक्टरी एक लाख रुपयांच्या भरपाईसह विविध मागण्या मांडल्या.

# विद्यापीठ नमले; सहा विद्यार्थ्यांचे निलंबन रद्द



महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील विद्यार्थी आंदोलनाला सोमवारी निर्णायक वळण मिळाले. गेल्या २५ दिवसांपासून विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या सहा विद्यार्थ्यांचे निलंबन विद्यापीठ प्रशासनाने मागे घेतले. विद्यार्थ्यांना पुन्हा विद्यापीठात प्रवेश देण्यास प्रशासनाने सहमती दर्शविली. विद्यार्थ्यांवर दाखल गुन्ह्यांबाबत न्यायालयीन प्रक्रियेतून तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली.

वसतिगृहात शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे तसेच मेसमधील निकृष्ट दर्जाचे जेवण बंद करून योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनाला वंचित बहुजन आघाडी आणि सम्यक विद्यार्थी संघटनेने पाठिंबा दिला होता. मागण्या ऐकून घेण्याऐवजी विद्यार्थ्यांवर निलंबनाची कारवाई करून पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला होता.

कारवाईविरोधात विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू ठेवले. सोमवारी वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य सुजात आंबेडकर यांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आंदोलनात सहभाग घेत प्रशासनाला जाब विचारला. त्यानंतर विद्यार्थी प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलावण्यात आले. चर्चेत निलंबन मागे घेऊन विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेश देण्याची मागणी करण्यात आली. प्रशासनाने दोन्ही मागण्यांना सहमती दर्शविली.

दरम्यान, अंतर्गत चौकशी समितीऐवजी निष्पक्ष चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीशांचा समावेश असलेली समिती नेमावी, अशी मागणी सुजात आंबेडकर यांनी केली. विद्यार्थ्यांना लक्ष्य न करता त्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्याची मागणीही करण्यात आली.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर घोषणांचा पाऊस नको; निर्णय घ्या



देवळीत प्रभाताई राव विचारमंचच्या वतीने सोमवारी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले. शेतमालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळत नसणे, कर्जाचा वाढता बोजा आणि नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीची रखडलेली भरपाई यामुळे शेतकरी अडचणीत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले.

संस्थापक अध्यक्षा चारुलता राव टोकस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव द्यावा, संपूर्ण कर्जमाफी करावी, नुकसानभरपाई तातडीने खात्यावर जमा करावी आणि प्रलंबित पंचनामे पूर्ण करावेत, अशी मागणी करण्यात आली.

वाढता शेती खर्च, अवकाळी पाऊस आणि नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. नुकसान झाल्यानंतरही मदतीसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर आंदोलनकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केला. केवळ आश्वासनांनी शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, शासनाने प्रत्यक्ष निर्णय घेऊन दिलासा द्यावा, अशी भूमिका मांडण्यात आली.

# निवडणूक आयुक्तांना हटवा ; काँग्रेसचा एल्गार



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटविण्याच्या मागणीसाठी काँग्रेसने सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात निदर्शने केली. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करीत मतदार याद्यांमधून नावे वगळण्याच्या प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या दहा महिन्यांत आयोगाच्या विविध निर्णयांवर किमान १४ वेळा आक्षेप नोंदविल्याचा अहवाल समोर आल्याचा दावा काँग्रेसकडून करण्यात आला. नवमतदारांच्या नोंदणीसाठीच्या फॉर्म सहामधील बदल, मतदार यादीतील नावांबाबतचे निर्णय आणि निवडणूक आयोगाच्या माहिती तंत्रज्ञान यंत्रणेच्या केंद्रीकरणासह विविध मुद्द्यांवर आक्षेप नोंदविल्याचे सांगण्यात आले.

एसआयआर प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील कोल्हे यांनी आयोगातील मतभेदांमुळे पारदर्शकतेबाबत प्रश्न निर्माण झाल्याचा दावा केला. लोकशाही आणि घटनात्मक मूल्यांच्या संरक्षणासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

मात्र, निवडणूक आयोगाने एसआयआरसह सर्व निर्णय पूर्ण आयोगाच्या एकमताने झाल्याचे स्पष्ट केले आहे. आयोगातील चर्चा आणि मतभेद हे निर्णय प्रक्रियेचा भाग असल्याचे आयोगाकडून सांगण्यात आले आहे.

# पाच हजार कामगारांचा एल्गार

### जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



१३ जुलै २०२६ चा शासन निर्णय रद्द अथवा स्थगित करण्याच्या प्रमुख मागणीसह विविध प्रश्नांवर स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने सोमवारी वर्ध्यात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. उमेश अग्निहोत्री यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गांवरून मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला.

मोर्चामध्ये मोठ्या संख्येने कामगार सहभागी झाले. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना अडविल्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले.

१३ जुलैच्या शासन निर्णयाचा पुनर्विचार करून तो रद्द अथवा स्थगित करावा, कामगारांच्या हिताच्या योजना बंद किंवा बदलण्याऐवजी त्यांचा प्रभावी विस्तार करावा, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून द्यावा, नोंदणी व नूतनीकरणातील अडचणी दूर कराव्यात आणि प्रलंबित अनुदानांचा विशेष मोहिमेतून निपटारा करावा, अशी मागणी करण्यात आली.

आरोग्य उपचारासाठी आर्थिक सहाय्य, विवाह सहाय्य आणि वृद्ध कामगारांसाठी निवृत्तिवेतनाचा प्रश्नही यावेळी मांडण्यात आला. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला.

# दुष्काळाच्या दणक्याने शेतकरी हवालदिल; सरकारवर हल्लाबोल



खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी शेतकरी संघटनेने सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात हल्लाबोल आंदोलन केले. सोयाबीन, कापूस आणि तूर यासह विविध पिकांचे नुकसान झाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये भरपाई द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे विशेष अनुदान द्यावे, २०२४ आणि २०२५ मधील प्रलंबति पीक विम्याची रक्कम तातडीने अदा करावी तसेच २०२६ चा पीक विमा नियमानुसार तत्काळ द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांना विनाअडथळा नवीन पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे. २०१९ पूर्वीचे प्रलंबित पीककर्ज असलेल्या पात्र शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांसाठी स्वतंत्र आर्थिक पॅकेज, पशुधनासाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज बिल आणि कर्जवसुलीला तात्पुरती स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली. सोलर सक्ती थांबवून शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याची मागणी करत जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व देवळीचे नगराध्यक्ष किरण ठाकरे यांनी केले.

**एकाच दिवशी चार आघाड्यांवर आवाज**

विद्यार्थ्यांचे प्रश्न, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेचा मुद्दा, बांधकाम कामगारांच्या मागण्या आणि शेतकऱ्यांचे आर्थिक संकट या वेगवेगळ्या प्रश्नांवर सोमवारी वर्धा जिल्ह्यात आंदोलने झाली. विद्यापीठातील आंदोलनात निलंबित विद्यार्थ्यांना पुन्हा प्रवेश देण्याचा निर्णय झाला. काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले. बांधकाम कामगारांनी शासन निर्णयाविरोधात मोर्चा काढला, तर देवळी आणि वर्ध्यात शेतकऱ्यांनी हमीभाव, कर्जमाफी, नुकसानभरपाई, पीक विमा आणि पंचनाम्यांसाठी आवाज बुलंद केला.

सप्टेंबरच्या शेवटच्या सोमवारी विविध घटकांनी आपल्या प्रश्नांसाठी प्रशासनाचे दरवाजे ठोठावले. त्यामुळे 'शेवटचा सोमवार ठरला आंदोलनवार' अशी जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरणाची चर्चा रंगली.

# शेतकरी साहित्याचा यंदा बांधावर जागर

### हिंगणघाट तालुक्यात २५ ते २७ डिसेंबरदरम्यान १६ वे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन



**वर्धा जनमाध्यम :** शेतकरी जीवन, शेतीचे अर्थशास्त्र आणि ग्रामीण वास्तव साहित्याच्या केंद्रस्थानी आणण्याच्या उद्देशाने यंदाचे १६ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन थेट शेताच्या बांधावर रंगणार आहे. हिंगणघाट तालुक्यातील अ?ग्रीसन एफपीएस परिसर, आर्वी छोटी शिवार येथे २५ ते २७ डिसेंबरदरम्यान हे संमेलन होणार असल्याची माहिती शेतकरी साहित्य चळवळीचे संस्थापक अध्यक्ष गंगाधर मुटे यांनी दिली.

शेती अर्थशास्त्राचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटावे, यासाठी शेती अर्थ प्रबोधिनीतर्फे वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. याच उपक्रमाचा भाग म्हणून संमेलनात चर्चासत्रे, संवाद, प्रकट मुलाखत, कविसंमेलन आणि गझल मुशायरा आयोजित करण्यात येणार आहे.ज्येष्ठ शेती साहित्यिक प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांची संमेलनाध्यक्षपदी निवड झाली आहे.

उद्घाटनाला ज्येष्ठ पत्रकार श्रीपाद अपराजित आणि साहित्यिक डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित राहणार आहेत. माजी आमदार सरोज काशीकर, अ?ड. वामन चटप हे विशेष अतिथी असतील. डॉ. अनिल जवादे स्वागताध्यक्ष तर गंगाधर मुटे कार्याध्यक्ष आहेत.संमेलनाला शेतीप्रेमी साहित्यिक आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# म्हैस आडवी आली अन् दुचाकीचा ताबा सुटला; १७ वर्षीय तरुणाचा मृत्यू

### दोन अपघातांत एक ठार; तिघे जखमी

**वर्धा जनमाध्यम** जिल्ह्यातील देवळी आणि सावंगी मेघे पोलिस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या दोन स्वतंत्र अपघातांत एका युवकाचा मृत्यू झाला असून तिघे जखमी झाले. देवळी तालुक्यातील सोनेगाव बाई येथील सूरज रमेश अडकिणे व त्यांचे सहकारी प्रमोद नेहारे आणि शंकर शेंद्रे अडेगाव येथून दुचाकीने परतत असताना अमोल खेडकर यांच्या शेताजवळ समोरून आलेल्या कारने दुचाकीला कट मारला. कारचालक न थांबता निघून गेला. दुचाकीचा ताबा सुटल्याने तिघेही रस्त्यावर कोसळून जखमी झाले. याप्रकरणी देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.




दुसरा अपघात सालोड टी पॉइंटजवळ घडला. रामदेव मेधवाल हे त्यांचा १७ वर्षीय भाऊ अनिल याच्यासोबत दुचाकीने देवळीकडे जात होते. अचानक दुचाकीसमोर म्हैस आल्याने रामदेव यांचा ताबा सुटला आणि दोघेही रस्त्यावर पडले. डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या अनिल यांना सावंगी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. रामदेव यांना किरकोळ दुखापत झाली. याप्रकरणी सावंगी मेघे पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

### उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा दणका;

# ९ महिला दारू विक्रेत्यांवर कारवाई

### ४० हजारांचा मुद्देमाल जप्त; न्यायालयीन कोठडी

वर्धा जनमाध्यम. उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी अवैध दारू विक्रेत्यांविरोधात मोहीम तीव्र केली आहे. हिंगणघाट पोलिस ठाण्याच्या हद्दीत महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये तब्बल नऊ महिला दारू विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी ४० हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. कारवाईतील सर्व आरोपी महिलांना हिंगणघाट न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली.पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशील नायक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार अनिल राऊत यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली.

# युवतींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; वर्धा रेल्वे स्थानकात महिला पोलिसांची मागणी

### वर्धा रेल्वे स्थानकात महिला प्रवासी रामभरोसे

**वर्धा जनमाध्यम** , २८ सप्टेंबरला वर्ध्यात आदिवासी युवतीचे अपहरण व सामूहिक अत्याचाराची घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर वर्धा रेल्वे स्थानकातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रेल्वे स्थानक परिसरातील असुरक्षितता दूर करून महिलांच्या सुरक्षेसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. कलेक्टर, पालकमंत्री, पोलीस अधिकारी तसेच रेल्वे पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. स्थानकावर महिला पोलीस कर्मचाऱ्यांची नियमित ड्युटी लावावी, ऑटोचालकांच्या बेफाम वर्तनाला आळा घालावा आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी कडक तपासणी व गस्त वाढवावी, अशी मागणी करण्यात आली.



महिला व युवतींविरोधातील गुन्हे करताना आरोपींना कायद्याची भीती राहिलेली नाही. ही प्रवृत्ती रोखण्यासाठी कठोर कारवाई आणि प्रभावी सुरक्षा व्यवस्था उभारावी, अशी मागणी करण्यात आली.यावेळी महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेच्या प्रा. नूतन माळवी, द्वारका इमडवार, अनुराधा उटाणे, सुचिता इंगोले तसेच काँग्रेसचे अभुदय मेघे, सतीश आत्राम, धर्मपाल ताकसांडे, रणजीत पाटील आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस
## सार्वजनिक नोटीस

माझे पक्षकार श्री. अमोल पुरुषोत्तम धोटे हे मौजा बोरगाव मेघे, ता. व जि. वर्धा, वर्धा येथील प्लॉट क्र. ६१ च्या पश्चिमेकडील भागातील ७५.०० चौ. मी. क्षेत्रफळाचा हिस्सा, फील्ड सर्व्हे क्र. १५८, मौजा क्र. १००, टी.एस. क्र. १९, घर क्र. ७४१, यासंबंधीच्या मालमत्तेचे मालक व ताबेदार आहेत.

**सदर मालमत्तेच्या हद्दी खालीलप्रमाणे आहेत :**
**पूर्वेस: सदर प्लॉटचा उर्वरित भाग.पश्चिमेस: प्लॉट क्र. ६०.**
**उत्तरेस: प्लॉट क्र. ५६.**
**दक्षिणेस: लेआऊट रोड.**

सदर प्लॉट क्र. ६१ हा श्री. प्रभाकर गुलाबराव धोटे यांनी श्री. अमोल पुरुषोत्तम धोटे, श्री. विलास वासुदेव बोमेलवार व श्री. राजकुमार चंदीराम आहुजा यांच्या नावे दिनांक २७/०३/२०१५ रोजी दस्त क्र. १६२१/२०१५ अन्वये नोंदणीकृत विक्रीखताद्वारे विक्री केला आहे.

त्यानंतर वरील तिन्ही सहमालकांनी आपसात प्लॉट क्र. ६१ ची परस्पर वाटणी (म्युच्युअल पॉटेशन ) केली असून, सदर वाटणीनुसार प्लॉट क्र. ६१ च्या पश्चिमेकडील भागातील ७५.०० चौ. मी. क्षेत्रफळाचा हिस्सा हा माझे पक्षकार श्री. अमोल पुरुषोत्तम धोटे यांच्या मालकी व ताब्यात आला आहे. सदर वाटणीस अनुसरून महसूल अभिलेखात फेरफार नोंद क्र. २४८, दिनांक ०१/०६/२०१५ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे.तसेच, माझे पक्षकार यांच्या ताब्यातील सदर मालमत्तेशी संबंधित नोंदणीकृत विक्रीखत दस्त क्र. ८२४३/२०११, दिनांक १२/१०/२०११ यामधील पृष्ठ क्र. ८, ९, १० व ११ तसेच मूळ पृष्ठ क्र. २३, २४ व २५ गहाळ झालेले आहेत. तसेच संबंधित वाटणीखत (पार्टेशन डीड ) देखील गहाळ झालेले आहे.माझे पक्षकार यांनी सदर मालमत्तेवर मुथुट हाऊसिंग फायनान्स कंपनी लिमिटेड कडून कर्ज घेण्यासाठी अर्ज केलेला आहे.म्हणून याद्वारे सर्व संबंधित जनतेस कळविण्यात येते की, वरील नमूद मालमत्ता अथवा सदर व्यवहारासंदर्भात कोणत्याही व्यक्तीचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, धारणाधिकार, गहाण, अडथळा, भार किंवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क अथवा हितसंबंध असल्यास, अथवा वरील नमूद मूळ कागदपत्रे कोणास सापडलेली असल्यास, त्यांनी त्याबाबतचा दावा/हरकत या सार्वजनिक नोटीसच्या प्रकाशनाच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात सादर करावी.निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा, हक्क, हरकत किंवा हितसंबंध नाही असे समजून माझे पक्षकार व संबंधित वित्तीय संस्था पुढील कायदेशीर कार्यवाही करतील.

**ॲड,आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा.**
**मो. नं. ९९२२४२६१६८**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार श्री. जयेश सुभाषराव उभाळकर हे खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे कायदेशीर मालक व कब्जेदार आहेत.मिळकतीचे वर्णन :

मौजा - वर्धा, तहसील व जिल्हा – वर्धा, सदर मिळकत नगर परिषद, वर्धा हद्दीत येत असून, मौजा क्र. २२५, जुना भूमापन क्रमांक २/१, नवीन भूमापन क्रमांक ३२, यामधील प्लॉट क्र. ११, नवीन मालमत्ता क्र. ०९०००४७, जुना मालमत्ता क्र.डब्लू.ए आर.डी ००००११७८, नवीन मालमत्ता क्र. डब्लू.ए.आर डी ०००० ११७८, वॉर्ड क्र. ९, क्षेत्रफळ १५८.७३ चौ.मी. म्हणजेच १७०८.०० चौ.फुट, असून सदर मिळकतीवर बांधकाम केलेले घर आहे. सदर मिळकत ज्ञानेश्वर नगर, ४४ लालबाग गणेशजी मंदिराजवळ, वर्धा – ४४२००१ येथे स्थित आहे.

**चतुःसीमा : पूर्वेस - श्रीमती सिंधू नारायण चौधरी व श्रीमती कुसुम दादाराव डेठे यांचे घर,पश्चिमेस - श्रीमती नंदा उमेश मेश्राम यांचे घर,उत्तरेस - गल्ली व श्रीमती बेबी वासुदेवराव द्रावेकर,दक्षिणेस - रस्ता**,सदर शासकीय लघुवेतन कर्मचारी सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित, तर्फे एन. आर. सातपुते व श्री. गायकवाड यांनी प्लॉट क्र. ११ हा श्रीमती माधुरी सुभाषराव उभाळकर यांना दिनांक १८/०२/१९७८ रोजी विक्री केला होता.सदर व्यवहाराची फेरफार नोंद संबंधित महसूल प्राधिकरणामार्फत संबंधित तलाठी यांचेकडून दिनांक १५/०९/१९९६ रोजी फेरफार क्र. २५ अन्वये करण्यात आलेली आहे. सदर विक्रीखताचा इंडेक्स-छ्व इतर संबंधित कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर कागदपत्रे कायदेशीर व अस्सल असल्याचे निदर्शनास आले आहे.त्यानंतर श्रीमती माधुरी सुभाषराव उभाळकर यांनी प्लॉट क्र. ११, नवीन मालमत्ता क्र. डब्लु ए.आर.डी ००००११७८, क्षेत्रफळ १५८.७३ चौ.मी. म्हणजेच १७०८.०० चौ.फुट ही मिळकत श्री. जयेश सुभाषराव उभाळकर यांना दिनांक १९/०१/२०२६ रोजी दानपत्राद्वारे (गिफ्ट डिड) हस्तांतरित केली असून, सदर दानपत्राचा दस्त क्र. २५६/२०२६ आहे. त्यानुसार माझे पक्षकार सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत.सदर मिळकतीसंबंधी दिनांक १८/०२/१९७८ रोजीचे मूळ लिंक विक्रीखत माझ्या पक्षकारांकडून हरविले/गहाळ झालेले आहे. तसेच माझ्या पक्षकारांनी सदर मिळकतीच्या अनुषंगाने जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड. कडून कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

त्यामुळे सर्वसामान्य जनतेस या सार्वजनिक नोटीसद्वारे कळविण्यात येते की, वरील नमूद मिळकत अथवा सदर व्यवहारासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, हरकत, बोजा, धारणाधिकार , गहाण, अडथळा किंवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क अथवा हितसंबंध असल्यास, अथवा वरील नमूद दिनांक १८/०२/१९७८ रोजीचे मूळ विक्रीखत किंवा इतर संबंधित मूळ कागदपत्रे कोणास सापडलेली असल्यास, त्यांनी आपला दावा/हरकत ही सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात सादर करावी.

**ॲड,आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा.**
**मो. नं. ९९२२४२६१६८**

# विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र देशासाठी आदर्श निर्माण करेल-मुख्यमंत्री फडणवीस

## प्रशासकीय क्षमता वाढवून योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रात प्रथम क्रमांकावर नेण्यासाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. शासन यंत्रणेची क्षमता बळकट करणे, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि योजनांच्या परिणामांचे प्रभावी मूल्यमापन यावर भर दिला जात आहे. या प्रयत्नांतून महाराष्ट्र विकसित राज्य म्हणून देशासाठी आदर्श निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.सह्याद्री अतिथीगृह येथे भारताच्या विकासाला गती देणे : प्रभावी शासनासाठी राज्य-केंद्रित कृती आराखडा या विषयावर प्रा. कार्तिक मुरलीधरन यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, महाराष्ट्र शाश्वत सार्वजनिक वित्त समितीचे अध्यक्ष विजय केळकर, समितीचे सदस्य



प्रा. कार्तिक मुरलीधरन तसेच सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उपलब्ध साधनसंपत्तीतून अपेक्षित परिणाम साधणे हे राज्यापुढील प्रमुख आव्हान आहे. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेची क्षमता वाढविण्यावर शासनाने भर दिला आहे. गेल्या वर्षभरापेक्षा अधिक काळापासून शासनाने १०० दिवस आणि १५० दिवसांच्या उद्दिष्टाधारित कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी केली आहे. या कालबद्ध कार्यक्रमांमध्येही क्षमता वृद्धीला प्राधान्य दिले आहे. विकसित महाराष्ट्राचा हा दीर्घकालीन प्रवास असून, त्यासाठी शासनाचे सातत्यपूर्ण आणि केंद्रित प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र लवकरच विकासाच्या बाबतीत देशात आघाडी घेउन आदर्श निर्माण करेल.

व्याख्यानात मांडलेल्या संकल्पना आणि पुस्तकातील विचारांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासन सकारात्मकपणे काम करेल. संबंधित तज्ज्ञ आणि नव्याने गठित केलेल्या पथकाच्या सहकार्याने शासन अधिक प्रभावीपणे काम करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. शिक्षण, आरोग्य, पोषण, सार्वजनिक सुरक्षा, न्याय, सामाजिक संरक्षण आणि रोजगार या क्षेत्रांतील सार्वजनिक सेवा नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी राज्यस्तरीय सुधारणा, प्रशासकीय क्षमता वृद्धी आणि पुराव्यावर आधारित धोरणांच्या अंमलबजावणीवर पुस्तकात भर देण्यात आला आहे. संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे शासनव्यवस्था अधिक परिणामकारक करण्यासाठी त्यात व्यवहार्य उपाय सुचविण्यात आले आहेत.

# 2037 पर्यंत एसटीची 'ई-लालपरी'

## 100 टक्के इलेक्ट्रिक ताफ्याचे लक्ष्य

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाचा ताफा २०३७ पर्यंत १०० टक्के इलेक्ट्रिक करण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. एसटीच्या ताफ्यात दाखल होणाऱ्या सुमारे ५ हजार डिझेल बसेस या शेवटच्या डिझेल बसेस ठरणार असून, त्यानंतर टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक बसेसची संख्या वाढविण्यात येणार



आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.एसटीच्या मुख्यालयात झालेल्या ३१२ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी संचालक मंडळाचे सदस्य आणि महामंडळाचे खातेप्रमुख उपस्थित होते.सध्या एसटीच्या ताफ्यात सुमारे १४ हजार बसेस असून, त्यापैकी ११०० बसेस ई-बसेस आहेत. ताफ्यातील सुमारे ५ हजार जुन्या बसेस नियमानुसार टप्प्याटप्प्याने स्क्रॅप करण्यात येणार आहेत. त्यामुळे ताफ्याचे आधुनिकीकरण आणि डिझेलवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होणार आहे. सात ते आठ वर्षे वापर झालेल्या जुन्या बसेसचे २०२७ पासून टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिकमध्ये रूपांतर करण्याची मोहीम सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर प्रवासी वाहतुकीच्या गरजेनुसार नव्या ई-बसेसची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली जाणार आहे.सध्या डिझेल बसेसचे आयुर्मान सुमारे १५ वर्षे, तर ई-बसेसचे आयुर्मान सुमारे २० वर्षे असल्याने इलेक्ट्रिक बसेसचा अधिक काळ वापर करता येणार आहे. डिझेलवरील अवलंबित्व कमी झाल्यामुळे इंधन खर्चातही बचत होण्याची अपेक्षा आहे.ई-बसेसच्या वाढत्या संख्येला आवश्यक असलेली चार्जिंग स्टेशन, विद्युत पायाभूत सुविधा आणि तांत्रिक यंत्रणा उभारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आगारनिहाय नियोजन करून ई-बसेसची खरेदी आणि चार्जिंग सुविधा उभारणी या दोन्ही प्रक्रिया समांतरपणे राबविण्यात येणार आहेत.एसटी ही महाराष्ट्राच्या प्रत्येक गावाला जोडणारी सार्वजनिक सेवा आहे. तिचे आधुनिकीकरण करताना पर्यावरणाची जबाबदारीही महत्वाची आहे. डिझेलवरील अवलंबित्व कमी करून स्वच्छ, हरित आणि आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभी करण्याचा आमचा संकल्प आहे. २०३७ पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा इलेक्ट्रिक करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही सुरू आहे, असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणारी लालपरी भविष्यात हरित महाराष्ट्राची ई-लालपरी बनेल. पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीचे देशातील आदर्श माडेल महाराष्ट्रात उभारण्याच्या दिशेने एसटीची वाटचाल सुरू आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# राज्य सेवा मुख्य परीक्षेसह तीन स्पर्धा परीक्षा पुढे ढकलल्या

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२५ मधील मूल्यांकनाबाबत अनेक विद्यार्थी, विद्यार्थी संघटना यांनी आक्षेप नोंदविले आहेत. हे आक्षेप विचारात घेउन आयोगाने राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२५ च्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या परीक्षेची प्रक्रिया लांबण्याची शक्यता आहे.



दरम्यान, राज्यातील प्रचलित सर्व परीक्षा पद्धतींचा आढावा घेण्यासाठी राज्य शासनाने गठित केलेल्या उच्चस्तरीय समितीने राज्यभरातील परीक्षार्थी तसेच संबंधित घटकांशी विस्तृत चर्चा केली असून, विविध उत्तम कार्यपद्धतींचाही अभ्यास केला आहे. आदर्श परीक्षा पद्धतीबाबत समितीच्या शिफारशी लवकरच अपेक्षित आहेत.या पार्श्वभूमीवर अनेक विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटना तसेच काही लोकप्रतिनिधींनी ३ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणारी राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२६ पुढे ढकलण्यात यावी, अशी निवेदने आयोगाकडे सादर केली होती. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून आयोगाने ३ ऑक्टोबर २०२६ पासून होणारी राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२६, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा-२०२६ आणि महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा-२०२६ या तीन स्पर्धा परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. या परीक्षांच्या सुधारित तारखांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येणार असून, संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# आधुनिक विज्ञानाची जोड देउन आयुर्वेदाला जागतिक स्तरावर नेण्याची गरज-राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई/प्रतिनिधी :**आयुर्वेद ही भारताची प्राचीन आणि अमूल्य ज्ञानपरंपरा असून, या ज्ञानाला आधुनिक वैज्ञानिक संशोधन, क्लिनिकल पडताळणी आणि नवोन्मेषाची जोड देउन आयुर्वेदाला जागतिक स्तरावर प्रभावी स्थान मिळवून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.विश्व आयुर्वेद परिषद, महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित आयुर्वेद दिन २०२६ निमित्त एकदिवसीय वैज्ञानिक परिसंवादाचे आयोजन दादरच्या सूर्यवंशी सभागृहात करण्यात आले होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन तसेच स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय राज्य मंत्री श्रीपाद नाईक, कार्यक्रमाध्यक्ष रणजित पुराणिक, माजी महापौर डॉ. शुभा राउळ, राज्यपालांचे सचिव डा. प्रशांत नारनवरे,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डा.व्यंकट गिते, विश्व आयुर्वेद परिषद महाराष्ट्रचे अध्यक्ष डा. विनायक तायडे आदी उपस्थित होते.आयुर्वेद ही केवळ रोगोपचाराची पद्धती नसून निरोगी जीवनशैलीचा व्यापक ज्ञानस्रोत आहे. मधुमेह, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, हृदयरोग यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित आजारांवर आयुर्वेदाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरू शकते. आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यकाने परस्परपूरक दृष्टिकोनातून कार्य करावे. आयुर्वेद शिक्षण, संशोधन व नवोन्मेषासाठी जागतिक दर्जाच्या संस्था, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि



संशोधन सुविधा उभारण्याची गरज असल्याचे राज्यपालांनी सांगितले. आयुर्वेद ही केवळ उपचारपद्धती नसून निरोगी जीवनशैलीचा मार्ग आहे. दिनचर्या, ऋतुचर्या, योग्य आहार-विहार आणि योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. आयुर्वेदाला आधुनिक संशोधन व तंत्रज्ञानाशी जोडून देशातील आरोग्यव्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात असल्याचे आयुष आणि आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले. आयुर्वेदिक औषधी वनस्पतींच्या संवर्धनातून आरोग्यासोबतच पर्यावरण, शेती, रोजगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. आयुर्वेदाच्या माध्यमातून निरोगी, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. आयुर्वेद ही भारताची जगाला मिळालेली अमूल्य देणगी असून, पारंपरिक ज्ञानाला आधुनिक वैज्ञानिक संशोधन, प्रामाणिक पुरावे आणि क्लिनिकल डेटाची जोड देणे आवश्यक आहे. यामुळे आयुर्वेदाला देशाच्या तसेच जागतिक आरोग्य व्यवस्थेत प्रभावी स्थान मिळेल, असे उर्जा मंत्रालय व नवीन आणि नवीकरणीय उर्जा विभागाचे केंद्रीय राज्य मंत्री श्रीपाद नाईक यांनी सांगितले.आयुर्वेद शिक्षण, संशोधन, कौशल्यविकास आणि आंतरराष्ट्रीय प्रसारासाठी विविध उपक्रम राबविण्याची गरज आहे. आयुर्वेदाच्या प्राचीन ज्ञानाला आधुनिक विज्ञानाची जोड देत सक्षम शिक्षण व संशोधन संस्था उभाराव्यात. आयुर्वेद आणि आधुनिक वैद्यकाने परस्परपूरक पद्धतीने कार्य करून रुग्णांच्या सुरक्षिततेला आणि वैज्ञानिक पुराव्यांना प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले. आयुर्वेदाच्या प्रचार-प्रसारासाठी देशभर विविध उपक्रम राबविण्यात येत असून, आयुर्वेदिक उपचार पद्धतीला राष्ट्रीय उपचार पद्धतीचा दर्जा मिळावा, अशी मागणी विश्व आयुर्वेद परिषद महाराष्ट्राचे अध्यक्ष डा. विनायक तायडे यांनी केली. आयुर्वेदाच्या ज्ञानाचा अधिकाधिक प्रसार करण्यासाठी वैद्य, संशोधक, विद्यार्थी आणि विविध संस्थांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.[illegible]
सुषमा + २ वि. निरंक
पुढील ता.०५.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार

1. Sushma Ashok Bagade [illegible]
2. Minal Ashok Bagade @ Minal Namitkumar Wanare (Name after marriage) [illegible]
3. Monika Ashok Bagade @ Monika Gopal Kashyap (Name after marriage) [illegible]

विरुद्ध

गैरअर्जदार - NIL

[illegible] Ashok Mahipatrao Bagade [illegible] Sushma Ashok Bagade [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible] Sushma Ashok Bagade [illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**जाहीर नोटीस**

माझे पक्षकार निलिन [illegible] मेश्राम, रा. [illegible] नगर नं. ४, [illegible] रोड, अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व आम जनतेस [illegible] जाहीर नोटीस देतो की [illegible]

माझे पक्षकार यांचे वतीने सर्व आम जनतेस सदरच्या जाहिर नोटीसद्वारे सूचित करतो की, [illegible]

अ. मौजे [illegible], ता. चांदूर बाजार, जि.अमरावती येथील भूमापन क्रमांक व उपविभाग [illegible], आकार रु. [illegible] क्षेत्रफळ १ हे. [illegible] आर.

ब. मौजे [illegible], ता. चांदूर बाजार, जि.अमरावती येथील भूमापन क्रमांक व उपविभाग [illegible], आकार रु. १०.[illegible] क्षेत्रफळ १ हे. [illegible] आर.

सदर वरील वर्णन केलेल्या वडिलोपार्जित मालमत्तेमध्ये माझे पक्षकाराला [illegible] हिस्सा आहे. [illegible] खरेदी, विक्री, कर्ज, गहाण, बोजा, [illegible], मृत्युपत्र, व [illegible] व्यवहार करु नये, [illegible] माझे पक्षकार जबाबदार राहणार नाही [illegible] याची नोंद घ्यावी.

करिता ही जाहीर सूचना.

सही/-
राजा एस.झेड अली,
पक्षकारातर्फे अधिवक्ता
(मो.क्र.- ९८९०९०२८०६)

दिनांक - /०९/२०२६
अमरावती

---

**जाहीर नोटीस**

सर्व जनतेस जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहितीनुसार माझ्या पक्षकाराने इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड मध्ये लोन करिता अर्ज केला होता. त्याकरिता रजिस्टर खरेदी क्र.१७५९ दि.२९/१०/१९९८ ह्या तारखेची खरेदी [illegible] नावे श्री मनोहर मोतीरामजी [illegible] ह्यांच्या नावे नमूद असून माझ्या पक्षकाराची सदर ओरिजनल खरेदी क्र. १७५९ राजकमल ते जयस्तंभ चौक या परिसरात गहाळ झालेली आहे. कुणालाही सदर खरेदीपत्र सापडल्यास अथवा कुणी सदर खरेदीबाबत कोणाशीही कायदेशिर व्यवहार, गहाण किंवा खरेदी क्र.१७५९ संबंधात कुठलाही कायदेशिर व्यवहार झाला असेल, तर त्या संबंधीत कागदपत्रे घेऊन ७ दिवसांच्या आंत माझ्याशी संपर्क करावा अन्यथा पुढील परिणामास माझा पक्षकार जबाबदार राहणार नाही, करिता नोटीस.

दिनांक २८/०९/२०२६
अमरावती

आपला विश्वासू
सही/-
गजानन मनोहर [illegible]

ॲड. अनिकेत देशमुख
मो. - [illegible]
इंडिया शेल्टर फायनान्स को.लि. अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.[illegible]/२०२६
सारिका + २ वि. निरंक
पुढील ता.०२.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

[illegible] Sarika Paradiprao Ubhayar [illegible]

गैरअर्जदार - NIL

[illegible] Namdeorao Dapurao Shirsatkar [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**जाहीर नोटीस**

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश -२, यांचे न्यायालय**

[illegible]

APPLICATION UNDER ORDER 5 RULE 20 OF CPC FOR PAPER PUBLICATION AGAINST THE NON APPLICANTS NOS. 1 TO 3 & 5

[illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक (न्यायीक विभाग),
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

[illegible]

---

**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**

जाहिरनामा

[illegible]

---

**जाहीर नोटीस**

[illegible]

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.[illegible]/२०२६
माला वि. निरंक
पुढील ता.०३.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार

1. Smt. Mala Ishwar Umbarkar
Age 58 yrs. Occ.- Housewife
R/o Aura Colony Near Santoshi Mata Mandir [illegible], Amravati

विरुद्ध

गैरअर्जदार - NIL

[illegible] Gaurav Ishwar Umbarkar [illegible] Smt. Mala Ishwar Umbarkar [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible] Smt. Mala Ishwar Umbarkar [illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# दुष्काळदाह

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील भीषण दुष्काळाची दखल घेत अखेर ३५८ पैकी २६५ तालुक्यांत अधिकृत कोरडा दुष्काळ जाहीर केला. राज्याच्या इतिहासातील हा सर्वांत मोठा दुष्काळ आहे. प्रशासकीय निकषांनुसार एवढ्या मोठ्या प्रमाणात एकाच वेळी तालुक्यांची संख्या नोंदवली गेली नव्हती. २०१२-१३ च्या दुष्काळात खरीप हंगामात पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या ८,०२८ गावांमध्ये टंचाई जाहीर झाली होती. त्याआधी ११ जिल्ह्यांतील ६,२५० गावांमध्येही दुष्काळी परिस्थिती जाहीर केली होती. २०१४ मध्ये २२ जिल्ह्यांतील १९ हजार ५९ गावे दुष्काळग्रस्त असल्याचे केंद्राला कळविले होते. २०१५-१६ चा दुष्काळ त्याहून भीषण ठरला. २१ जिल्ह्यांतील १६० तालुके आणि १५ हजार ७४७ गावे दुष्काळग्रस्त घोषित झाली. पुढे २०१८ मध्ये राज्य सरकारने १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला. त्या तुलनेत यंदाच्या २६५ तालुक्यांची संख्या ही आतापर्यंतची सर्वाधिक आहे. जवळपास ७५ टक्के महाराष्ट्र दुष्काळग्रस्त आहे. पावसाच्या सरासरीपेक्षा वितरण महत्त्वाचे असते. पेरणीवेळी पाऊस पडला आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत दडी मारली, तर कागदावरची सरासरी समाधानकारक दिसली, तरी पीक हातचे जाते. १ जून ते २२ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्रात ७८७.२ मिमी. पाऊस झाला. या काळात ९५३.२ मिमी. पाऊस अपेक्षित असतो. म्हणजे राज्याची एकत्रित तूट १७ टक्के आहे; मात्र पावसाच्या लहरीपणामुळे राज्याची सरासरी अनेकदा संकटाचे खरे स्वरूप लपवते. यंदा सोलापूरमध्ये पावसाची तूट सर्वाधिक ५७ टक्के, अहिल्यानगरमध्ये ४२, नंदुरबारमध्ये ३४, लातूरमध्ये ३६, तर सांगलीतील दुष्काळी पट्ट्यात २४ टक्के नोंदली गेली. अल निनोच्या प्रभावामुळे जुलै आणि ऑगस्ट महिन्यात पावसाचा खंड पडल्याने धरणांनी तळ गाठला. या काळात तापमानवाढीमुळे जमिनीतला ओलावाही नष्ट झाला. भूगर्भातील पाणी पातळी वेगाने खाली गेली. विहिरी, कूपनलिका कोरड्या पडल्या. खरिपाला संरक्षित पाणी देणेही अशक्य झाले. सोयाबीन, कापूस, तुरी, बाजरी आणि मका ही प्रमुख खरीप पिके वाळली. अनेक भागांत दुबार पेरणीची वेळ आली, तरी पुरेसा पाऊस न झाल्याने पिकांची उत्पादकता तब्बल ९० टक्क्यांपर्यंत घटली. कर्जे काढून उभी केलेली पिके करपून गेल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. मुख्यमंत्र्यांनी मराठवाडा, विदर्भ दौऱ्यात प्रत्यक्ष बांधावरची परिस्थिती, करपलेले पीक, अन्नदात्याच्या अश्रुपूर्ण वेदना, पिण्याच्या पाण्याचा अतिगंभीर प्रश्न, हे सर्व विदारक चित्र प्रत्यक्ष पाहिले. त्यांनी सरकार मदतीसाठी कसलीही कमतरता ठेवणार नाही असे सांगत बळीराजाला आणि दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा दिला होता. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही कोरडवाहू जिल्ह्यांना पर्जन्यतुटीचा सर्वाधिक फटका बसला. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, सोलापूर, अहिल्यानगर आणि जळगाव या जिल्ह्यांतील बहुतांश तालुके यादीत आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने विविध सवलती लागू केल्या आहेत. यात जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीसंबंधित कर्ज वसुलीस स्थगिती, कृषी पंप वीज बिलात सवलत, पंपांची वीज जोडणी खंडित न करणे, अन्नधान्य सुरक्षितता, चारा छावण्या, पाण्याचे सूक्ष्म नियोजन यांसारख्या १२ उपायांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्कात माफी आणि आवश्यक तेथे टँकर सुरू करण्याचे आदेशही आहेत. दुष्काळाची तीव्रता मोजण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या नियमावलीनुसार आधुनिक उपग्रह प्रणालीची मदत घेण्यात आली. पिकांचे नुकसान, वनस्पती निर्देशांक आणि जमिनीतील ओलावा या घटकांची पडताळणी करून ट्रिगर-१ अंतर्गत खरीप हंगामातील पीकहानीची अधिकृत नोंद केली. या आधारेच गंभीर स्वरूपाचा दुष्काळ घोषित केला आहे. खरीप वाया गेल्याने आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाल्यामुळे ग्रामीण भागातील अर्थचक्र ठप्प आहे. बाधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी आणि राज्य आपत्ती निवारण निधीच्या निकषांनुसार सानुग्रह अनुदान देण्याची प्रक्रिया प्रशासकीय स्तरावर सुरू केली आहे. तसेच पीक विमा योजनेंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि प्रतिकूल हवामान या घटकांनुसार विमाधारक शेतकऱ्यांना आगाऊ नुकसान भरपाई देण्याचे निर्देशही महसूल प्रशासनाने दिलेत. पीक नुकसानीपोटी थेट मिळणाऱ्या आर्थिक अनुदानाबाबत विहित तांत्रिक कार्यपद्धती पूर्ण होताच स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे थेट बँक खात्यात आर्थिक मदत जमा केली जाईल, असेही आदेशात स्पष्ट केले आहे. १९७२ च्या दुष्काळावेळी राज्याकडे अन्नधान्याची प्रचंड कमतरता होती. तुलनेत आज धान्याची उपलब्धता असली, तरी खरीपाचे नुकसान पाहता आगामी काळात अन्नधान्य टंचाई निर्माण होऊ शकते. दुष्काळाचे दुष्टचक्र भयावह असते. शेतीतील उत्पन्न घटले की, शेतमजूर रोजगारहीन होतो, ग्रामीण भागात व्यावसायिकांचे उत्पन्न घटते, कर्ज वाढते, पाणी आणि चाऱ्याअभावी जनावरे विकली जातात आणि अंतिमतः जगण्याच्या संघर्षात टिकून राहण्यासाठी कुटुंबांचे शहरांकडे स्थलांतर सुरू होते. मुलांचे शिक्षण खंडित होते, शहरांतील रोजगारावर दबाव वाढतो. २०१२, २०१५ आणि २०१८च्या दुष्काळांनी महाराष्ट्राला हा धडा दिला. दुष्काळाची अधिकृत घोषणा लवकर करण्यात फडणवीस सरकारने दाखवलेली संवेदनशीलता दिलासादायक आहे; पण हा संकटाचा शेवट नसून संकट व्यवस्थापनाची सुरुवात आहे. सरकारने रोजगार हमीच्या कामांचे निकष शिथिल करण्याची घोषणा केली आहे. बारा उपायांतील कदाचित हाच सर्वांत दूरगामी ठरू शकतो. महाराष्ट्रात मनरेगाअंतर्गत ८४ लाखांहून अधिक सक्रिय कामगारांची नोंद आहे. दुष्काळी तालुक्यांमध्ये कामाची मागणी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रत्येक ग्रामपंचायतीत कामांचा तयार आराखडा हवा. नाला खोलीकरण, शेततळी, पाझर तलाव दुरुस्ती, गाळ काढणे, मृदसंधारण, वृक्षसंवर्धन आणि जलपुनर्भरण अशी कामे सुरू करता येतील. यामुळे मजुरांच्या हाताला पैसा मिळेल आणि उद्या गावाची पाणी साठवण क्षमता वाढेल. नुकसानभरपाईचे पैसे लवकर खात्यात पोहोचले पाहिजेत. यासाठी निकषांच्या कचाट्यात शेतकऱ्याला अडकवू नये. भाडेतत्त्वावर शेती करणारे, अल्पभूधारक, शेतमजूर आणि पशुपालक यांचाही दुष्काळी मदत आराखड्यात स्वतंत्र विचार करावा लागेल. रब्बीची पेरणी होण्याच्या शक्यता मावळल्या आहेत. अल निनो 'अतितीव्र' होण्याची शक्यता आहे. दुष्काळग्रस्तांठी उपाययोजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा भार पडणार आहे. केंद्र सरकारकडून भरीव मदत गरजेची आहे. कारण, या दुष्काळाचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल आणि दूरगामी परिणाम होणार आहेत. राज्य सरकारने शीघ्र गतीने घेतलेला पुढाकार स्वागतार्ह असला, तरी खरी कसोटी आता सुरू झाली आहे.

# दुष्काळातून आपण कधी शिकणार?

**दुष्काळाकडे बघण्याचा आपल्या शासन आणि प्रशासन व्यवस्थेचा दृष्टिकोनच मुळात सदोष आणि अपुरा आहे. महाराष्ट्रात आणि भारतात हे चित्र दिसते, मग जगात काय होते? भारतासाठी उत्तर शोधताना आपल्याला दुसऱ्या देशाची व्यवस्था जशीच्या तशी उचलायची गरज नाही. पण वेगवेगळ्या देशांनी या समस्येचे वेगवेगळे भाग कसे सोडवले आहेत, हे आपल्यासाठी उपयोगाचे ठरू शकते.**

आपल्याला दुष्काळ मोजण्याची पद्धतच बदलावी लागेल. 'यंदा पाऊस किती कमी झाला?' हा आपला नेहमीचाच प्रश्न. बदलत्या हवामानाच्या काळात हा प्रश्न अपुरा आहे.दुष्काळ म्हणजे केवळ पावसाची तूट नाही. पाऊस कधी पडला नाही, किती दिवसांचा खंड पडला, त्या वेळी पिकाची अवस्था काय होती, जमिनीत किती ओलावा होता, तापमान किती होते, भूजल किती खाली गेले आणि जलाशयांमध्ये किती पाणी उरले या सगळ्यांचा शेतीवर एकत्रित परिणाम होतो. नंतर दुष्काळाचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पडसाद उमटतात.सोयाबीन उगवण्याआधीचा २० दिवसांचा पावसाचा खंड आणि फुलोऱ्याच्या वेळी आलेला २० दिवसांचा खंड एकसारखा असू शकत नाही. पावसाची तूट दोन्हीकडे समान असली तरी पिकाचं नुकसान वेगळे असू शकते. म्हणून अपुरा पाऊस (Rainfall Deficit) आणि पिकांचा दुष्काळ (Agricultural Drought) या दोन गोष्टी वेगळ्या आहेत.

### ऑस्ट्रेलियाचे मॉडेल दिशादर्शक

ऑस्ट्रेलियाने याच दिशेने महत्त्वाचे काम केले आहे. तिथल्या Australian Agricultural Drought Indicatorमध्ये केवळ हवामानाची माहिती वापरली जात नाही; तर हवामानाची माहिती कृषी मॉडेल्ससोबत जोडून पिकांचं उत्पादन, कुरणांची वाढ आणि शेती व्यवसायाच्या नफ्यावर होणारा संभाव्य परिणाम मोजण्याचा प्रयत्न केला जातो. ही माहिती हवामानविषयक ऐतिहासिक माहिती आणि हंगामी अंदाज वापरून पुढे पाहणारी आहे आणि सुमारे पाच किलोमीटरच्या रेसोलुशनवर तयार केली जाते.

आपल्यालाही असेच काहीसे करता येईल. प्रत्येक गाव किंवा महसूल मंडळासाठी एक Climate and Crop Stress Index असू शकतो. त्यात किमान पुढील घटक असावेत.पाऊस, सलग कोरडा कालखंड, मातीतील ओलावा, तापमान, भूजल, जलाशयातील पाणी, उपग्रहातून दिसणारी पिकांची स्थिती, पिकांची अवस्था. हा निर्देशांक फक्त 'दुष्काळ आहे' किंवा 'दुष्काळ नाही' एवढेच सांगणार नाही. तर ताण किती आहे, कुठे आहे आणि तो वाढतोय की कमी होतोय, याचाही आढावा घ्यावा लागेल.

सध्या आपली प्रशासकीय प्रक्रिया नुकसान झाल्यानंतर सुरू होते. ही व्यवस्था कालबाह्य आणि किडलेली आहे. हवामान बदलाच्या काळात भारत सारख्या देशाला या व्यवस्थेत आमूलाग्र परिवर्तन करावे लागेल. उद्याची व्यवस्था स्थायी आणि नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाल्यापासून सुरू व्हायला हवी. लहान कोरडवाहू भोगवटादार यांना डोळ्यासमोर ठेवावे लागेल.थातुरमातुर मदत, लाह्या-फुटाणे वगैरे चिल्लर कार्यक्रम बंद करावे लागतील. शेतकऱ्यांनी आणि शेतकऱ्यांसाठी काम करणारे राजकारणी, कार्यकर्ते, यांनीही आता डोळस होऊन अभ्यास करणे गरजेचे. आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे 'मराठवाड्याच्या पुढल्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही,' अशा वल्गना वारंवार डोक्याला कुठलासा फेटा घालून परत परत करणेही राज्यकर्त्यांना थांबवावे लागेल. गंभीरपणी दीर्घकालीन धोरणे आणि उपाय योजना यांवर व्यापक विचार होणे गरजेचे आहे.

### धाराशिवचे बोलके उदाहरण

या प्रश्नाचे दुसरे टोक धाराशिवमध्येच दिसते.

२०१९ किंवा २०२०च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत भरपाई मागितली. पण अनेक दावे ७२ तासांच्या आत नुकसान कळवलं नाही, या कारणावरून नाकारण्यात आले.अतिवृष्टीमुळे दूरध्वनी सेवा विस्कळीत झाल्याने अनेक शेतकऱ्यांना ७२ तासांत नुकसान कळवणे शक्य नव्हते, हा मुद्दाही न्यायालयासमोर आला. प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात गेले. ६ मे २०२२ रोजी न्यायालयाने २०२०च्या खरीप सोयाबीनच्या काढणीनंतरच्या नुकसानीसाठी उर्वरित ३,५७,२८७ शेतकऱ्यांना भरपाई देण्याचे आदेश दिले.विमा कंपनीने सहा आठवड्यांत पैसे न





दिल्यास राज्य सरकारने ती रक्कम द्यावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.या प्रकरणाचा धडा केवळ इतकाच नाही की विमा कंपनीने पैसे दिले की नाही. प्रश्न असा आहे की, विमा भरलेला असूनही नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्याला आपलेच नुकसान सिद्ध करण्यासाठी न्यायालयात का जावे लागले? पीकविमा हा शेतकऱ्याचा हवामानातील धोका कमी करण्यासाठी असतो. पण जर तो नुकसान झाल्यानंतर ७२ तासांच्या अहवालात, पंचनाम्यात, कागदपत्रांत, उंबरठा उत्पादन आणि विविध प्रक्रियांमध्ये अडकला, तर विम्याची मूलभूत कल्पनाच कमकुवत होते.

धाराशिवच्याच पुढील प्रकरणांनी या व्यवस्थेची आणखी एक बाजू दाखवली. २०२१ च्या विमा हक्कांबाबत न्यायालयासमोर विमा कंपनीने उंबरठा उत्पादन आणि पीक कापणी प्रयोग यांच्या आकडेवारीवर आधारित युक्तिवाद केला. म्हणजे शेतकऱ्याच्या शेतात काय झाले यापेक्षा कोणता सांख्यिक निकष लागू होतो, हा प्रश्न निर्णायक ठरू शकतो. इथे प्रश्न असा आहे की आपण शेतकऱ्याला हवामानाच्या जोखिमेपासून वाचवण्यासाठी विमा देतो आहोत की नुकसान झाल्यानंतर नुकसान सिद्ध करण्याची आणखी एक प्रशासकीय व्यवस्था उभी करतो आहोत?

### इतर देशांनी काय केले?

महाराष्ट्रात आणि भारतात हे चित्र दिसते, मग जगात काय होतं?

भारतासाठी उत्तर शोधताना आपल्याला दुसऱ्या देशाची व्यवस्था जशीच्या तशी उचलायची गरज नाही. पण वेगवेगळ्या देशांनी या समस्येचे वेगवेगळे भाग कसे सोडवले आहेत, हे आपल्यासाठी उपयोगाचे ठरू शकते.

ऑस्ट्रेलियाचा धडा असा आहे, की दुष्काळाची वाट पाहून सरकारची व्यवस्था सुरू होत नाही. ऑस्ट्रेलियन शेती दुष्काळ संकेतांक (Australian Agricultural Drought Indicators) हवामानाची माहिती कृषी आणि आर्थिक मॉडेल्सशी जोडतात. त्यातून पिकांच्या उत्पादनावर, कुरणांच्या वाढीवर आणि शेतीच्या नफ्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अंदाज घेता येतो. त्याहून महत्त्वाचं म्हणजे केंद्र, राज्य आणि प्रादेशिक सरकारांनी एक व्यापक राष्ट्रीय करार २०२४-२९ या कालावधीसाठी केला. त्यात दुष्काळापूर्वीची तयारी, दुष्काळातील प्रतिसाद आणि दुष्काळानंतरची पुनर्बांधणी यांची जबाबदारी आणि समन्वय स्पष्ट केला आहे.

प्रगतीचे वार्षिक सनियंत्रण (Monitoring) आणि सार्वजनिक नोंद (Public Reporting) करण्याचीही व्यवस्था आहे. आपल्यासाठी धडा हा आहे की दुष्काळ (कोरडा अथवा ओला) आला की काय करायचे, हे दुष्काळाच्या वेळी ठरवू नये. कधी कोणता ट्रिगर लागेल आणि त्यानंतर कोणत्या सरकारी यंत्रणेने काय करायचे, हे आधीच ठरलेले असावे. आपल्याकडे दुष्काळास नैसर्गिक आपत्ती म्हणून पहिल्या जाते. वास्तविक, आपली व्यवस्था कमकुवत आहे, त्याची ही पावती आहे. नैसर्गिक आपत्ती अशी काही गोष्ट नसते. निसर्गाचे चक्र असते. नव्या साधनांनी त्याची माहिती अचूक मिळते. आपल्या सरकारला ती माहिती वापरायची नसते. आपल्या नेत्यांना ती समजत नाही किंवा वापरता येत नाही किंवा हितसंबंध आड येतात, ही मुख्य गोम आहे.

केनियासारख्या लहान देशात तर उपग्रहाने धोका ओळखला की पैसे शेतकऱ्याच्या खात्यावर जमा करण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. उपग्रह आणि हवामान केंद्रांतील माहिती वापरून काही कृषी विमा उत्पादने शेतकऱ्यांच्या हवामानाच्या जोखमीशी जोडली गेली आहेत. हा देश आपल्यापेक्षा कितीतरी लहान.ग्वाटेमालामध्ये २०२१पासून सरकारने शेती करणाऱ्या कुटुंबासाठी Catastrophic Parametric Insur हमची व्यवस्था सुरू केली. सरकार मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना एकत्रित करून एक विमा पॉलिसी घेते आणि त्याचा हप्ता (प्रीमियम) सरकारच भरते. इथे प्रत्यक्ष पीक नुकसान मोजून प्रत्येक शेताचा पंचनामा करण्याऐवजी, उदाहरणार्थ उपग्रहाने मोजलेला पाऊस ठरावीक पातळीच्या खाली गेला की विमा सक्रिय होतो. त्यानंतर विमा कंपनी लाभार्थी शेतकऱ्यांना थेट पैसे देते. २०२३पर्यंत या कार्यक्रमाने सुमारे एक लाख कुटुंबांना संरक्षण दि होतं. अर्थात, या व्यवस्थेलाही मर्यादा आहेत. पण लहान शेतकऱ्याने एकट्याने जोखीम उचलण्याऐवजी राज्याने सामूहिक हवामान जोखीम संरक्षक कवच उभारणे, ही यातली कल्पना महत्त्वाची आहे.

ब्राझीलच्या Proagro व्यवस्थेत हवामान, कीड किंवा रोगामुळे शेतीचे नुकसान झाल्यास शेतकऱ्याच्या पीककर्जावरील आर्थिक जबाबदारी कमी करण्याची तरतूद आहे. काही परिस्थितींमध्ये शेतकऱ्याने केलेल्या स्वतःच्या उत्पादनखर्चाचेही संरक्षण केले जाते. हा भारतासाठी महत्त्वाचा धडा आहे. कारण शेतकऱ्याच्या दृष्टीने पीकनुकसान आणि कर्ज ही दोन वेगळी संकटे नाहीत. पीक गेले म्हणजे कर्ज फेडण्याची क्षमता जाते. म्हणून हवामानाचा ट्रिगर लागला तर पीकभरपाईबरोबरच पीककर्जाची पुनर्बांधणी, आणि त्या कर्जाच्या परतफेडीवर मोरॅटोरियम आणि पुढच्या हंगामासाठी नवीन कर्ज यांचा विचार एकाच व्यवस्थेत व्हायला हवा.

### निर्णयासाठी सार्वजनिक व्यवस्था

आपल्याकडे या व्यवस्थेसाठी आवश्यक असलेली अनेक साधनं आधीपासून आहेत. भारतीय हवामान विभागाकडे (आयएमडी) पावसाची माहिती आहे. उपग्रह आहेत. भूजलाची माहिती आहे. जलाशयांची माहिती आहे. पीक कापणी प्रयोग आहेत. पंतप्रधान पीकविमा योजना आहे. बँकिंगची डिजिटल पायाभूत व्यवस्था आहे. आधार-संलग्न खात्यांद्वारे थेट पैसे देण्याची क्षमता आहे. प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही. ही सगळी माहिती एकत्र करून निर्णय घेणारी सार्वजनिक व्यवस्था आपण उभी केली पाहिजे. म्हणजे एक हवामान-ते-मदत (Climate-to-Compensation System) अशी पारदर्शी स्थायी व्यवस्था हवी. त्यात अन्य कारणांमुळे होणारे पिकांचे नुकसान - जसे की किडींच्या प्रादुर्भावामुळे, किंवा कमी दर्जाचे बियाणे वापरल्यामुळे - यांचा सुद्धा विचार असावा.

### या व्यवस्थेची रचना साधी असू शकते

सतत निरीक्षण-गाव किंवा महसूल मंडळ पातळीवर पाऊस, पावसातील खंड, जमनीतील ओलावा, तापमान, भूजल, जलाशयांतील साठा, उपग्रहाच्या आधारे पिकांच्या स्थितीची नोंद आणि पिकाच्या वाढीची अवस्था यांची माहिती एकत्रित केली पाहिजे.

नुकसानाचा अंदाज-हवामान आणि पिकांच्या मॉडेलच्या आधारे पुढच्या काही आठवड्यांत किंवा महिन्यांत पिकाच्या उत्पादनावर किती परिणाम होऊ शकतो, याचा संभाव्यता नकाशा (प्रोबॅबिलिटी मॅप) तयार केला पाहिजे. म्हणजे सरकारला हंगाम संपल्यानंतर 'किती नुकसान झाले?' एवढेच समजणार नाही तर हंगाम सुरू असतानाच 'कुठे किती नुकसान होण्याची शक्यता आहे?' हे समजेल.

**ठरावीक मर्यादा ओलांडली की कृती** -पावसातील तूट किंवा पिकावरचा ताण ठरावीक पातळीवर पोहोचला की सरकारची प्रक्रिया आपोआप सुरू झाली पाहिजे. **पहिल्या पातळीवर -** कृषी सल्ला आणि पाणी व्यवस्थापन.

**पुढच्या पातळीवर -** कर्जाची परतफेड पुढे ढकलणे, रोजगाराच्या कामांची तयारी, चारा आणि पाण्याची व्यवस्था. आणखी गंभीर ताणात अंतरिम नुकसानभरपाई देणे. प्रत्येक वेळी नवीन अधिसूचना, नवा शासन निर्णय किंवा मंत्रिमंडळाची वाट पाहण्याची गरज नसावी.

**आधी अंतरिम पैसा-** उपग्रह आणि हवामान आधारित ट्रिगरने मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता दर्शवली तर शेतकऱ्याला एक अंतरिम रक्कम थेट खात्यात देता येईल. नंतर शेतात जाऊन केलेली पाहणी, पीक कापणी प्रयोग किंवा इतर प्रत्यक्ष पडताळणीच्या आधारे अंतिम नुकसान ठरवता येईल. त्यामुळे पंचनामा संपुष्टात आणण्याचे कारण नाही, पण पंचनामा हा मदत मिळण्याचा पहिला दरवाजा राहणार नाही.

**प्रत्यक्ष पडताळणी आणि अंतिम भरपाई** -Parametric प्रणाली पूर्णपणे अचूक असतेच असं नाही. त्यामुळे अंतिम भरपाईसाठी प्रत्यक्ष केलेली पडताळणी आवश्यक असेल. पण ही पडताळणी अंतरिम मदतीनंतरची प्रक्रिया असू शकते.

**प्रत्येक हंगामातून शिकणे -** दुष्काळ संपला आणि फाइल बंद झाली, अशी व्यवस्था नको. प्रत्येक हंगामानंतर सार्वजनिक अहवाल हवा. ब्रिटिश काळात असे अहवाल दार वर्षी विभागनिहाय निघत. त्यांचा आजही संशोधनात बराच उपयोग आहे. आपले अधिकारी नुसते बडबड करीत, फाइल हातात ठेवून, मंत्र्यांमागे असतात. त्यांना शेतकऱ्यांमध्ये कमी आणि बदल्या व नियुक्त्यांमध्ये अधिक रस असतो. त्यांच्याकडून हे होणार नाही. त्यासाठी नवी व्यवस्था उभारावी लागेल. त्यात शेतकऱ्यांचा सहभाग हवा. म्हणजे प्रत्येक दुष्काळ पुढच्या दुष्काळासाठी नवा डेटा आणि नवी दृष्टी निर्माण करेल.

याचा अर्थ असा नाही, की जिल्हाधिकारी, तहसीलदार किंवा महसूल यंत्रणेची गरज उरणार नाही. किंवा सगळा निर्णय उपग्रह घेईल. उलट, स्थानिक प्रशासनाची भूमिका अधिक महत्त्वाची होईल. पण त्यांची भूमिका 'नुकसान झाले की पंचनामा करणाऱ्या यंत्रणे'पासून 'हवामानाच्या ताणाचा सतत मागोवा घेणाऱ्या यंत्रणेत' बदलावी लागेल.

गावातील शेतकरी, हवामान केंद्र, कृषी अधिकारी, जलसंपदा विभाग, महसूल यंत्रणा, विमा कंपनी आणि बँक असे सगळे घटक एका माहिती व्यवस्थेत जोडले गेले पाहिजेत.दुष्काळाचा परिणामही एकाच विभागापुरता राहत नाही. म्हणून त्यावर तोडगा आणि प्रतिसादही एकात्मिक असायला हवा. पाणी, पीक, कर्ज, रोजगार आणि पशुधन या पाचही गोष्टी एका हवामान प्रतिसाद व्यवस्थेमध्ये आल्या पाहिजेत.(उत्तरार्ध)

**जयदीप हर्डीकर**
jaideep@ruralindianonline.org

## हाडपक्या गणपती

नागपूरचा २३९ वर्षांचा ऐतिहासिक वारसा - हाडपक्या गणपती.पितृपक्षात शुभकार्य टाळले जाते, पण विदर्भात २३९ वर्षांपासून हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा होतो.१७८७ मध्ये भोसले घराण्याचे खंडोजी महाराज (चिमणाबापू) बंगाल स्वारीवरून विजयी होऊन परतले. तेव्हा गणेशोत्सव संपला होता, म्हणून त्यांनी विद्वानांशी चर्चा करून भाद्रपद कृष्ण चतुर्थीला गणपती बसवला. बंगाल विजयाचा आनंदोत्सव म्हणून याला विजयोत्सवही म्हणतात.विदर्भात पितृपक्षाला 'हाडपक' म्हणतात, म्हणून हाडपक्या गणपती. यावेळी लावण्या, भारूड, खडीगंमत, नकला असे मनोरंजनाचे कार्यक्रम व्हायचे, त्यात मस्करी व्हायची म्हणून 'मस्कऱ्या गणपती' नाव पडले. या गणपतीला १८ हात असतात - १४ हात महालक्ष्मीचे आणि ४ गणपतीचे असे मानले जाते. मुख्य सोहळा नागपूरच्या भोसले राजवाडा, महाल येथे होतो. १० दिवस चालणाऱ्या या उत्सवाची सांगता द्वादशीला विसर्जनाने होते. लोकमान्य टिळकांनी याच उत्सवातून सार्वजनिक गणेशोत्सवाची प्रेरणा घेतल्याचे सांगितले जाते.

**रमेश लांजेवार**

# संवाद

## मैत्रीला संशयाची चौकट का?

स्त्री-पुरुषात मैत्री असू शकते का? या प्रश्नावर आजही समाज पूर्वग्रहातून पाहतो. दोन व्यक्ती मोकळेपणाने बोलत असतील,तर लगेच त्याला प्रेम किंवा अफेअरचे लेबल का लावले जाते? मैत्रीला लिंग नसते. तिचा पाया असतो विश्वास, आदर आणि मर्यादा. प्रत्येक जवळीक प्रेम नसते,प्रत्येक काळजीमागे स्वार्थ नसतो.


चुका होऊ शकतात, मर्यादा ओलांडल्या जाऊ शकतात, म्हणून पारदर्शकता आणि संमती हे निकष महत्त्वाचे.पण काही वाईट अनुभवांवरून प्रत्येक मैत्रीकडे संशयाने पाहणे अन्यायकारक आहे.समाजकार्यात तर स्त्री-पुरुषांनी एकत्र काम करणे अपरिहार्य आहे. बैठका, प्रवास, क्षेत्रभेटी यात संवाद होणारच. त्याकडे संशयाने पाहिले तर कामाचीच कोंडी होईल.कामाचे मूल्यमापन कामावरून व्हावे, अफवांवरून नव्हे. शेवटी आत्मचिंतन महत्त्वाचे - आपण तथ्य तपासतो की अफवेवर विश्वास ठेवतो? आपली नजरच तर चुकीची नाही ना? खरे परिवर्तन समाज बदलण्यापासून नाही, तर स्वतःची नजर बदलण्यापासून सुरू होते.

**प्रफुल्ल मंदा श्रीधर**

# 8,616 मतदारांचे भवितव्य कागदोपत्री पुराव्यांच्या कचाट्यात!

### २००२च्या यादीतील स्पेलिंगच्या चुकांची शिक्षा आजच्या मतदारांना का? दोन नोटिशीनंतर नाव वगळणार असल्याच्या चर्चेने नागरिकांत धाकधूक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी
✦ गौरव तातेड



**बाभुळगाव, दि. २८ :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाची (SIR) प्रक्रिया सुरू असताना बाभुळगाव तालुक्यात तब्बल ८ हजार ६१६ मतदारांचे मॅपिंग झाले नसल्याची माहिती समोर आली आहे. तालुक्यात एकूण ७३ हजार ४४४ मतदार असताना एवढ्या मोठ्या संख्येने मतदार मॅपिंग बाहेर राहिल्याने संबंधित नागरिकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे.

मॅपिंग न झालेल्या मतदारांना बीएलओ मार्फत नोटिसा बजावण्याची प्रक्रिया सुरू असून, पुरावे सादर करण्यासाठी नागरिकांची धावपळ सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, सन २००२ची मतदार यादी ग्राह्य धरली जात असल्याचे सांगितले जात असताना त्या काळातील नोंदीमध्ये झालेल्या नावांच्या स्पेलिंगच्या चुका आता नागरिकांसाठी अडचणीचा विषय ठरत आहेत. टंकलेखन अथवा नोंदणीच्या वेळेस झालेल्या किरकोळ चुका दुरुस्त करण्याऐवजी त्याचा भार सामान्य नागरिकांवर का टाकला जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. मॅपिंग न झालेल्या ८ हजार ६१६ मतदारांना बीएलओ कडून नोटीस बजावण्यात येत आहे. संबंधितांना आवश्यक कागदपत्रे व पुरावे सादर करावे लागणार असल्याचे सांगितले जात आहे. दोन नोटिसानतर नाव मतदार यादीतून वगळले जाईल, अशी चर्चा नागरिकांमध्ये असल्याने अनेक मतदारांमध्ये धाकधूक निर्माण झाली आहे. या प्रक्रियेबाबत प्रशासनाने स्पष्ट आणि अधिकृत माहिती देण्याची मागणीही होत आहे. SIR प्रक्रियेला भारत निवडणूक आयोगाकडून मुदतवाढ मिळाली असली, तरी ग्रामीण भागातील नागरिकांसमोर वेगळेच संकट उभे ठाकले आहे. रोजच्या रोजगारासाठी धडपडणाऱ्या नागरिकांना विविध कागदपत्रे शोधणे, जुन्या नोंदी मिळवणे, त्यातील नावातील तफावत दूर करणे आणि संबंधित कार्यालयांच्या फेऱ्या मारणे भाग पडत आहे.

## रोजीरोटी की पुराव्यांची धावपळ?

**रोजीरोटी व दोन वेळच्या जेवणाची चिंता असलेल्या कुटुंबांना मतदार म्हणून आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी पुन्हा पुन्हा पुरावे का द्यावे लागत आहेत? मतदार यादी तयार करताना झालेल्या जुन्या नोंदीच्या चुका नागरिकांच्या माथी मारणे कितपत योग्य आहे? मॅपिंगची प्रक्रिया नेमकी कोणत्या निकषांवर झाली? ८ हजार ६१६ मतदारांचे मॅपिंग का झाले नाही? संबंधित मतदारांना पूर्वसूचना व मार्गदर्शनाची पुरेशी व्यवस्था करण्यात आली आहे का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कागदपत्रातील किरकोळ तफावतीमुळे एखाद्या पात्र नागरिकाचे मतदानाचे अधिकार धोक्यात येणार नाहीत, याची प्रशासन काय हमी देणार?**

## प्रशासनाने स्पष्टता देण्याची गरज

**मतदार यादी ही लोकशाहीतील नागरिकाच्या मूलभूत सहभागाशी निगडित बाब आहे. त्यामुळे मॅपिंग न झालेल्या प्रत्येक मतदाराला प्रक्रिया, आवश्यक पुरावे, अंतिम मुदत आणि अपील अथवा हरकतीची संधी याबाबत स्पष्ट माहिती देणे गरजेचे आहे. अन्यथा SIRच्या प्रक्रियेमुळे पात्र मतदारांमध्ये अनावश्यक भीती निर्माण होण्याची शक्यता आहे. ८,६१६ मतदारांचे मॅपिंग का झाले नाही, याची जबाबदारी कोणाची? जुन्या नोंदीतील चुका दुरुस्त करण्यासाठी नागरिकांनाच हेलपाटे का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने पारदर्शकपणे देण्याची गरज निर्माण झाली आहे.**

# मृतदेह जाळायलाही जागा नाही! खेमकुंडच्या स्मशानभूमीची दुरवस्था

### ग्रामपंचायतीच्या देखभालीवर संतप्त सवाल..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. २८ :** राळेगाव तालुक्यातील खेमकुंड येथील स्मशानभूमीची दयनीय अवस्था ग्रामपंचायतीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे. आज एका मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमीत जागाच उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना स्वतः झाडे-झुडपे व गवत कापून जागा मोकळी करावी लागली.

स्मशानभूमी परिसरात मोठ्या प्रमाणात झाडाझुडपे वाढली असून नियमित साफसफाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना स्मशानभूमीकडे जाण्यासाठीही योग्य रस्ता नसल्याने गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील शेडची अवस्थाही खराब असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. जन्म-मृत्यूसारख्या मूलभूत बाबींशी संबंधित अत्यावश्यक सुविधा असलेल्या स्मशानभूमीची देखभाल करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? साफसफाई व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध असेल तर तो कुठे खर्च झाला? असे सवाल आता उपस्थित होत आहेत.

> **“स्मशानभूमीची ही अवस्था तातडीने सुधारा अन्यथा पुढील प्रेत अंत्यसंस्कारासाठी थेट ग्रामपंचायत कार्यालयात आणू,” असा संतप्त इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून रस्ता, स्वच्छता, झाडाझुडपे हटविणे, शेड दुरुस्ती व आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी होत आहे.**

## थोडक्यात



### नागपूर कराराची होळी, स्वतंत्र विदर्भासाठी आंदोलन समिती आक्रमक

**केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध**

**यवतमाळ :** स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीने सोमवारी (२८ सप्टेंबर) यवतमाळातील संविधान चौकात नागपूर कराराची जाहीर होळी करून केंद्र व राज्य सरकारचा निषेध केला. स्वतंत्र विदर्भ राज्याचा प्रश्न सातत्याने प्रलंबित ठेवण्यात आल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.आंदोलन समितीच्या म्हणण्यानुसार, स्वतंत्र विदर्भाची मागणी जुनी असून १९३८ मध्ये मध्यप्रांत व वऱ्हाड विधानसभेने स्वतंत्र विदर्भाचा ठराव मंजूर केला होता. त्यानंतर विविध समित्या व आयोगांनी विदर्भ स्वतंत्र राज्यासाठी सक्षम असल्याचे नमूद केल्याचा दावा समितीने केला.१९५३ च्या नागपूर करारानुसार विदर्भाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद, रोजगार, महामंडळे, न्यायव्यवस्था तसेच मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, या करारातील तरतुदींची अपेक्षित अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या नेतृत्वाखाली सकाळी ११ वाजता झालेल्या आंदोलनात जिल्हाध्यक्ष कृष्णराव भोंगाडे, प्रा. हेमंत मुदलियार, गोविंद चव्हाण, डॉ. दिलीप घावडे, विजय निवल, प्रल्हाद भगत, प्रेमाताई पत्रिवार, सोनाली मरगडे, दिलीपसिंह गौतम, बबनराव चौधरी, मनोज चिमेडिया, अरुण जोग यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### ‘वोट चोरी’च्या आरोपांवर काँग्रेसचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा..!

**आंदोलनात पुतळा दहन, वोट चोरीविरोधात काँग्रेसचे आंदोलन**



**यवतमाळ :** मतदार यादीतील फेरफार आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत काँग्रेसने सोमवारी यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन केले.‘वोट चोरी’च्या मुद्द्यावर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आलेल्या या आंदोलनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करून त्यांना पदावरून दूर करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनादरम्यान ज्ञानेश कुमार यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. मतदारांच्या हक्कांशी संबंधित प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी, अशी मागणी काँग्रेस नेत्यांनी केली. विशेष गहन पुनरीक्षण अर्थात SIR प्रक्रियेत मतदारांची नावे वगळण्यासह मतदार यादीतील बदलांबाबत काँग्रेसने गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. पक्षाने या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही केली आहे. यावेळी काँग्रेस नेते सचिन नाईक, आमदार बाळासाहेब मांगुळकर, संजय ठाकरे, अमन निर्बाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष सुरूच राहील असा इशारा आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी दिला.



### यवतमाळ येथे 'जागतिक रेबीज दिन' साजरा..!

**२०३० पर्यंत ‘रेबीजमुक्त यवतमाळ’चा संकल्प.**

**यवतमाळ :** रेबीजसारखा जीवघेणा आजार रोखण्यासाठी केवळ जनजागृती पुरेशी नसून भटक्या कुत्र्यांची नसबंदी आणि पाळीव प्राण्यांचे लसीकरण प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हा महिला व बाल रुग्णालयात २८ सप्टेंबर रोजी जागतिक रेबीज दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी २०३० पर्यंत रेबीजमुक्त यवतमाळ करण्याचा संकल्प करण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात बाभुळगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संघर्ष राठोड यांनी रेबीजचा धोका, कुत्रा चावल्यानंतरची प्रथमोपचार पद्धत आणि लसीकरणाचे महत्त्व स्पष्ट केले. वेळेवर उपचार घेतल्यास रेबीज टाळता येतो, असे त्यांनी सांगितले. डॉ. राठोड यांनी भटक्या प्राण्यांची नसबंदी, पाळीव प्राण्यांचे लसीकरण आणि जनजागृती या त्रिसूत्रीवर भर दिला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी ग्रामीण भागातही विशेष मोहीम सुरू असून रेबीज प्रतिबंधक लस मुबलक उपलब्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमास आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# महसूल मंत्री बावनकुळे यांनी केली हिवरा(सं) शिवारात पिकाची पाहणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २८ :** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी(दि.२८सप्टेंबर) रोजी हिवरा (संगम) शिवारात शेतकऱ्याच्या शेतात भेट देवून पिकाची पाहणी करून प्रशासनाला शेतकऱ्यांना मदत मिळण्यास कोणतीही अडचण येवू नये याची खबदारी घेण्याच्या सुचना केल्या.

पावसा अभावी शेतातील पिके सुकून गेल्याने शेतकऱ्यांवर अस्मानी संकट कोसळले आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी राज्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला असताना जिल्ह्यातील १६ ही तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले. त्याच अनुषंगाने जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले महसूलमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी महागाव तालुक्यातील हिवरा (संगम )येथील लक्ष्मण नारायण कदम यांच्या शेतात भेट देऊन सोयाबीन पिकाची पाहणी करून शेतकऱ्यांसोबत संवाद साधुन शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर उभे असल्याचे आश्वासन देत, आलेल्या परिस्थितीमुळे हतबल होऊन शेतकऱ्यांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये असे आवाहन करून शेतकऱ्यांना दुष्काळी मदत मिळण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये याची खबरदारी घेण्याच्या सुचना महसुल व कृषी विभागाला दिल्या आहेत. यावेळी त्यांच्या सोबत आमदार किसनराव वानखेडे,आ.राजु तोडसाम,भाजपा अनुसूचित जमाती प्रदेश उपाध्यक्षा आरती फुफाटे,नितीन भुतडा, भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा जयश्री राठोड, माजी जि. प.सदस्य साहेबराव पाटील कदम,उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, परिविक्षाधीन उपविभागीय अधिकारी ओंकार एकाळे ,तहसीलदार अभय मस्के,तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले, गटविकास अधिकारी तुळशीराम चव्हाण ,मंडळ अधिकारी एम.एकुलवार,कृषी पर्यवेक्षक पाईकराव,कृषी सहाय्यक एस.आर. केंद्रे,तलाठी मनोज वाघमारे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भ्रष्टाचाराच्या आरोपातील अधिकाऱ्यांकडून ध्वजारोहण का?- जगदीश नरवाडे



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २८ :** महसूल विभागातील भ्रष्टाचार व लाचलुचपत प्रकरणात दोष सिद्ध झालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावे. तसेच अशा व्यक्तींना शासकीय ध्वजारोहणासह प्रतिष्ठेच्या जबाबदाऱ्या देऊ नयेत,अशी मागणी जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश उत्तमराव नरवाडे यांनी महसूल मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली.

महसूल विभागाचा थेट संबंध शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांशी असल्याने भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये तातडीने आणि पारदर्शक कारवाई होणे आवश्यक आहे. दोष सिद्ध झालेल्यांना नियमानुसार देय नसलेले शासकीय लाभ, पदोन्नती व इतर सेवा लाभ रोखावेत, तसेच गंभीर प्रकरणांत कायद्यानुसार मालमत्ता जप्तीची कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली. प्रलंबित विभागीय चौकशा निश्चित कालमर्यादेत पूर्ण करून दोषींवर निर्णय घेणे बंधनकारक करावे, अशी मागणी नरवाडे यांनी केली. लाचलुचपत प्रकरणातील दोषी व्यक्तींच्या हस्ते ध्वजारोहण करणे म्हणजे शहीदाच्या त्यागाचा अवमान आहे.असे त्यांनी नमूद केले. यावेळी सुदामजी खंदारे, अतुल शिंदे, पवन फाळके, चेतन चौरे, सतीश मेहता उपस्थित होते.

# आदिलाबाद-वाशिम रेल्वे मार्ग काळी दौ.मार्गेच जावा,खासदाराकडे मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २८ :** केंद्र सरकारच्या प्रस्तावित आदिलाबाद–माहूर–पोहरादेवी–वाशिम या सुमारे १८५ कि.मी. नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाला काळी दौ. मार्गे वळसा देण्याची मागणी पुढे आली आहे.

सामाजिक कार्यकर्ते संदेश रणवीर यांनी यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख यांची दिग्रस येथे भेट घेऊन निवेदन सादर केले असून, रेल्वे मंत्रालयाकडे ठोस पाठपुरावा करण्याची मागणी केली. काळी दौ. परिसरातून ब्रिटिशकालीन वर्धा–नांदेड रेल्वे मार्ग पूर्वी अस्तित्वात होता. येथे रेल्वे स्थानकही होते. तसेच हिवरी येथील ऐतिहासिक कोल्हापुरी बंधारा आजही या जुन्या मार्गाची साक्ष देतो. रेल्वे मंत्रालयाच्या जुन्या मालकीची जमीन उपलब्ध असल्याने नव्याने भूसंपादनाचा खर्च वाचू शकतो, असा दावा रणवीर यांनी केला. सध्याचा मार्ग काळी दौ.ऐवजी पुसदमार्गे दिग्रसकडे वळल्याने काटखेडा, कासोळा, हिवरी, काळी दौलत, तुळशीनगर, वसंतनगरसह २० ते २५ गावांवर अन्याय झाल्याचे त्यांनी म्हटले. काळी दौ.मार्गे मार्ग झाल्यास शेतमालाला बाजारपेठ, यात्रेकरूंना रेल्वे सुविधा आणि यवतमाळ, वाशिम, नांदेड, किनवट व आदिलाबाद भागाच्या विकासाला चालना मिळेल, असा दावा करण्यात आला. १४ जून २०२४ रोजी दिलेल्या निवेदनाचीही आठवण करून देत रणवीर यांनी खासदारांकडून पुन्हा पाठपुराव्याची अपेक्षा व्यक्त केली.

# उमरखेड स्फोट घटनेप्रकरणी एमआयएमची चौकशीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २८ :** उमरखेड तालुक्यातील ढाणकी रोड येथे दि.२६ रोजी झालेल्या स्फोटाच्या घटनेप्रकरणी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) तर्फे यवतमाळ जिल्हाध्यक्ष सय्यद इरफान यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाल्याचे नमूद करून या घटनेची सखोल चौकशी व दोषींवर सक्त कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात वैध परवाना (Valid Licence) नसताना मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ पुरविणाऱ्या व्यक्तींची चौकशी करून संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करणे, उमरखेड तालुक्यात स्फोटक पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहनांची व परवान्यांची तपासणी तथा वैध परवाना नसलेल्या वाहनांवर कारवाई करून लोकवस्तीच्या परिसरात अशा वाहनांना प्रतिबंध करने.अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना उमरखेड येथील शासकीय रुग्णालयात आवश्यक उपचार वेळेवर मिळाले का, याची चौकशी करने व या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसांना व कुटुंबीयांना शासनाकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी सामील आहे. निवेदन देताना एम आय एम जिल्हा अध्यक्ष सय्यद इरफान ,शहराध्यक्ष सय्यद अफसर, ॲड.सय्यद इलियास, गाजी असर, अब्दु समद प्रिंस, शेख इनायत, इरफान खान, इमरान शेख,अयूब भाई, ताहेर शेख, सय्यद सरफराज, शेख वसीम, शेख जबूर, शेख अज़ीम, शेख इबाद सह अन्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

### मुकूटबन रेल्वे थाबा सुरू करिता रेल रोको आंदोलन..

**झरी-मुकूटबन , दि. २८ :** रेल्वे स्थानकावर प्रमुख प्रवासी गाड्यांना नियमित थांबा मिळावा, या मागणीसाठी ५ ऑक्टोबर २०२६ रोजी रेल रोको आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनाचे नेतृत्व आमदार संजय देरकर करणार आहेत. मुकूटबन व परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, कर्मचारी आणि नागरिक रेल्वे प्रवासावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. मात्र, प्रमुख गाड्यांना थांबा नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. या मागणीसंदर्भात प्रशासनाचे यापूर्वीही लक्ष वेधण्यात आले असून, आवश्यक गाड्यांना तातडीने नियमित थांबा मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. आंदोलनात परिसरातील विविध गावांतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे

# पेकर्डा येथे एचआयव्ही तपासणी व जनजागृती मोहीम..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दारव्हा, दि. २८ :** दारव्हा तालुक्यातील पेकर्डा येथे एचआयव्ही/एड्सबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आज दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी पेकर्डा येथे नागरिकांना एचआयव्ही तपासणी, समुपदेशन व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत माहिती सह मोहीम राबविण्यात आली. दारव्हा उपजिल्हा रुग्णालयातील एचआयव्ही समुपदेशन व तपासणी केंद्र (ICTC) येथे एचआयव्हीची मोफत तपासणी व समुपदेशन उपलब्ध असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. एचआयव्हीची तपासणी गोपनीय पद्धतीने करण्यात येत असून, आवश्यकतेनुसार संबंधितांना पुढील संदर्भसेवाही उपलब्ध करून दिली जाते. उपजिल्हा रुग्णालय, दारव्हा येथील प्रवीण नगराळे

समुपदेशक यांनी नागरिकांना ही माहिती दिली. एचआयव्ही संसर्गित व्यक्तीसोबत असुरक्षित शारीरिक संबंध, गुप्तरोग किंवा टी.बी.चा आजार, दूषित सुई अथवा सिरिंजचा वापर, संक्रमित रक्त किंवा रक्तघटकांचे संक्रमण तसेच गर्भावस्थेच्या परिस्थितीत एचआयव्ही तपासणी करून घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी एचआयव्हीबाबत असलेले गैरसमज दूर करून वेळेवर तपासणी व योग्य समुपदेशन घेण्याचे आवाहन करण्यात आले. एचआयव्ही/एड्सविषयी अधिक माहितीसाठी १०९७ या राष्ट्रीय एड्स हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधता येतो, अशी माहितीही देण्यात आली. या जनजागृती कार्यक्रमावेळी पेकर्डा येथील सरपंच गजानन चौधरी, आशा स्वयंसेविका अंतकला मोहाडे, सामाजिक कार्यकर्ता बिमोद मुधाने तसेच गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# मोकाट जनावरे,खड्डे, अस्वच्छतेच्या मुद्द्याची प्रशासनाकडून दखल..!

### सहाय्यक जिल्हाधिकारी रेवैय्याह डोंगरे करणार शहराची पाहणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २८ :** पांढरकवडा शहरातील प्रलंबित नागरी प्रश्नांवर युवा टायगर फोर्सने प्रशासनाचे लक्ष वेधल्यानंतर आता प्रशासनाने दखल घेतली आहे. मोकाट जनावरे, खड्डेमय रस्ते, कचरा व अस्वच्छता, डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधक फवारणी, बंद पथदिवे, वाहतूक कोंडी, वीजपुरवठा तसेच आरोग्य सुविधांबाबत ३० सप्टेंबर रोजी सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार आहे.

सहाय्यक जिल्हाधिकारी रेवैय्याह डोंगरे शहरातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार असून, यावेळी आढळणाऱ्या समस्यांवर संबंधित विभागांना आवश्यक सूचना दिल्या जाणार आहेत. मोकाट जनावरांच्या प्रश्ना सोबत किशोर बालमुकुंद पिपलवा यांच्या मृत्यूचा मुद्दाही निवेदनातून मांडण्यात आला. मोकाट जनावरांवर नियंत्रणासाठी नगरपरिषदेने केलेल्या उपाययोजना आणि पूर्वीच्या तक्रारींवरील कार्यवाहीचा आढावा घेण्याची मागणी करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयातील ट्रॉमा केअर, डायलिसिस, वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी व स्वच्छतेच्या प्रश्नावरही संघटनेने प्रशासनाला जाब विचारला. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विशेष स्वच्छता, फवारणी, पथदिवे व वाहतूक नियोजनाची मागणी करण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार, मुख्य संयोजक नैताम यांच्यासह पदाधिकारी, सदस्य व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लालपुलिया कोळसा डेपो हटवा, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ थांबवा!

### स्माईल फाउंडेशनचे प्रशासनाला निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. २८ :** लालपुलिया परिसरातील कोळसा डेपोमुळे वाढते प्रदूषण, जड वाहनांची वर्दळ आणि अपघातांचा धोका निर्माण होत असल्याचा आरोप करत स्माईल फाउंडेशनने कोळसा डेपो लोकवस्तीपासून दूर कायमस्वरूपी स्थलांतरित करण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून कोळशाची धूळ, वाहनांचा धूर आणि सततची जड वाहतूक यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. खोकला, दमा व श्वसनविकारांसह गंभीर आजारांबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. विशेषतः लहान मुले, गर्भवती महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर असल्याचे फाउंडेशनने म्हटले आहे. कोळसा वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडीसह अपघातांचा धोका वाढला असून, या मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही मोजक्या व्यावसायिकांना आर्थिक लाभ आणि त्याची किंमत मात्र संपूर्ण परिसरातील नागरिकांनी मोजायची, ही परिस्थिती कितपत योग्य? असा सवाल फाउंडेशनने उपस्थित केला. केवळ पाण्याची फवारणी किंवा रस्त्यांची साफसफाई न करता डेपोचे कायमस्वरूपी स्थलांतर करावे आणि त्यासाठी निश्चित कालमर्यादा जाहीर करून कार्यवाहीचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त रमेश बोबडे, डॉ. विश्वास सुंदरानी, अध्यक्ष सागर जाधव व सचिव आदर्श दाढे उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दुष्काळ जाहीर, पण रोख मदत मिळणार का?

## अमरावतीच्या दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचा सवाल

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला असला, तरी मदत कशा स्वरूपात मिळणार, याविषयी चर्चा सुरू झाली आहे. ही मदत रोख स्वरूपात मिळावी, अशी सरसकट शेतकऱ्यांची मागणी आहे. काँग्रेससह विरोधी पक्षांनी हेक्टरी १ लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी मागणी केली आहे. शेतकऱ्यांना थेट मदतीची प्रतीक्षा आहे.

यंदा खरीप हंगाम पूर्णपणे हातातून गेला आहे. दुष्काळग्रस्त भागात विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्यात येणार आहेत. त्यामध्ये जमीन महसुलात सूट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसूलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल), शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी, रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज खंडित केली जाणार नाही, शेतीवर अवलंबून शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी अन्न धान्याचा पुरेसा पुरवठा, टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे, जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे, अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णयाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे या उपाययोजनांचा समावेश आहे.

**'तातडीने पंचनामे सुरू करावेत'**

शासनाने जिल्ह्यातील सर्व तालुक्यात दुष्काळसदृश्य स्थिती जाहीर केली आहे. त्यामुळे यंत्रणांनी तातडीने उद्यापासूनच शेतीच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहे. शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये ट्रिगर १ शासनाने मंजूर केला आहे. ट्रिगर २ ची कुठलीही वाट न पाहता ट्रिगर ३ म्हणजेच क्षेत्रीय सत्यापन यासाठी पंचनामे करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. सर्व तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांनी तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी आणि आवश्यक असलेल्या सर्व यंत्रणांचा समन्वय साधून जिल्ह्यातील पंचनाम्याची कारवाई सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

**आवश्यक समन्वय करा**

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तालुकास्तरावर शेतकरी मदत कक्ष कार्यान्वित करावा, शेतकऱ्यांचे पंचनामे तसेच कर्जमुक्ती योजनेत त्यांना मिळवायचा लाभ व त्यासाठी करायची ई-केवायसी, तसेच शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी लागणार आहे. यासाठी बँका व सहकार सहनिबंधक यांच्याशी आवश्यक समन्वय साधावा. तसेच कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांद्वारे नवीन कर्ज दिले जाईल, याची खात्री करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहेत.

# चांदूर बाजार तालुक्यात संत्रा, केळीसह पिकांचे मोठे नुकसान

## शेतकऱ्यांची दयनीय अवस्था

**अमरावती/का.प्र.**

अल्प व अनियमीत आणि प्रतिकूल हवामानामुळे चांदूर बाजार तालुक्यातील ग्रामीण भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषतः संत्रा बागांमध्ये मोठ्या प्रमाणात फळगळ होत असून केळी व इतर पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन दुष्काळ जाहीर करावा आणि नुकसानग्रस्त पिकांचे त्वरित पंचनामे करावेत, अशी मागणी प्रहारच्या वतीने करण्यात आली. यावेळी निवेदनासोबत तहसिलदारांना कच्चा केळीची फांदी भेट देण्यात आली.

तालुक्यातील प्रत्येक गावात प्रत्यक्ष शेतावर जाऊन गावनिहाय व पिकनिहाय नुकसान सर्वेक्षण करावे, पंचनामे तातडीने पूर्ण करून अहवाल शासनाकडे पाठवावा आणि पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम विलंब न करता जमा करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान गंभीर असून मोठ्या प्रमाणात फळगळ झाल्याने वर्षभराचा खर्च आणि मेहनत वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. संत्रा हे बारमाही पीक असल्याने सध्याच्या नुकसानीचा परिणाम पुढील उत्पादनावरही होणार आहे. त्यामुळे संत्रा व केळी उत्पादकांचे स्वतंत्र पंचनामे करून विशेष आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही करण्यात आली. पीक विमा लागू असलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान दावेही तातडीने निकाली काढावेत तसेच पुढील हंगामासाठी आवश्यक कृषी निविष्ठा व शासकीय योजनांचा लाभ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. शिष्टमंडळात तालुकाप्रमुख दिनेश आमझरे, प्रदीप बंड, सुरेश गणेशकर, बाळासाहेब भुजबळ, संतोष किटुकले, समर्थ डवरे, श्रीकृष्ण आवारे, संजय गोमकाळे, संकल्प आढाऊ, विश्वजीत देवतळे, वेदांत मातकर यांचा सहभाग होता.

# शासकीय मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहातील समस्या सोडविण्याची मागणी

## युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप यांच्या नेतृत्वात निवेदन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वे येथील शासकीय मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भेडसावत असलेल्या विविध समस्या व प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित वीरेंद्र जगताप यांच्या नेतृत्वात सामाजिक न्याय विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



येथील हे वसतिगृह ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र, वसतिगृहातील अपुऱ्या सुविधा व सुरक्षेच्या समस्यांमुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.निवेदनामध्ये विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता वाढवून नवीन इमारतीची उभारणी करावी,सध्याची वसतिगृहाची क्षमता मर्यादित असून प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी इच्छुक असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता प्रवेश क्षमता वाढवून आवश्यक नवीन इमारतीचे बांधकाम करावे.वसतिगृह परिसरात सुरक्षा व्यवस्था मजबूत करावी,वसतिगृहाच्या आजूबाजूला काही समाजकंटकांचा वावर असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत वसतिगृह प्रशासनाकडून पोलिसांना माहिती देण्यात आली असली तरी समस्या कायम आहे. त्यामुळे परिसरात नियमित पोलीस गस्त सुरू करून विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे.

वसतिगृह इमारत, स्वच्छतागृहे व स्वयंपाकघराचे नूतनीकरण करावे,वसतिगृहाची इमारत जुनी झाली असून स्वच्छतागृह व स्नानगृहांची अवस्था खराब झाली आहे. तसेच स्वयंपाकघर व इतर आवश्यक उपयोगिता क्षेत्रांचेही तातडीने नूतनीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.नवीन व टिकाऊ फर्निचर उपलब्ध करून द्यावे,विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी उपलब्ध असलेले बेड, टेबल व इतर फर्निचर जुने व जीर्ण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा व अभ्यासाच्या वातावरणाचा विचार करून नवीन, मजबूत बेड, कपाटे, टेबल-खुर्च्या व आवश्यक फर्निचर उपलब्ध करून द्यावे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा आणि सुरक्षिततेचा विचार करून या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी परीक्षित वीरेंद्र जगताप यांनी केली.यावेळी युवक काँग्रेसचे रुपेश पुडके, स्वप्निल मानकर, सागर गरुड, वैभव चुकेकर, श्रीनिवास सूर्यवंशी, अमोल होले, शिटू सूर्यवंशी, प्रफुल कोकाटे, प्रतीक भैसे, मोहित खुणे, सागर भोंडे, अर्पित चौधरी, सनी सावंत, गोपाल अविनाशे आदी उपस्थित होते.

# श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यापीठाच्या काव्यस्पर्धेत साहित्यिक भरारी

## उर्वी खडके प्रथम, प्रणव कोरे तृतीय



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाच्या वतीने आयोजित कवी केशवसुत काव्य स्पर्धेत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. बी व्होक प्रथम वर्षाची विद्यार्थिनी उर्वी खडके हिने प्रथम पारितोषिक, तर बी-व्होक तृतीय वर्षाचा विद्यार्थी प्रणव कोरे याने तृतीय पारितोषिक पटकावले.

या यशामागे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र दाळू, प्रा. शुभम ठाकरे, विभाग प्रमुख प्रा. अजय खांबरे, अमेय आसिंगकर तसेच खेळ व कला समितीचे अध्यक्ष प्रा. प्रणव चेंडके यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व साहित्यिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयाकडून सातत्याने मिळणाऱ्या पाठबळामुळे हे यश शक्य झाल्याचे मानले जाते.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, सचिव प्रा. विकास कोळेश्वर यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मोझरीतील अतिक्रमणाबाबतची यशोमती ठाऊकरांची भूमिका दुटप्पी

## अतिक्रम काढण्याची स्वतः यशोमती ठाकूर यांचीच मागणी

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय महामार्गा लगतचे अतिक्रमण काढण्याची मागणी यशोमती ठाकूर यांनीच केली असून आता सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने महामार्गाच्या हद्दीतील मोझरी येथील अतिक्रमण काढण्याची तयारी प्रशासनाने केली असताना यशोमती ठाकूर प्रसिद्धी मिळविण्यासाठी विनाकारण भाजपाच्या व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने खडे फोडून वातावरण तापवत आहे.अधिकाऱ्यांना फोन लावून त्याचे रेकॉर्डिंग वायरल करून प्रसिद्धी मिळवत आहे असा प्रतिहल्ला भाजपच्या प्रदेश पदाधिकारी निवेदिता चौधरी यांनी यशोमती ठाकूर यांच्या दुटप्पी भूमिकेवर चढविला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या महासमाधी समोरील रस्त्याचे चौपदरीकरण व सौंदर्यीकरण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने मान्यता दिली आहे.त्याच प्रमाणे राजस्थान येथील पालोदी अपघात विरुद्ध राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सुमो टो रिट याचिका क्रमांक ९/२०२५ या प्रकरणात खुद्द सर्वोच्च न्यायालयाने सुमोटो प्रकरणात राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूचे अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले आहे त्याची अंमबजावणी प्रशासन करत असताना यशोमती ठाकूर वस्तुस्थिती जनतेसमोर न ठेवता 'अतिक्रमण हटवण्यासाठी आमच्या प्रेतावरून बुलडोझर न्यावा लागेल' अशी चिथावणीखोर भाषा वापरून लोकांची माथे भडकविण्याचे काम करीत आहे.यशोमती ठाकूर यांचे



राष्ट्रीय महामार्ग लगत विनापरवानगी बांधलेल्या मोझरीतील कॉम्प्लेक्स मधील दहा खोल्या रिकाम्या असून त्यांना या अतिक्रमणधारकांचे भले करायचे असल्यास व्यावसायिकांना मोफत त्या खोल्या वापराला ठाकूरांनी दिल्या पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमी तळागाळातील लोकसाठी काम करणारे नेते असून मोझरीतील अतिक्रमण धारकांनी नियमात राहून व वाहतुकीत अडथळा न आणता व्यवसाय करावा त्यासाठी कोणतीच मनाई नाही उलट सहकार्यच आहे.छोट्या व्यावसायासाठी मोदी सरकारने मुद्रा लोन सुद्धा सरकारने उपलब्ध करून दिले आहे.यशोमती ठाकूर यांनी तिवसा शहरातील महामार्गाच्या बाजूचे अतिक्रमण काढण्यासाठी महामार्ग प्रशासनाला पत्र दिले आहे. परंतु मोझरी अतिक्रमणाबाबत त्यांची दुसरी भूमिका आहे ,ही यशोमती ठाकूरांची दुटप्पी भूमिका आहे.तिवसा येथील अतिक्रमण हटले पाहिजे पण मोझरीतील नको,अशी गझनी टाइप भूमिका यशोमती ठाकूर यांनी आतातरी सोडली पाहिजे असा सल्ला सुद्धा निवेदिता चौधरी यांनी दिला आहे.

# संक्षिप्त

## यवतमाळमध्ये ३ ऑक्टोबरला शिक्षक कार्यकर्ता मेळावा

**अमरावती**- महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने अमरावती विभागीय कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन शनिवार ३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता सहकार भवन, आर्णी रोड, यवतमाळ येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यात यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यांतील शिक्षक समितीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.शिक्षकांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करून त्यावर मार्ग काढण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद कर्मचारी सेवार्शती, शिस्त व अपील नियम, वेतन निश्चिती, निवृत्तीवेतन निश्चिती, सेवा पुस्तिका नोंदी यांसह शिक्षकांच्या सेवेशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.मेळाव्यास राज्य नेते उदयजी शिंदे, राज्याध्यक्ष विजय कोंबे, माजी राज्य सरचिटणीस बाबासाहेब कपिले, माजी विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर नाकाडे, राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर, राज्य कार्यालयीन चिटणीस सतीश सांगळे, राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेशजी सावरकर,प्रशांत गावंडे,गोकुलदास राऊत,पुंडलीक रेकलवार,प्रविणा कोल्हे,अर्चना भरकाडे, अमरावती विभागीय अध्यक्ष गजाननजी गायकवाड, विभागीय सचिव गोपालजी सुरे, राज्य प्रतिनिधी आशान्ना गुंडावार, राज्य प्रमुख जुनी पेन्शन आघाडीचे प्रफुल्ल पुंडकर, राज्य कार्यकारिणी सदस्य संदीप मोहाडे आणि राज्य प्रतिनिधी महेश सोनकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## प्रा.गजानन भारसाकळेंचा गौरव



**अमरावती**- शासकीय सेवेतील आय ए एस पदवी प्राप्त नोकरी हे सेवादालन असून या माध्यमातून सर्वांगीण सेवा देऊन समाजाद्वारे उपकृत होता येते असे भावपूर्ण तथा अर्थपूर्ण प्रतिपादन महाराष्ट्र निवासी व तामिळनाडू राज्याचे माजी मुख्य सचिव आय ए एस विश्वनाथ शेगांवकर यांनी केले. अकोला जिल्ह्यात शालेय शिक्षणा पासून ते विविध शिक्षण पदवी प्राप्त व याद्वारे शिक्षकाची नोकरी करून आय ए एस पर्यंत अतिकष्टमय जीवनातून यश प्राप्त करणारे शेगांवकर यांनी अमरावती येथील आय ए एस अकादमीला आवर्जून भेट देऊन आपले मित्र तथा अकादमीचे संचालक डॉ नरेशचंद्र काठोळे यांची व या कार्यक्रमासाठी आमंत्रित उपस्थितांची भेट घेतली.अध्यक्षस्थानी मंत्रालय मुंबई येथून सेवानिवृत्त सहसचिव राजाराम जाधव यांची उपस्थिती लाभली . याप्रसंगी मंचावर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ भोजराज चौधरी , अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी ॲड आशिष गावंडे व अभिनंदन बँकेचे संस्थापक सुदर्शन जैन यांची उपस्थिती होती . कार्यक्रमा दरम्यान श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी प्रदान केलेल्या महाविद्यालय विभागातून उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार प्राप्त संस्थेच्या बाभूळगांव - अकोला येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्याल यातील प्राध्यापक गजानन भारसाकळे यांना यो -सेवेतील व कृषी क्षेत्रातील भरीव तथा यशस्वी संशोधन कार्याबाबत सन्मानित करण्यात आले.संचलन अकादमीचे संस्थापक संचालक प्रा डॉ नरेशचंद्र काठोळे , प्रास्ताविक चिंतामण खोब्रागडे तथा आभार सुधीर चक्रे यांनी केले.कार्यक्रमाला रमेश गोरखेडे, अशोक हांडे, बीडी. मनोरे, प्रवीण वासनिक,प्रभा आवारे या मान्यवरांची उपस्थिती होती.

## विवेकानंद गणेशोत्सव मंडळात भक्तिसंगीताने रसिक मंत्रमुग्ध

**नागपूर**- महाल येथील विवेकानंद गणेशोत्सव मंडळाच्या वतीने खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूर यांच्या सहकार्याने भक्तिसंगीताच्या 'संगीत रजनी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विविध भावस्पर्शी भक्तिगीते आणि लोकप्रिय मराठी गीतांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.कार्यक्रमात नेहा इंदूरकर, इंद्राणी इंदूरकर, अदिती धुमकेकर,आनंद किटकरू आणि विजय बोरिकर यांनी विविध गीते सादर केली. 'ॐ नमोजी आद्या','गणराज रंगी नाचतो', 'नरवर कृष्णा समान', 'भारत का बच्चा बच्चा जय श्रीराम बोलेगा', 'कानडा वो विठ्ठलू', 'एकाच या जन्मे जणू', 'नदीच्या पल्याड आईचा डोंगर', 'वंदे मातरम्','जयोस्तुते श्रीमहन्मंगले', 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'तोच चंद्रमा नभात', 'ही चांदणे फुलांनी', 'हरी म्हणा तुम्ही गोविंद म्हणा' तसेच 'बाप्पा मोरया रे' या गीतांनी कार्यक्रमात रंगत आणली.कार्यक्रमाचे सिंथेसायझरवर ओंकार वेलणकर, ऑक्टोपॅडवर सागर राऊत, संवादिनीवर अरविंद मुंजे, तर तबल्यावर डॉ. अभिजित बोरीकर व आदित्य चांदे यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे निवेदन विनय मोडक यांनी प्रभावीपणे केले.या भक्तिसंगीत कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलाकारांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली.

# कुऱ्हातील युवकांनी केली भोगावती नदीपात्राची स्वच्छता

**कुऱ्हा/वार्ताहर**

गणेशोत्सवानंतर भोगावती नदीपात्रातील गणेशमूर्ती विसर्जन स्थळी जमा झालेले निर्माल्य, हार-फुले तसेच अर्धवट विसर्जित झालेल्या गणेशमूर्तींची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावत कुऱ्हा येथील युवकांनी नदीपात्राची स्वच्छता केली. युवकांच्या या सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमाचे गावातून कौतुक होत आहे.

गणेशमूर्ती विसर्जनानंतर नदीपात्राच्या काठावर हार, फुले, निर्माल्य, केळीची पाने तसेच इतर साहित्य मोठ्या प्रमाणात जमा झाले होते. तसेच काही गणेशमूर्तींचे अर्धवट विसर्जन झाल्याने त्यांची विटंबना होण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन गावातील युवकांनी पुढाकार घेत नदीपात्रात उतरून अर्धवट विसर्जित झालेल्या गणेशमूर्तींचे पाण्यात योग्य पद्धतीने विसर्जन केले.त्यानंतर नदीपात्राच्या काठावर व पाण्यात आलेले हार, फुले, निर्माल्य तसेच केळीची पाने युवकांनी एकत्रितपणे गोळा केली. जमा केलेल्या निर्माल्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. त्यामुळे नदीपात्र स्वच्छ होण्यास मदत झाली असून, नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठीही या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम झाला.गणेशोत्सवानंतर धार्मिक स्थळे व नदीपात्र परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ



प्रशासनाची नसून नागरिकांचीही आहे, हा संदेश युवकांनी आपल्या कृतीतून दिला. पर्यावरणाचे रक्षण आणि धार्मिक श्रद्धा यांचा समन्वय साधत युवकांनी राबविलेल्या या उपक्रमाचे गावकऱ्यांकडून स्वागत होत आहे.

या स्वच्छता उपक्रमात सुरज राठोड, अक्षय सुने, शुभम उमप, यश टिंगणे, वेदांत उमप, सुमित धुळे, आरुष ढोले, वंश चव्हाण, सोहम निस्ताने, तुषार चव्हाण, गौरव निस्तने, यश गायकवाड, यश निस्ताने, अजय चिरडे आणि चेतन चौधरी,अभिषेक बारस्कर,ओम बाळके, देवेंद्र नागपूरे,रविंद्र कोठीया यांनी सहभाग घेतला.


# वडोदरा ते वाराणसी 'सेवा संकल्प यात्रे'चे मेळघाटात स्वागत

**अचलपूर/वार्ताहर**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'वडोदरा ते वाराणसी सेवा संकल्प यात्रे'चे महाराष्ट्रात आगमन झाले. युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमांग जोशी तसेच महाराष्ट्र प्रदेश युवा मोर्चाचे अध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा सुरू करण्यात आली आहे.

सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश घेऊन निघालेल्या या यात्रेने महाराष्ट्रात प्रवेश केल्यानंतर मेळघाट विधानसभा मतदारसंघातही उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. मेळघाटच्या समृद्ध आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविताना स्थानिक नागरिकांनी आदिवासी पारंपरिक नृत्याच्या माध्यमातून यात्रेचे उत्साहात स्वागत केले. पारंपरिक वेशभूषा आणि सांस्कृतिक सादरीकरणामुळे स्वागत सोहळ्याला विशेष रंगत आली. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक, महिला आणि युवा कार्यकर्ते उपस्थित होते.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेच्या माध्यमातून सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घेऊन समाजहितासाठी योगदान द्यावे, असा संदेशही या उपक्रमातून देण्यात येत आहे.

परतवाडा, अमरावती, तिवसा, नागपूरमार्गे वाराणसीकडे प्रस्थान झाले.महाराष्ट्रातील प्रवासादरम्यान ही सेवा संकल्प यात्रा परतवाडा येथे आगमन झाले.यानंतर अमरावती, तिवसा आणि नागपूर या मार्गाने पुढे रवाना होऊन त्यानंतर वाराणसी येथे पोहोचणार आहे. प्रवासादरम्यान विविध ठिकाणी



भाजप पदाधिकारी, युवा मोर्चाचे कार्यकर्ते आणि नागरिकांकडून यात्रेचे स्वागत करण्यात येत आहे.

या यात्रेमुळे युवा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, सेवा आणि सामाजिक कार्याचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहोचविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.या स्वागत कार्यक्रमास अचलपूर मतदार संघाचे आ.प्रवीण तायडे,मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. तथा भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर,युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे, संयोजक श्याम गंगराडे,नगराध्यक्ष रुपाली माथणे,गजानन कोल्हे, सुधीर रसे, शहराध्यक्ष नुंदन यादव,विशाल काकड,शंकर मालखेडे,स्वप्नील मडघे,नारायण बोरेकर,यशवंत काळे, प्रणित खवले, शिवा काकड, क्षितिज रोहणकर, निलेश पवार, चेतन कानेरकर, निखिल हिवराळे, गोलू भक्ते, दीपक गायन, गोविंद जेठे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, युवा मोर्चाचे कार्यकर्ते, महिला पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.मेळघाटच्या भूमीत आदिवासी पारंपरिक पद्धतीने करण्यात आलेले स्वागत हे या भागातील समृद्ध सांस्कृतिक परंपरा, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडविणारे ठरले.

# पाकीटबंद पदार्थ आणि समाज

**पाकीटबंद अन्न पदार्थ घेताना ग्राहकाला त्यातील साखर, मीठ, तेल आणि चरबीचे प्रमाण सहज समजले पाहिजे. आकर्षक वेष्टनापेक्षा उत्पादनातील पोषण मूल्यांची माहिती अधिक महत्त्वाची आहे. यासाठी वेष्टनाच्या पुढील भागावर ठळक स्वरूपात माहिती देण्याची पद्धत लागू करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. पाकीटबंद अन्न पदार्थांचा वाढता वापर आणि मुलांच्या आरोग्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा आहे. ग्राहकाला काय खावे, हे सांगण्यापेक्षा तो जे खातो त्यात काय आहे याची अचूक माहिती देणे अधिक आवश्यक आहे.**

पाकीटबंद अन्न पदार्थांच्या वेष्टनावर त्यातील साखर, मीठ, चरबी आणि अन्य घटकांचे प्रमाण ठळकपणे नमूद करण्याची पद्धत जगातील अनेक देशांत स्वीकारली गेली आहे. भारतातही अशा प्रकारची 'फ्रंट ऑफ पॅक लेबलिंग' म्हणजेच वेष्टनाच्या पुढील भागावर पोषण मूल्यांची स्पष्ट माहिती देण्याची आवश्यकता गेल्या काही वर्षांपासून चर्चेत आहे. या विषयावर दोन वर्षांपासून सुरू असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेनंतर भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने याबाबत आवश्यक पावले उचलावीत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याचे वृत्त आहे. प्राधिकरणाने निर्धारित मुदतीत कार्यवाही केली नाही, तर आवश्यक आदेश देण्याचा इशाराही न्यायालयाने दिला आहे.

ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही भूमिका महत्त्वाची म्हणावी लागेल. पाकीटबंद पदार्थांच्या आकर्षक वेष्टनावर उत्पादनाची जाहिरात, चव, गुणवत्ता आणि विविध वैशिष्ट्ये ठळकपणे मांडली जातात. मात्र त्याच उत्पादनात साखर, मीठ, तेल किंवा संपृक्त चरबीचे प्रमाण किती आहे, याची माहिती ग्राहकाला सहज लक्षात येईल अशा पद्धतीने समोर येतेच असे नाही. अन्न पदार्थ आरोग्यदायी आहे की नाही, याचा निर्णय घेताना ग्राहकाने केवळ जाहिरातीवर अवलंबून राहू नये, यासाठी स्पष्ट आणि सोपी माहिती आवश्यक आहे. वेष्टनाच्या पुढील भागावर ठळक संकेत चिन्हे किंवा माहिती दिल्यास ग्राहकाला दुकानातच निर्णय घेणे अधिक सुलभ होऊ शकते.

अन्न पदार्थावर माहिती देणे म्हणजे ग्राहकाच्या निवडीवर बंधन आणणे नव्हे. उलट, माहितीपूर्ण निवड करण्याचा अधिकार अधिक सक्षम करणे होय. एखाद्या पदार्थात साखर किंवा मीठ अधिक आहे, हे स्पष्टपणे माहीत असल्यास तो पदार्थ घ्यायचा की नाही, किती प्रमाणात घ्यायचा, हा निर्णय ग्राहक स्वतः घेऊ शकतो. त्यामुळे अशा प्रकारचे लेबलिंग हे बाजार व्यवस्थेत हस्तक्षेप करण्यापेक्षा ग्राहकाला सक्षम करणारे पाऊल आहे.

विशेषतः बदललेल्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. शारीरिक श्रम कमी झाले आहेत, बैठी जीवनशैली वाढली आहे आणि तयार अन्न पदार्थांचा वापर वाढत आहे. अशा वेळी अतिरिक्त साखर, मीठ आणि चरबीयुक्त पदार्थांचा नियमित वापर आरोग्यासाठी चिंतेचा विषय ठरतो. स्थूलत्व, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकारांसारख्या जीवनशैलीशी संबंधित समस्यांबाबत सार्वजनिक आरोग्याच्या पातळीवर सातत्याने चिंता व्यक्त केली जाते. त्यामुळे अन्न पदार्थांबाबत योग्य माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे सार्वजनिक आरोग्याचेही काम आहे. या विषयातील सरकारची संकोचाची भूमिका पूर्णपणे अनाकलनीय आहे, असेही म्हणता येणार नाही. भारताची खाद्य संस्पृती अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. अनेक पारंपरिक पदार्थांमध्ये तेल, साखर किंवा मीठ तुलनेने अधिक असू शकते. समोसा, जिलेबी यांसारख्या



लोकप्रिय पदार्थांकडे आरोग्याच्या निकषांवर पाहण्याचा प्रयत्न झाला तेव्हा देशभरातून मोठी प्रतिक्रिया उमटली होती. राष्ट्रीय पोषण संस्थेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या काही उपक्रमांवरही प्रश्न उपस्थित झाले होते. कारण अन्नाच्या आरोग्यविषयक मूल्यांकनाचा प्रश्न थेट भारतीय खाद्य परंपरा, लघुउद्योजक आणि असंघटित क्षेत्रातील विक्रेत्यांच्या उपजीविकेशी जोडला जातो. मात्र पारंपरिक पदार्थ आणि औद्योगिक पद्धतीने तयार केलेले पाकीटबंद अन्न पदार्थ यांच्यात फरक करणे आवश्यक आहे. घरगुती किंवा स्थानिक पातळीवर तयार होणाऱ्या पदार्थांवर तेच निकष लावणे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून आकर्षक वेष्टनातून विकल्या जाणाऱ्या पदार्थांबाबत ग्राहकाला पोषण माहिती देणे, या दोन वेगळ्या बाबी आहेत. पाकीटबंद अन्न पदार्थांचा वापर करणा-या ग्राहकाला त्या उत्पादनात नेमके काय आहे, हे समजण्याचा अधिकार असायलाच हवा.

या निर्णयाचे सर्वाधिक महत्त्व मुलांच्या आरोग्याच्या संदर्भात अधोरेखित होते. शाळांच्या आसपास मोठ्या प्रमाणावर पाकीटबंद आणि प्रक्रिया केलेले अन्न पदार्थ उपलब्ध असतात. मुलांना आकर्षित करणाऱ्या रंगीबेरंगी वेष्टनांपासून जाहिरातींपर्यंत अनेक माध्यमांचा वापर केला जातो. लहान वयात लागलेली चवीची सवय पुढेही कायम राहण्याची शक्यता असते. त्यामुळे मुलांच्या आहाराच्या सवयींबाबत पालक, शाळा आणि शासन या तिन्ही स्तरांवर जागरुकता आवश्यक आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता सरकारने हा विषय न्यायालयीन आदेशाची पूर्तता म्हणून न पाहता व्यापक सार्वजनिक आरोग्य धोरणाचा भाग म्हणून पाहण्याची गरज आहे. नियम तयार करताना आहार तज्ज्ञ, पोषण तज्ज्ञ, ग्राहक संघटना, उत्पादक आणि विक्रेते यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे. नियमांची अंमलबजावणी व्यवहार्य असावी, त्यातून अनावश्यक प्रशासकीय गुंतागुंत निर्माण होऊ नये आणि छोट्या उत्पादकांवर असह्य आर्थिक भार पडू नये, याचीही काळजी घ्यावी लागेल. याचबरोबर जनजागृतीकडेही दुर्लक्ष करता कामा नये. वेष्टनावर लाल किंवा ठळक चिन्ह लावणे हा उपायाचा एक भाग आहे; पण त्याचा अर्थ ग्राहकाला समजला नाही तर त्याचा उपयोग मर्यादित राहील. शाळा, महाविद्यालये, प्रसार माध्यमे आणि सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या माध्यमातून पोषणविषयक मूलभूत माहिती देण्याची गरज आहे. 'काय खावे' यापेक्षा 'आपण जे खातो त्यात काय आहे', हे समजणे अधिक महत्त्वाचे आहे. पारंपरिक भारतीय खाद्य पदार्थांना आरोग्यदायी बनविण्याच्या दिशेनेही प्रयत्न झाले पाहिजेत. तेल आणि साखरेचे प्रमाण कमी करून, धान्यांचे अधिक पौष्टिक पर्याय वापरून किंवा स्वयंपाकाच्या पद्धतीत बदल करून अनेक पदार्थ अधिक संतुलित करता येऊ शकतात. यासाठी पारंपरिक खाद्य संस्पृती नाकारण्याची आवश्यकता नाही. उलट आधुनिक जीवनशैलीशी तिचा मेळ घालण्याची गरज आहे. अन्न हा भारतीय समाजाच्या सांस्पृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे आरोग्याच्या नावाखाली प्रत्येक पारंपरिक पदार्थाला 'चांगला' किंवा 'वाईट' अशा सोप्या चौकटीत बसवणे योग्य ठरणार नाही. प्रमाण, वारंवारता, तयारीची पद्धत आणि व्यक्तीची जीवनशैली या सर्वांचा विचार करावा लागतो. त्याच वेळी पाकीटबंद अन्न पदार्थांच्या वाढत्या वापराकडे दुर्लक्षही करता येणार नाही. शेवटी प्रश्न ग्राहकाला काय खायचे हे सांगण्याचा नाही; त्याला तो निर्णय घेण्यासाठी आवश्यक माहिती देण्याचा आहे. सरकारने नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे आणि त्यांच्या निवडीचा अधिकार अबाधित ठेवणे, या दोन्ही गोष्टी साध्य केल्या पाहिजेत.

**प्रसाद पाटील**




# निरोगी हृदय, निरोगी जीवन!

आजकाल जगभरात हृदयासी संबंधित आजार झपाट्याने वाढत आहेत.बदललेली जीवनशैली आणि आरोग्याच्या हानिकारक सवयी यामुळे हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. वाढलेला कामाचा ताण,अनावश्यक तणाव, जंक फुडचे सेवन आणि शारीरिक हालचालींची कमतरता ही याचे मुख्य कारणे आहेत. याशिवाय धुम्रपान, मद्यपान आणि अपुरी झोप यासारख्या सवयीही धोका वाढवत आहेत. तरुण पिढीमध्येही मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारखे घटक हृदयविकारासाठी कारणीभुत ठरत असल्याचे अनेक वैज्ञानिक संशोधनातून समोर आले आहे. त्यामुळे, भविष्यात गंभीर आजारापासुन वाचण्यासाठी वेळीच जागरुक होणे आणि हृदयाची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

जागतिक हृदय दिनाची सुरुवात १९९९ मध्ये झाली तेव्हा जागतिक हृदय महासंघ (डब्ल्यु.एच.एफ) आणि जागतिक आरोग्य संघटना यांनी जागतिक हृदय दिनाची स्थापना घोषित केली.डब्ल्यु.एच.एफ. चे अध्यक्ष (१९९७-९८) ॲन्टोनी बेझ द लुना यांनी या कार्यक्रमाची कल्पना मांडली.सध्याच्या काळात हा दिवस अधिकच समयोचित ठरतो,कारण काम करता करता हार्ट अटॅक आला व व्यक्ती दगावली, अशा बातम्या येण्याचे प्रमाण खुप वाढलेले दिसते. अशा घटना १५ वर्षे वयाच्या मुलापासुन ते ४० वर्षे वयाच्या मध्यमवयीन व्यक्तीपर्यंत कुणाच्याही आयुष्यात घडलेला दिसतात.हृदयरोग रचनात्मक आहे की कार्यात्मक, त्यावरुन उपचाराचे स्वरुप बदलु शकते कुठल्याही रोगांसाठी सर्वप्रथम उपचार असतो तो म्हणजे रोगाच्या कारणांपासुन लांब राहणे. सर्वप्रथम आपण हृदयरोगाची कारणे समजुन घेऊ या,

अत्युष्णगुर्वन्नकषायतिक्त
श्रमाभिघाता ध्यशनप्रसंगै :।
संचिन्तनैवैगधारणैश्च हृदामय :
पंचविध : प्रदिष्ट : ।। माधवनिदान २६.१

व्यायामतीक्ष्णातिविरे कबस्ति -
चिन्ताभयत्रा समदातिचारा :।
धर्द्यामसन्धारण कर्शनानि
हृदोगकतृणि तथा अभिद्यात : ।। च.चि २६

अति उष्ण, पचायला जड, तुरट, कडू, श्रम, कुठल्याही प्रकारचा आघात, अति प्रमाणात भोजन, अति विचार करणे, मानसिक ताण येणे, वेगांचे धारण करणे, अति प्रमाणात व्यायाम, विरेचन वा बस्ती अति प्रमाणात घेणे, कुठल्याही प्रकारच्या भीतीला समोरे जाणे,श्वास करुण घेणे, असलेल्या आजारावर योग्य ते काम न करणे, खुप उलट्या होणे,शरीरात आमदोष साठणे, शरीर कृश होणे वगैरे कारणांमुळे हृदयरोग होण्याची शक्यता वाढते.

हृदय हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे अवयव आहे.जे संपुर्ण शरीरात रक्त पंप करण्याचे काम करते.हे रक्त शरीराच्या प्रत्येक भागाला ऑक्सिजन आणि पोषक तत्वे पुरवते.जर हृदय व्यवस्थित काम करत नसेल,तर अवयवापर्यंत पोषण आणि ऑक्सिजन पोहोचू शकत नाही, ज्यामुळे शरीरात अशक्तपणा, थकवा आणि गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात.

निरोगी हृदय म्हणजे जे नियमीतपणे, योग्य लयीत आणि पुरेसा जोर लावुन रक्त पंप करत आहे.हृदयाचे चांगले आरोग्य केवळ दिर्घायुष्यच देत नाही,तर स्ट्रोक,हृदयविकाराचा झटका आणि उच्च रक्तदाब यासारख्या गंभीर आजारांचा धोकाही कमी करते.त्यामुळे प्रत्येक वयोगटात हृदयाची काळजी घेणे महत्वाचे आहे.निरोगी हृदय हिच समृद्ध आयुष्याची गुरुकिल्ली.

**डॉ. विजय बाबर,**
वर्धा
मो.नं.९४२३११८८०६

# हृदय जपले तरच जीवनाची लय टिकेल..

**मा**नवी शरीरातील हृदय हा आकाराने लहान, पण कार्याने अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. जन्मापासून आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत अविरत कार्यरत राहून ते शरीराच्या प्रत्येक भागाला रक्त, प्राणवायू आणि पोषक घटक पोहोचवते. म्हणून हृदयाचे आरोग्य म्हणजे केवळ एका अवयवाचे आरोग्य नसून संपूर्ण जीवनाचा आधार आहे. मात्र बदलती जीवनशैली, असंतुलित आहार, शारीरिक हालचालींचा अभाव, तंबाखू व धूम्रपान, मानसिक ताण, अपुरी झोप, वाढते वजन, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि रक्तातील वाढलेले कोलेस्टेरॉल यांमुळे हृदयाच्या आरोग्यासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे २९ सप्टेंबरचा 'जागतिक हृदय दिन' हा केवळ जनजागृतीचा दिवस न राहता आपल्या जीवनपद्धतीचा पुनर्विचार करण्याची संधी ठरली पाहिजे.

जागतिक हृदयदिन



जगभरातील मृत्यूंच्या प्रमुख कारणांमध्ये हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचा समावेश होतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, २०२२ मध्ये या आजारांमुळे सुमारे १.९८ कोटी लोकांचा मृत्यू झाला. त्यामध्ये हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा मोठा वाटा आहे. या आकडेवारीकडे केवळ वैद्यकीय समस्या म्हणून पाहणे अपुरे ठरेल. हृदयविकाराचा संबंध व्यक्तीच्या आहाराशी, कामाच्या स्वरूपाशी, व्यायामाच्या सवयीशी, मानसिक स्थितीशी, पर्यावरणाशी आणि आरोग्यसेवेच्या उपलब्धतेशी आहे. त्यामुळे उपचारांइतकेच प्रतिबंध आणि आरोग्यविषयक जागरूकता महत्त्वाची आहे.

हृदयविकार केवळ वृद्धांचा आजार आहे, ही धारणा बदलण्याची गरज आहे. बैठी जीवनशैली, सततचा मानसिक ताण, अनियमित झोप, रात्रीचे जागरण, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ आणि डिजिटल साधनांचा अतिरेक यामुळे तरुण वयातही हृदयाच्या आरोग्याशी संबंधित जोखीम वाढू शकते. पूर्वी दैनंदिन जीवनातील अनेक कामांतून सहज शारीरिक श्रम होत असत; आज वाहनांचा आणि यंत्रांचा वाढता वापर, कार्यालयीन बैठी कामे आणि पडद्यांसमोरील वाढता वेळ यामुळे शरीराची हालचाल कमी झाली आहे. त्यामुळे हृदयाची काळजी वृद्धापकाळात सुरू करण्याऐवजी बालपणापासूनच निरोगी सवयी रुजविणे आवश्यक आहे.

हृदयाच्या आरोग्याचा आहाराशी थेट संबंध आहे. पारंपरिक आहारातील धान्ये, डाळी, कडधान्ये, भाज्या, पालेभाज्या आणि फळे यांचे स्थान आता अनेकदा अतिप्रक्रिया केलेले पदार्थ, तळलेले खाद्यपदार्थ, अधिक मीठ-साखर असलेले पदार्थ आणि गोड पेये घेत आहेत. चव आणि सोयीच्या मागे धावताना पोषणमूल्याचा विचार मागे पडतो. हृदयासाठी कोणताही एक चमत्कारिक आहार नसतो; ताजे, संतुलित आणि विविधतापूर्ण अन्न, योग्य प्रमाण आणि मीठ-साखरेचे भान ही अधिक महत्त्वाची तत्त्वे आहेत. त्याचबरोबर शरीराला नियमित हालचाल मिळणे आवश्यक आहे. चालणे, सायकल चालवणे, पोहणे, योगासने, मैदानी खेळ किंवा आपल्या क्षमतेनुसार केलेली नियमित शारीरिक हालचाल आरोग्यदायी जीवनशैलीचा भाग होऊ शकते. आधीपासून हृदयविकार किंवा इतर गंभीर आजार असल्यास व्यायामाबाबत वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

तंबाखू आणि धूम्रपान हृदयासाठी घातक आहेत. सिगारेट, विडी, गुटखा, मावा किंवा तंबाखूच्या इतर प्रकारांचे सेवन रक्तवाहिन्यांवर विपरीत परिणाम करू शकते आणि हृदयविकारासह अनेक आजारांचा धोका वाढवते. व्यसनापासून मुक्त होणे काहींसाठी कठीण असले तरी त्यासाठी समुपदेशन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध आहे. विशेषतः युवकांमध्ये तंबाखूची सुरुवातच होऊ नये यासाठी कुटुंब, शाळा, महाविद्यालये आणि समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. तंबाखूमुक्त जीवन हा केवळ वैयक्तिक आरोग्याचा प्रश्न नसून कुटुंबाच्या आरोग्याशी जोडलेली जबाबदारी आहे.

आधुनिक जीवनातील सततचा ताण हृदयाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्यास कारणीभूत ठरतो. रोजगारातील स्पर्धा, आर्थिक चिंता, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि सततची डिजिटल उपलब्धता यामुळे मनाला विश्रांती मिळणे कठीण झाले आहे. ताण कमी करण्यासाठी धूम्रपान, मद्यपान किंवा अस्वास्थ्यकर अन्नाचा आधार घेणे समस्या वाढवू शकते. त्याऐवजी पुरेशी झोप, नियमित शारीरिक हालचाल, कुटुंबीयांशी संवाद, छंद, ध्यान-योग आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन यांसारख्या आरोग्यदायी मार्गांचा अवलंब करणे अधिक योग्य आहे. शरीर आणि मन यांचे आरोग्य परस्परांपासून वेगळे करता येत नाही.

हृदयविकाराची लक्षणे ओळखणे आणि तातडीने उपचार मिळवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. छातीत दडपण किंवा वेदना, श्वास घेण्यास त्रास, अचानक घाम येणे, मळमळ, चक्कर, असामान्य अशक्तपणा किंवा वेदना हात, खांदा, पाठ, मान अथवा जबड्याकडे जाणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. प्रत्येक व्यक्तीत लक्षणे सारखी असतीलच असे नाही. अचानक गंभीर लक्षणे जाणवल्यास घरगुती उपायांवर वेळ न घालवता तातडीने वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे. हृदयविकाराच्या उपचारात वेळ हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

हृदयाच्या आरोग्याचा संबंध पर्यावरणाशीही आहे. वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, वाहतुकीची गर्दी आणि हिरवळीचा अभाव यांचा मानवी आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे आरोग्यदायी शहर म्हणजे केवळ मोठी रुग्णालये असलेले शहर नव्हे; तर नागरिकांना चालता येईल, सायकल चालवता येईल, व्यायाम करता येईल आणि स्वच्छ हवा मिळेल असे शहर होय. उद्याने, सार्वजनिक मैदाने, सुरक्षित पदपथ आणि सायकल मार्ग यांसारख्या सुविधा आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देतात. पर्यावरण संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्य यांचा परस्परसंबंध समजून घेणे त्यामुळे आवश्यक आहे.

मुलांच्या जीवनशैलीकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे. बालपणात लागलेल्या सवयी पुढील आयुष्यात टिकतात. त्यामुळे मुलांना संतुलित आहार, मैदानी खेळ, नियमित शारीरिक हालचाल आणि पुरेशी झोप यांची सवय लावणे आवश्यक आहे. प्रत्येक मोकळ्या वेळेत भ्रमणध्वनी किंवा दूरचित्रवाणीचा वापर करण्याऐवजी खेळ, वाचन आणि सामाजिक उपक्रमांना स्थान मिळाले पाहिजे. शाळांमध्येही आरोग्यशिक्षण केवळ पाठ्यपुस्तकातील विषय न राहता प्रत्यक्ष जीवनशैलीशी जोडले गेले पाहिजे.

आजच्या मुलांच्या आरोग्यदायी सवयी म्हणजे उद्याच्या निरोगी समाजाची पायाभरणी होय.

हृदयाचे आरोग्य ही केवळ व्यक्तीची जबाबदारी नाही. कुटुंब, शाळा, कार्यस्थळे, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य यंत्रणा आणि शासन या सर्वांची त्यात भूमिका आहे. आरोग्यदायी आहाराची उपलब्धता, तंबाखूमुक्त सार्वजनिक वातावरण, शारीरिक हालचालींसाठी सुरक्षित जागा, आरोग्य तपासणीच्या सुविधा आणि वेळेवर वैद्यकीय सेवा यांचा विस्तार झाला तर हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी पोषक सामाजिक वातावरण तयार होऊ शकते. 'आजार झाल्यावर उपचार' या दृष्टिकोनाबरोबर 'आजार होऊ नये म्हणून प्रतिबंध' ही आरोग्यव्यवस्थेची दिशा अधिक मजबूत होणे गरजेचे आहे.

२९ सप्टेंबरचा जागतिक हृदय दिन त्यामुळे भीती निर्माण करण्याचा नव्हे, तर सजगता वाढविण्याचा दिवस आहे. हृदय आपल्यासाठी आयुष्यभर अविरत कार्य करते; त्याच्या बदल्यात त्याला गरज आहे ती निरोगी जीवनशैलीची आणि वेळेवर घेतलेल्या काळजीची. संतुलित आहार, नियमित हालचाल, व्यसनमुक्त जीवन, पुरेशी झोप, ताणाचे योग्य व्यवस्थापन, नियमित आरोग्य तपासणी आणि लक्षणांकडे वेळीच लक्ष देणे या सवयी स्वीकारल्या तर हृदयाच्या आरोग्यासाठी आपण महत्त्वाचे पाऊल उचलू शकतो. म्हणून या जागतिक हृदय दिनी केवळ हृदयविकाराविषयी चर्चा न करता आपल्या जीवनपद्धतीत आवश्यक बदल करण्याचा संकल्प करूया.

हृदय निरोगी असेल तर जीवनाची लय अधिक सक्षम राहील; आणि निरोगी व्यक्तींच्या सहभागातूनच निरोगी कुटुंब, निरोगी समाज आणि सक्षम राष्ट्र घडेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

## दुर्दैव

डोळे झाकुन खुशाल
बसने प्रवास करावा
गावठाण आल्याची वर्दी
देते दुर्गंधीयुक्त हवा ...

हगणदारी मुक्तिची
शासन करते बढाई
पण प्रत्यक्षात तशी
वस्तुस्थिती दिसत नाई ..

टमरेल घेऊन हाती
लोक जाती उघड्यावर
कायद्याचा वचक वाटते
राहीला नाही कुणावर ..

**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३९

# ‘मत चोरी’च्या आरोपावरून काँग्रेसचा एल्गार!

## साजिद खान पठाण यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

### ज्ञानेश कुमार यांना बडतर्फ करून अटक करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

‘एसआयआर’च्या माध्यमातून मतदारांची नावे वगळून ‘मत चोरी’ केली जात असल्याचा आरोप करीत काँग्रेसने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. आमदार साजिद खान पठाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना सेवेतून बडतर्फ करून अटक करण्याची मागणी करण्यात आली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार झालेल्या या आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



‘मतदाराचे नावच यादीतून काढणार असाल, तर मतदानाचा अधिकार कुठे राहिला?’ असा थेट सवाल करीत काँग्रेसने एसआयआर प्रक्रियेवर जोरदार आक्षेप घेतला. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेच्या कारभारात पारदर्शकता राहिलेली नसल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला.

इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्ताचा हवाला देत काँग्रेसने निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी मागील दहा महिन्यांत किमान १४ वेळा काही निर्णयांवर औपचारिक आक्षेप नोंदविल्याचे म्हटले आहे. एसआयआर प्रक्रिया, नवीन मतदारांची नोंदणी, मतदारांची नावे वगळणे तसेच निवडणूक आयोगाच्या आयटी प्रणालीच्या केंद्रीकरणासारख्या मुद्द्यांचा त्यात समावेश असल्याचे वृत्त आहे. या पार्श्वभूमीवर एसआयआर प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा पारदर्शक करावा, मतदारांची नावे वगळण्यापूर्वी योग्य पडताळणी करावी आणि मतदार यादीतील बदलांचा संपूर्ण तपशील सार्वजनिक करावा, अशी मागणी काँग्रेसने केली.

#### ‘१४ आक्षेपां’नी वाढवली चिंता

इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांनी दहा महिन्यांत किमान १४ वेळा काही निर्णयांवर औपचारिक आक्षेप नोंदविल्याचे समोर आले आहे. एसआयआर, मतदारांची नावे वगळणे, नवीन मतदारांची नोंदणी आणि आयटी प्रणालीच्या केंद्रीकरणाशी संबंधित बाबींचा त्यात समावेश असल्याचे वृत्त आहे. मात्र, निवडणूक आयोगाने निर्णय एकमताने होत असल्याचे स्पष्ट केले आहे.

#### ‘निवडणूक आयोगाला जाब द्यावाच लागेल’

पश्चिम बंगाल आणि बिहारमधील मतदार यादीच्या प्रक्रियेचा संदर्भ देत काँग्रेसने मतदारांची मोठ्या प्रमाणावर नावे वगळली जात असल्याचा आरोप केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही मतदारसंख्या व नोंदणीतील कथित अनियमिततेचे मुद्दे विरोधकांनी उपस्थित केले होते. राहुल गांधी यांनी यापूर्वी निवडणूक प्रक्रियेबाबत केलेल्या आरोपांचाही निवेदनात उल्लेख करण्यात आला. काँग्रेसच्या मते, निवडणूक आयोगाची विश्वासार्हता ही लोकशाहीच्या विश्वासार्हतेशी जोडलेली आहे. त्यामुळे आयोगाच्या निर्णय प्रक्रियेबाबत निर्माण झालेले प्रश्न टाळून चालणार नाहीत. एसआयआर प्रक्रियेबाबत जनतेसमोर स्पष्टता आणण्याची मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, निवडणूक आयोगाने आयोगातील निर्णय एकमताने होत असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे एॅव्ह्या मुद्द्यावरून काँग्रेसने उपस्थित केलेले प्रश्न आणि आयोगाची भूमिका यामुळे राजकीय वातावरण तापले आहे.

#### आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती

आमदार साजिद खान पठाण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात माजी राज्यमंत्री अजहर हुसैन, जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे, महानगर अध्यक्ष महेंद्र गवई, डॉ. जिशान हुसैन, माजी आमदार बबनराव चौधरी, प्रशांत पाचडे, मो. इरफान, कपिल रावदेव, अफसर कुरैशी, फजलू पहलवान, आकाश कवडे, कशिश खान, पूजा काळे, विजय तिवारी, सचिन शेजव, विनोद नालट, इलियास खान, मोईन खान, विजय देशमुख, अब्दुल कलाम, सुवर्णा रेखा जाधव, जया गेडाम, निलोफर खान, सुषमा मोरे, विजया खंडारे, हुसेन चौधरी, अभिलाष तायडे, राहुल सारवान, गणेश कळस्कर, विनोद मराठे, आसिफ खान, रहमान बाबू, शेख मुख्तार, सोहेल खान पठाण, प्रशांत देशमुख, पराग कांबळे, अभिजीत तवर, अंकुश तायडे, प्रशांत वानखडे, अन्नपूर्णेश पाटील, वर्षा गिरी, रेखा डोंगरे, दीक्षा चावरे, सीमा चावरे, शेख नावेद, डॉ. प्रमोद चौरे, सारंग मालानी, मोहसीन शाह, पद्माकर वासनिक, आकिब खान, सय्यद सोहेल, विशाल राठोड, योगेश थोरात, मो. युसुफ, श्रीकृष्ण चोरे, जयराम सोनोने, सैय्यद अहमद, शेख अब्दुल्ला, सोनू पठाण, फैसल खान, मुजीब सरकार, राजू पाटील जोगदंड, सुनील वानखडे, दीपक गवई, मो. शारिक, नागेश बागडे, अभिमान नितोने, चंद्रशेखर नकाशे, वैभव मानकर, वसीम खान, मंजूर अहमद आदी उपस्थित होते.

---

## वान धरण १०० टक्के भरले; तरी शेतकरी पाण्यावाचून!

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

वान धरण १०० टक्के भरलेले असतानाही त्याच्या अतिरिक्त पाण्याचा उपयोग शेतीसाठी होत नसल्याने तेल्हारा तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. धरणातून सोडले जाणारे पाणी वान नदीपात्रातून वाहून जाण्याऐवजी पाटाद्वारे शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचवावे, अशी मागणी करीत शेतकऱ्यांनी तहसीलदारांना निवेदन दिले.

गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने तालुक्यातील सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी सोयाबीनचे पीक हातचे गेल्याने शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले आहे. त्यातच तूर, उडीद आणि कापूस ही पिकेही पाण्याअभावी करपण्याच्या स्थितीत आहेत. अशा परिस्थितीत वान धरणातील उपलब्ध पाणी शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरू शकते.

मात्र, धरणातील पाणी नदीपात्रात सोडले जात असल्याने त्याचा शेतीसाठी पुरेसा उपयोग होत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.



#### रब्बीसाठी आतापासूनच नियोजनाची मागणी

वान धरणातून तातडीने शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच रब्बी हंगाम २०२६-२७ साठी आतापासूनच पाणी नियोजन करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. सध्याच्या खरीप हंगामातील नुकसानामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामातून दिलासा मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पाणी सोडण्याबाबत प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर शेतकऱ्यांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. निवेदन देताना तेल्हारा तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर आणि विविध कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## खामखेडमध्ये गुलालावरून पुन्हा राडा; ४० जणांवर गुन्हे

### दोन्ही गट आमनेसामने; चौघांना अटक, एक जण गंभीर जखमी

■ प्रतिनिधी | पातूर ■

गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान गुलाल उधळण्यावरून सुरू झालेल्या वादाचे पडसाद रविवारी पुन्हा उमटले. तालुक्यातील खामखेड येथे दोन्ही गट आमनेसामने येत हाणामारी झाल्याने गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेत नितीन बबन काळे जखमी झाले असून, त्यांच्यावर अकोला येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शनिवारी गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान गुलाल उधळण्याच्या कारणावरून दोन गटांत वाद झाला होता. या घटनेनंतर गावातील वातावरण काही काळ तणावपूर्ण होते. रविवारी याच वादाला पुन्हा तोंड फुटले आणि दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली. यामध्ये नितीन काळे गंभीर जखमी झाले. दोन्ही गटांकडून पातूर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या. पोलिसांनी तक्रारींची पडताळणी करून दोन्ही गटांतील एकूण ४० जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले. या प्रकरणात पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे.

#### पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष

खामखेड येथील परिस्थितीवर पातूर पोलिसांकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, वाद आणखी चिघळू नये यासाठी खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. गणपती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या वादाचा गावातील शांततेवर परिणाम होऊ नये, यासाठी पोलिसांनी सतर्कता वाढविली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार आर. टी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गोसावी व उपनिरीक्षक खंडारे करीत आहेत.

---


**Change In Name**

I HAVE CHANGED
MY NAME FROM
**MOHAMMAD HANIFODDIN**
PASSPORT NO : N7933319 TO
**MOHAMMAD HANIFUDDIN**
ADDRESS : FLAT NO 15 AHMAD APARTMENT NEAR NEETA GUEST HOUSE MOMINPURA AKOLA-444001


### जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

प्रोसेस नं. ३५५०/२०२६ तारीख : २३/०९/२०२६

Guardian Wards No. 642/2026 Fix for : 15/12/2026

1) Subhan Khan Jamir Khan, 2) Uzer Khan Subhan Khan, (Minor), Applicant No 2 is Minor Through Applicant No. 1 N. G. Father, Both R/o Mahan, Tq. Barshitakli, Dist. Akola

- Vrs ----

NIL

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'APPLICATION UNDER SECTION 29 AND 31 OF THE GUARDIAN AND WARDS ACT, 1890, FOR GRANT OF PERMISSION TO SELL THE PROPERTY OF MINOR APPLICANT NO. 2' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १५/१२/२०२६ ठेवलेली आहे. त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वत: किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १५/१२/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक २३ माहे सप्टेंबर सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अकोला
दिनांक : २३/०९/२०२६

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला

---

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५४४/२०२६ प्रोसेस नं. ११७९२/२०२६
चौ.ता. २१/१०/२०२६ दिनांक : १६/०९/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती उषा संतोषराव देशमुख, वय अं. ७५ वर्षे, धंदा- गुहीणी, २. श्री. राम संतोषराव देशमुख, वय अं. ५१ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी, ३. श्री. शाम संतोषराव देशमुख, वय अं. ५१ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी, क. १ ते ३ रा. पिंपळे नगर, शासकीय दुध डेअरी मागे, प्रभात किड्स जवळ, अकोला, ता. व जि. अकोला. ४. सौ. मंजुषा संतोषराव देशमुख, वय अं. ४६ वर्षे, धंदा - गृहीणी, रा. महानंदा कॉलनी, रिसोड, वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संतोषराव रघुपतराव देशमुख
**पत्ता :-** रा.पिंपळे नगर, शासकीय दुध डेअरी मागे, प्रभात किड्स जवळ, अकोला, ता. व जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संतोषराव रघुपतराव देशमुख यांचे दि. ०५/१२/२००९ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत अन्यथा कोणाची कसल्याही न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

### जाहीर नोटीस

१) पहिली व दुसरी बोली स्थावर माल जागेवर दिनांक १२/१०/२०२६ ला होईल,
२) तिसरी अंतीम बोली वि.न्यायालयाचे आवारात दिनांक २८/१०/२०२६ रोजी दुपारी ३ ते ५ वा. होईल.

**‘विक्रीचा जाहीरनामा (ऑर्डर २१, नियम ६६)’**
(नमुना क्रमांक २९. परिशिष्ट ई, अनुसूची १)

**अकोला येथील वि. ०८वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात**

दावा रु. २,९९,९६९/-
R.Dar. No.124/2018 प्रोसेस नं. १२२८८/२०२६
F.F.: 28/10/2026 दिनांक : २४/०९/२०२६
Arising out of Case.No.81/2016, Decided on 09/09/2018

**विश्वनाथ पुंजाजी खराटे**
...Vrs...
**वसंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, अकोट**

ज्याअर्थी अशी नोटीस देण्यात येत आहे की, समासात नमूद केलेल्या दाव्यामधील हुकूमनामाधारकाची मागणी पूर्ण करण्याकरिता, या न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८. ऑर्डर २१, नियम ६४ अन्वये सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या जप्त मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश दिला असून, दाव्याचा खर्च व विक्रीच्या दिनांकापर्यंतचे व्याज यासह ती मागणी रु. २,९९,९६९/- इतक्या रुपयांची आहे. ही विक्री जाहीर लिलावाद्वारे करण्यात येईल आणि ती मालमत्ता अनसूचीत निर्दिष्ट केल्याप्रमाणे लाटवार विक्रीसाठी मांडण्यात येईल. उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णित ऋणकोची जी मालमत्ता पुढील अनुसूचीमध्ये नमूद करण्यात आली आहे. त्या मालमत्तेची विक्री केली जाईल आणि उक्त मालमत्तेशी संलग्न असलेली दायित्वे व तत्संबंधी मागण्या ज्या मर्यादेपर्यंत निश्चित करण्यात आल्या आहेत त्या मर्यादेपर्यंत त्या गोष्टी अनुसूचीत प्रत्येक लाटासमोर निर्देशित केल्या जाईल. ही विक्री पुढी ढकलण्यासंबंधी कोणताही आदेश झाला नसल्यास, ती विक्री वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोला येथे २८/१०/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता सुरू होणाऱ्या मासिक विक्रीच्या वेळी धनको यांच्यामार्फत केली जाईल. तथापि, कोणत्याही लाटाबाबतची बोली मंजूर होण्यापूर्वी जर उपरोक्त ऋणाची आणि विक्रीच्या खर्चाची रक्कम देऊ करण्यात किंवा भरण्यात आली. तर तो विकी बंद करण्यात येईल. विक्रीच्या वेळी आम जनतेपैकी कोणालाही, व्यक्तिशः किंवा रीतसर अधिकृत केलेल्या एजंटामार्फत, बोली बोलण्याची मुभा राहील. तथापि, उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णित धनकोनी किंवा त्याच्या वतीने बोललेली बोली स्वीकारली जाणार नाही. तसेच, न्यायालयाने यापूर्वी स्पष्टपणे परवानगी दिलेली असल्याखेरीज, त्या धनकोंना केलेली कोणतीही विक्री विधीग्राहय (व्हॅलिड) ठरणार नाही. विक्रीच्या आणखी काही शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

सन २०१६ चा दावा क्र.८१ या दाव्यात विश्वनाथ खराटे ही वादी असून वसंत नागरी हा प्रतीवादी होता. या दाव्याचा न्यायनिर्णय अकोला येथील वि. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांनी दिला आहे.

**-: विक्रीच्या शर्ती :-**

१. खालील अनुसूचीत नमूद केलेला तपशील हा न्यायालयाला असलेल्या अद्ययावत महतीनुसार नमूद केलेला आहे. परंतु या जाहीरनाम्यात काही चूक असल्यास, चुकीचे विधान असल्यास किंवा एखादी गोष्ट गाळली गेली असल्यास त्याबाबत न्यायालय जबाबदार राहणार नाही.

२. दरवेळी बोली किती रकमेने वाढवावयाची हे विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी ठरवील. बोलीच्या रकमेबाबत किंवा बोलीदाराबाबत वाद निर्माण झाला तर तो लाट ताबडतोब पुन्हा लिलावासाठी मांडला जाईल.

३. सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदारास त्या लाटाचा खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, मात्र तो बोलीदार बोली बोलण्यास कायदेशीरपणे पात्र असला पाहिजे, आणि तसेच, सर्वाधिक बोलीमध्ये देऊ केलेली किंमत अत्यंत अपुरी असल्याचे स्पष्ट दिसून आल्याने ती बोली नाकारणे इष्ट ठरेल असे न्यायालयास किंवा विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्यास वाटल्यास, न्यायालय किंवा असा अधिकारी स्वविवेकानुसार ती बोली स्वीकारण्यास नकार देऊ शकेल.

४. विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी स्वविवेकानुसार आणि कारणे नमूद करून विक्री तहकूब करू शकेल. परंतु, तो अधिकार नेहमी ऑर्डर २१, नियम ६९ च्या उपबंधाच्या आधीन राहील.

५. जंगम मालमत्तेच्या बाबती प्रत्येक लाटाची किंमत विक्रीच्या वेळी द्यावी लागेल किंवा विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी सांगेल त्याप्रमाणे विक्रीनंतर लवकरच भरावी लागेल, आणि कशा किंमत भरण्यास कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करून विकली जाईल

६. स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, ज्या व्यक्तीस खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, त्या व्यक्तीने, तशी घोषणा झाल्यानंतर ताबडतोब खरेदी किंमतीच्या २५ टक्के एवढी रक्कम, विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्याकडे अनामत म्हणून भरली पाहिजे. अशारीतीने रक्कम भरण्यात कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करून विकली जाईल.

७. मालमत्तेची विक्री झाल्यापासून (विक्रीचा दिवस वगळता) पंधराव्या दिवशी न्यायालयाने कामकाज बंद होण्यापूर्वी खरेदीदार खरेदी किंमतीची संपूर्ण रक्कम भरील किंवा पंधरावा दिवस हा रविवार अथवा सुटीचा दिवस असल्यास पंधराव्या दिवसानंतरच्या पहिल्या कामाच्या दिवशी अशी रक्कम भरण्यात येईल.

८. खरेदी किंमतीची उर्वरित रक्कम नेमून दिलेल्या मुदतीच्या आत भरण्यात कसूर झाल्यास विक्रीची नवीन अधिसूचना काढून त्या मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात येईल अशा प्रसंगी अनामत रकममधून विक्रीचा खर्च भागविल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम. न्यायालयाला उचित वाटल्यास सरकारजमा केली जाईल आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे त्या मालमत्तेसंबंधीचे किंवा ती मालमत्ता मागाहून जितक्या रकमेस विकली जाईल त्या रकमेच्या कोणत्याही भागासंबंधीचे सर्व मागणी हक्क नाहीसे होतील. आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी आणि न्यायालयाची मोहोर लावून हा जाहीरनामा काढला आहे.

**-: मालमत्तेची अनुसूची :-**
**(Description of Property)**
(Description of Property owned by J. D. As per Process Parcha)

**स्थावर मालमत्ता मौजे:** चोहोट्टा बाजार, ता. अकोट, जि. अकोला स्वतंत्र प्लॉट क्र. ३, गट क्र ५५, मालमत्ता क्र. ३५९, एकुण क्षेत्रफळ २९४.१८ स्क्वेअर मिटर सदर प्लॉटवर संस्थेचे कार्यालयाचे बांधकाम केलेले आहे. सदर प्लॉटला चारही बाजुने असलेल्या चर्तु:सिमा हया खालीलप्रमाणे आहेत:
**पूर्वेस - १० फुटाची सर्व्हिस लाईन, पश्चिमेस- अकोट- अकोला रोड**
**उत्तरेस- श्री. राधाकिसन मुकुंदी यांचा प्लॉट, दक्षिणेस- श्री. कैलास रेलकर यांचा प्लॉट क्र. २**

शिक्का

अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---


**Change In Name**

I Have change
My Name from
**JYOTI HARESHLAL MASAND**
-TO-
**AARTI BHARATKUMAR SATNANI**
My Residential Address In Pakki kholi Near Durga Mata Mandir, Sindhi Camp, Akola - 444004

**Change In Name**

I Have change
My Name from
**ARTI BHARATKUMAR SATNANI**
-TO-
**AARTI BHARATKUMAR SATNANI**
My Passport Number - L9881233
My Residential Address In Pakki kholi Near Durga Mata Mandir, Sindhi Camp, Akola -44400415

**Change In Name**

I have chenge
my name From
**SAYEE SHRIKANT THAKRE**
-TO-
**SAYEE SHRIKANT THAKARE**
My Residential address is Flat no 6 saraswati vihar behind patlacha wada hotel, Malkapur road Akola-444004

**Change In Name**

I have chenge
my name From
**CHETANDAS SATRAMDAS JESWAN**
-TO-
**CHETAN SATRAM JESWANI**
My Residential address is JIJAMATA NAGAR SINDHI CAMP AKOT-444101


### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४१३/२०२६ प्रोसेस नं. १०७७८/२०२६
चौ.ता. ०७/१०/२०२६ दिनांक : २१/०८/२०२६

**अर्जदार :** सुरेश मनोहर राजनहीरे रा. अकोट फैल, अशोक नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सखुबाई लक्ष्मण तुमसरे
**पत्ता :-** रा. व्दारा सुरेश मनोहर राजनहीरे रा. अकोट फैल, अशोक नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सखुबाई लक्ष्मण तुमसरे यांचे दि. १२/१२/१९९९ रोजी अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६१२/२०२६ प्रोसेस नं. १२२४४/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ दिनांक : १४/०९/२०२६

**अर्जदार :** १. जयंत नारायण देशपांडे रा. प्लॉट नं. १०, कपिला नगर, गौरक्षण रोड, दत्त कॉलनी जवळ, अकोला. २. अर्चना हेमंत इखे रा. ए/१०१, दिपा रेखा सीएचएस, मिथानगर रोड, सालवी वाडी जवळ, मुलुंद ईस्ट, मुंबई. ३. अभिजीत जयंत देशपांडे रा. ए/३०१, इस्टर्न वाईडस, कुरेशी नगर, बुंतुर भवन समोर, शेट्टी कॉलनी जवळ, कुर्ला ईस्ट, मुंबई.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वैशाली जयंत देशपांडे
**पत्ता :-** रा. बजाज नक्षत्र संकुल, फ्लॅट नं. ३०४, तिसरा माळा, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वैशाली जयंत देशपांडे यांचे दि. २५/०८/२०२६ रोजी ओझोन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३१८/२०२६ प्रोसेस नं. १०३३४/२०२६
चौ.ता. २४/०९/२०२६ दिनांक : ११/०८/२०२६

**अर्जदार :** १. प्रविण श्रीरामजी दांदळे २. सुनिल श्रीरामजी दांदळे दोघेही रा. गोमाजी नगर, डीपी रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीमती प्रमिला श्रीराम दांदळे
**पत्ता :-** रा. गोमाजी नगर, डीपी रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीमती प्रमिला श्रीराम दांदळे यांचे दि. १५/०४/२०२५ रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३८९/२०२६ प्रोसेस नं. १०६५८/२०२६
चौ.ता. ०३/१०/२०२६ दिनांक : १९/०८/२०२६

**अर्जदार :** संजू एकनाथ सपकाळ रा. क्वार्टर नं. बी-२/५, बी ॲण्ड सी क्वार्टस, जुना जालना, बचत भवन जवळ, ता. जि. जालना मो. नं. ८३२९४०६७१०

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नलिनी भूपतलाल ठकरार उर्फ नलिनी संजू सपकाळ
**पत्ता :-** रा. व्दारा संजू एकनाथ सपकाळ रा. विठ्ठल फैल, उमरी नाका, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नलिनी भूपतलाल ठकरार उर्फ नलिनी संजू सपकाळ यांचे दि. ०६/०७/२०२६ रोजी सर्वोपचार रूग्णालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

---


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### एसआयआर आणि मतदार यादीवरून राजकीय रण पेटले

# फेक नॅरेटिव्ह'चा फुगा फुटला; भोयरांचा राहुल गांधींवर हल्लाबोल

## तीनही निवडणूक आयुक्तांच्या भूमिकेने काँग्रेसच्या आरोपांवर भाजपचा पलटवार

**वर्धा/जनमाध्यम**

निवडणूक आयोगाच्या कारभारावरून देशभरात राजकीय रण पेटले असतानाच तीनही निवडणूक आयुक्तांच्या संयुक्त भूमिकेने काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर भाजपने जोरदार पलटवार केला आहे. राहुल गांधी आणि काँग्रेसकडून उभे केले जात असलेले कथित फेक नॅरेटिव्ह आता उघडे पडले असल्याचा दावा राज्याचे मंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केला.



भाजपच्या वर्धा जिल्हा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत भोयर यांनी एईं प्रक्रिया मतदार याद्या फॉर्म क्रमांक सहा आणि ईव्हीएमवरून काँग्रेसच्या भूमिकेवर निशाणा साधला. निवडणूक आयोगाने २६ सप्टेंबरच्या निवेदनात एईं संदर्भातील प्रमुख निर्णय तीनही आयुक्तांच्या संमतीने झाल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच कॅबिनेट सेक्रेटरींना पाठविलेले पत्र धोरणात्मक निर्णयाशी संबंधित नसून आयोगातील प्रतिनियुक्त अधिकाऱ्याच्या कामकाजाशी संबंधित असल्याचे आयोगाने सांगितले आहे.

भोयर म्हणाले की, संविधान हातात घेऊन संवैधानिक संस्थांवरच प्रश्न उपस्थित करणे योग्य नाही. निवडणूक आयोगावर अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेस सत्तेत असताना निवडणूक आयोग योग्य आणि भाजप विजयी झाल्यानंतर तोच आयोग संशयाच्या भोवऱ्यात असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

SIR प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांनी प्रत्यक्ष सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. वर्ध्यात BLA १ आणि BLA २ नियुक्त करून मतदार याद्यांच्या शुद्धीकरणात योगदान देता येते. आरोपांच्या राजकारणापेक्षा प्रत्यक्ष प्रक्रियेत सहभागी होणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

फॉर्म सहाबाबतही आयोगाने स्पष्टीकरण दिले असून सर्वोच्च न्यायालयाने संबंधित बदलांना मान्यता दिल्याचे आयोगाने नमूद केले आहे.ईव्हीएमच्या मुद्द्यावरही काँग्रेसकडून सातत्याने आरोप होत असल्याचे सांगत भोयर यांनी आयोगाच्या भूमिकेचा दाखला दिला. मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक करण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावे. संविधानिक संस्थांवरील जनतेचा विश्वास कायम ठेवणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी पत्रकार परिषदेला माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे, नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकुर, निलेश किटे, श्रीधर देशमुख, उपस्थित होते.

# सिंदी बाजार समितीचे ठराव शेतकऱ्यांच्या दारी; दुष्काळी मदतीसाठी १ लाखांचा ठराव

## अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आकस्मिक मृत्यूला २० हजारांची मदत

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

कृषी उत्पन्न बाजार समिती सिंदीची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. सभापती केशरीचंदजी खंगारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत शेतकरी हिताचे महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. अल्पभूधारक शेतकऱ्याचा सर्पदंश वीज पडणे पुराच्या पाण्यात वाहून जाणे अथवा विजेच्या धक्क्याने आकस्मिक मृत्यू झाल्यास बाजार समितीकडून २० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सेलू तालुक्याचा कोरडा दुष्काळग्रस्त भागात समावेश करून प्रत्येक शेतकऱ्याला एक लाख रुपयांची मदत देण्यात यावी असा ठरावही सर्वानुमते मंजूर करण्यात आला. हा ठराव राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. पिपरा रोड दुय्यम आवारातील अतिक्रमण हटविण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडे तातडीने पत्रव्यवहार करण्याचाही निर्णय घेण्यात आला. सभेत बाजार समितीच्या विकासकामांचा आढावा घेण्यात आला. डिजिटल कामकाजासाठी माय एपीएमसी सॉफ्टवेअर आणि संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. गेट क्रमांक



तीनवरील सिमेंट काँक्रीट रस्ता पार्किंग नाले आणि ८० मे. टन वजन काट्यासाठी रॅम्प व सुरक्षा भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. बाजार आवारात २४ तास सीसीटीव्ही सुविधा तसेच शेतकऱ्यांसाठी पाणी शेड गोदाम आणि विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान पत्रकार मोहन सुरकार यांनी सिंदीच्या कापूस बाजारपेठेच्या अधोगतीचा मुद्दा उपस्थित केला. एकेकाळी कापसासाठी प्रसिद्ध असलेल्या सिंदी बाजारात आज कापसाच्या एका बोंडाचीही खरेदी विक्री होत नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. बाजारपेठेला गतवैभव मिळवून देण्यासाठी मास्टर प्लॅन आहे का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मात्र यावर संचालक मंडळाकडून ठोस उत्तर मिळाले नसल्याने बाजारपेठ पुनरुज्जीवनाचा मुद्दा चर्चेत राहिला.

## संक्षिप्त

### अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या दोघांवर कारवाई

**तळेगाव-** अवैधरीत्या वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनावर पोलिसांनी कारवाई करून ट्रॅक्टर आणि वाळूसाठ्यासह सहा लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई तळेगाव श्याम पंत येथील आष्टी टी पॉइंट परिसरात करण्यात आली. अवैध वाळू वाहतुकीबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी परिसरात सापळा रचला. यावेळी वाळूची वाहतूक करणारा ट्रॅक्टर पोलिसांच्या हाती लागला. पोलिसांनी ट्रॅक्टरची तपासणी केली असता त्यामध्ये वाळूसाठा आढळून आला. पोलिसांनी ट्रॅक्टर आणि वाळूसाठा असा एकूण सहा लाख दहा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी कैलास सयाम रा रामदरा तळेगाव आणि विनोद मुंदेकर रा काकडदरा तळेगाव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तळेगाव पोलिस करीत आहेत.

### प्रतिबंधित तंबाखूसह नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा-** प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि पानमसाल्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर पोलिसांनी कारवाई करून नऊ लाख ३७ हजार २८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शेकापूर ते बांबर्डा मार्गावर करण्यात आली. पोलिसांचे पथक या मार्गावर गस्त घालत असताना संशयास्पद वाहनाची माहिती मिळाली. त्यानुसार वाहनाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आणि गुटखा आढळून आला. पोलिसांनी तंबाखूजन्य पदार्थांसह वाहन असा एकूण नऊ लाख ३७ हजार २८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सचिन वडमलवार रा शेकापूर बाई आणि श्याम प्रमोद तिमांडे रा बोपापूर यांच्याविरुद्ध वडनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई सुरू आहे. पुढील तपास वडनेर पोलिस करीत आहेत.

### दखलपात्र गुन्ह्याच्या तयारीत असलेल्यावर कारवाई

**वर्धा-** दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या दबा धरून बसलेल्या युवकावर रामनगर पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई हिंदनगर परिसरात करण्यात आली. शेखर राजकुमार पाचे वय २९ रा सिंदी मेघे हा हिंदनगर परिसरात अंधाराचा फायदा घेत आपले अस्तित्व लपवून बसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याची चौकशी केली. यावेळी त्याने पोलिसांना समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्याकडे दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने हालचाली सुरू असल्याचा संशय आल्याने पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली. या प्रकरणी रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिसरात चोरी आणि अन्य गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून गस्त वाढविण्यात आली आहे. पुढील तपास रामनगर पोलिस करीत आहेत.

### तलावाच्या पाण्यात बुडून युवकाचा मृत्यू

**आर्वी-** पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने युवकाचा तलावात बुडून मृत्यू झाला. ही घटना आर्वी तालुक्यातील सारंगपुरी तलाव परिसरात घडली. मनोज रामबाबू आदिवासी वय २६ रा मडियानाका रायसेन मध्यप्रदेश ह म सारंगपुरी तलावाजवळ असे मृत युवकाचे नाव आहे. मनोज आदिवासी हा तलावाच्या पाण्यात पोहण्यासाठी गेला होता. पोहत असताना तलावातील पाण्याचा अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात गेला. त्यानंतर तो पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. मात्र त्याचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.

# गणेश विसर्जनातून नदी प्रदूषणाला आळा

## हनुमान टेकडीवरील विसर्जन कुंडाची खा. अमर काळे यांनी केली पाहणी

**वर्धा/जनमाध्यम**

श्रद्धेचा उत्सव पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा ठरावा, या उद्देशाने वैद्यकीय जनजागृती मंचाच्या पुढाकारातून हनुमान टेकडी येथे उभारण्यात आलेल्या गणेश विसर्जन कुंडाला यंदाही नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. अनंत चतुर्दशीच्या दिवशी खासदार अमर काळे यांनी येथे भेट देऊन विसर्जन कुंडाची पाहणी केली. यावेळी आयोजित गणपती महाआरतीत सहभागी होत त्यांनी उपक्रमाचे कौतुक केले. गणेशोत्सवात नदीपात्रात मूर्ती, निर्माल्य आणि पूजासाहित्य विसर्जित केल्याने जलप्रदूषणाचा



प्रश्न निर्माण होतो. ही समस्या लक्षात घेऊन वैद्यकीय जनजागृती मंचाचे डॉ. सचिन पावडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गेल्या काही वर्षांपासून पर्यावरणपूरक विसर्जनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. नदीऐवजी विसर्जन कुंडाचा वापर करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. महाआरतीपूर्वी डॉ. सचिन पावडे यांनी खा.अमर काळे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी मंचाचे पदाधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

**पाणी मुरविण्याचाही संदेश**

नदी प्रदूषण रोखण्याबरोबरच मंचाच्या माध्यमातून पावसाच्या पाण्याच्या जलपुनर्भरणासाठीही जनजागृती केली जात आहे. शहरांतील वाढते काँक्रीटीकरण आणि पक्क्या बांधकामांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे घरांच्या छतावरील पाणी वाहून न जाता जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करण्याचे आवाहन मंचाकडून केले जात आहे. नदी, पाणी आणि पर्यावरण हे पुढील पिढ्यांचे भविष्य आहे. श्रद्धेच्या उत्सवाला पर्यावरण संवर्धनाची जोड देणारा हा उपक्रम राज्यभर आणि देशभर पोहोचण्याची गरज आहे. अशा उपक्रमांतून जलस्त्रोतांचे संवर्धन आणि भूजलपातळी वाढविण्यास मदत होईल, असे खा.अमर काळे यांनी सांगितले.

### मोटारसायकल अनियंत्रित झाल्याने तरुणाचा मृत्यू

**वर्धा-** अचानक समोर आलेले वाहन वाचविण्याच्या प्रयत्नात मोटारसायकल अनियंत्रित होऊन झालेल्या अपघातात मागे बसलेल्या १७ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना सावंगी मेघे पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अनिल धनाराम मेघवाल वय १७ हा आपल्या भावासोबत मोटारसायकलने जात होता. ते दोघे देवीचे पेनानजी साळोट पॉईंटकडून जात असताना अचानक समोर वाहन आल्याचे सांगण्यात आले. हे वाहन वाचविण्याच्या प्रयत्नात मोटारसायकल चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यावेळी मोटारसायकलवर मागे बसलेला अनिल खाली पडला. अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना त्याची प्रकृती गंभीर झाली आणि डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच सावंगी मेघे पोलिसांनी नोंद घेतली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृत तरुण राजस्थानमधील नागोर जिल्ह्यातील रामपुरा परिसरातील रहिवासी असल्याची माहिती पोलिस नोंदीत आहे. सावंगी मेघे पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू अंतर्गत नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# भक्तीचा उत्सव, पर्यावरणाची जबाबदारी

## गणरायाला पर्यायी विसर्जनातून निरोप




**वर्धा/जनमाध्यम**

गणरायाच्या भक्तीत पर्यावरण संवर्धनाची जोड देत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने यंदाही पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचा संदेश दिला. अनेकांत स्वाध्याय मंदिर परिसरात समितीच्या पुढाकाराने उभारलेल्या पर्यायी विसर्जन केंद्रावर रात्री उशिरापर्यंत ५० हून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. नदी नाले तलाव आणि विहिरींमध्ये मूर्ती विसर्जनामुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

गणेशभक्त शंकरराव तेलरांधे यांनी दान दिलेल्या गणेशमूर्तीचे विसर्जन अनेकांत स्वाध्याय मंदिरचे विश्वस्त अरुणभाई चवडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव किटे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार तसेच प्रकाश कांबळे यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र अंनिसकडून १७ वर्षांपासून गणेशमूर्ती दान आणि निर्माल्य दानाची मोहीम राबविली जात आहे. प्रबोधन आणि प्रशासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे पर्यायी विसर्जन केंद्रांची संकल्पना अनेक ठिकाणी रुजली आहे. वर्ध्यातही अनेकांत स्वाध्याय मंदिर आणि रोटरी क्लब ऑफ गांधी सिटी यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविला जातो.

नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी पवनार येथे मोठा विसर्जन हौद उपलब्ध करून देण्यासाठी तसेच शहरात पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी समितीने पाठपुरावा केला. घरी किंवा सामूहिकरीत्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्याचे आवाहनही करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप गुळघाणे यांनी केले. संचालन मोनाली गुळघाणे यांनी तर आभार रजनी सुरकार यांनी मानले. समिती कार्यकर्ते आणि अनेकांत स्वाध्याय मंदिरच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**वर्धा-** शेतशिवारातील झाडाला गळफास घेऊन इसमाने आत्महत्या केल्याची घटना आर्वी तालुक्यातील सारंगपुरी तलाव मार्गावर घडली. विनोद दयाराम कुथे वय ४७ रा जनतानगर आर्वी असे मृत इसमाचे नाव आहे. विनोद कुथे हे शेतशिवारात गेले होते. यावेळी त्यांनी झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. काही वेळाने हा प्रकार परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांना कळविण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेमुळे जनतानगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी तक्रारीवरून आर्वी पोलिसांनी नोंद केली आहे. पुढील तपास आर्वी पोलिस करीत आहेत.

# शेतीची माती वाचली तरच शेतकऱ्याचे भविष्य सुरक्षित-सुभाष शर्मा

## प्राकृतिक शेतीकडे वळण्याचे तज्ज्ञांचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

रासायनिक निविष्ठांचा वाढता खर्च, जमिनीचा खालावत चाललेला पोत आणि शेतीतील अनिश्चितता या पार्श्वभूमीवर प्राकृतिक आणि टिकाऊ शेतीचा मार्ग शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरू शकतो. शेतीची माती जपली तरच पुढील पिढ्यांची शेती सुरक्षित राहील, असा संदेश देत पद्मश्री सुभाष शर्मा यांनी प्राकृतिक शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. रोटरी क्लब ऑफ गांधी सिटी वर्धातर्फे आयोजित शेती कार्यशाळेला वर्धा आणि परिसरातील एक हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

रोटरी क्लब गांधी सिटीच्या व्होकेशनल सर्व्हिस अंतर्गत आयोजित या कार्यशाळेत



पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची विशेष उपस्थिती होती. टू ब्रदर्स ऑरगॅनिक फार्म्सचे संचालक सत्यजित हांगे आणि पद्मश्री सुभाष शर्मा यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

प्राकृतिक शेतीच्या विविध पद्धती, जमिनीचे आरोग्य, उत्पादन खर्चात कपात आणि टिकाऊ शेती याबाबत तज्ज्ञांनी सविस्तर माहिती दिली. केवळ उत्पादन घेणे नव्हे तर शेतीमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणेही महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले. मूल्यवर्धन, ब्रँडिंग आणि प्रभावी विपणनातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला नवी दिशा मिळू शकते, यावरही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेत शेतकऱ्यांना तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली. अध्यक्ष संदीप कदम यांनी शेतकऱ्यांच्या ज्ञान आणि कौशल्यवृद्धीसाठी क्लबतर्फे भविष्यातही उपक्रम राबविण्याचे सांगितले. मोठ्या संख्येने झालेली उपस्थिती ही प्राकृतिक शेतीविषयी वाढत्या जागरूकतेची साक्ष ठरली.

### दुकान हटविण्यास सांगत साहित्याची फेकफाक

**हिंगणघाट-** दुकान हटविण्यास सांगत वाद घालून हवा भरण्याच्या पंपाने मारहाण केल्याने एक जण जखमी झाल्याची घटना हिंगणघाट शहरातील मरोठी चौक परिसरात घडली. शास्त्री वॉर्डातील प्रकाश हाते वय ५५ हे नेहमीप्रमाणे सायकल दुरुस्तीचे काम करीत होते. यावेळी शेजारी राहणारे सुरेश मंबलवार आणि संजय नामक व्यक्ती तेथे आले.त्यांनी दुकान हटविण्यास सांगत वाद घातला. यानंतर दोघांनी दुकानातील साहित्याची फेकफाक केली.यावेळी हवा भरण्याचा पंप घेऊन प्रकाश हाते यांना मारहाण करण्यात आली. यात त्यांना दुखापत झाली. दुकान हटविले नाही तर पाहून घेण्याची धमकीही देण्यात आली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. हाते यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी सुरेश मंबलवार आणि संजय यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत,

### पतीवर संशय घेतल्याच्या कारणावरून महिलेला शिवीगाळ

**देवळी -** पतीच्या प्रेमसंबंधाच्या संशयावरून एका महिलेला अश्लील भाषेत शिवीगाळ करून मारहाणीची धमकी दिल्याची घटना देवळी शहरातील मनोहर मंदिर परिसरात घडली. याप्रकरणी देवळी पोलिसांनी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी महिला आणि तिचे पती हे त्यांच्या घरासमोर उभे होते. त्यावेळी आरोपी महिला घरासमोरून जात होती. फिर्यादीच्या पतीने आरोपी महिलेला तिच्या पतीसोबत प्रेमसंबंध असल्याबाबत विचारणा केली. तसेच माझी पत्नी तुमच्यावर संशय घेत आहे का, अशी विचारणा केल्याने वादाला सुरुवात झाली.यावेळी आरोपी महिलेने फिर्यादी महिलेला उद्देशून अश्लील शिवीगाळ केली. माझ्या नवऱ्यापासून दूर राहत नाहीस, तुला माझा नवरा पाहिजे, अशा आशयाचे अपशब्द वापरल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या पतीला हाताने मारहाण केली तसेच पुढे मारहाण करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास देवळी पोलिस करीत आहेत.

# मातीशी नातं जपणाऱ्या अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील संगीता झाडेची भरारी

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

शेतातील मातीशी नातं जपणाऱ्या एका अल्पभूधारक शेतकऱ्याच्या लेकीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले आहे. सखाराम झाडे यांची कन्या संगीता सखाराम झाडे हिने नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. तिच्या या यशाने झाडे कुटुंबासह सिंदी रेल्वे परिसरातील नागरिकांची मान उंचावली आहे.

ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या संगीतासमोर वैद्यकीय शिक्षणाचा प्रवास आव्हानांनी भरलेला होता. शेतीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू असताना शिक्षणाचा वाढता खर्च आणि मर्यादित आर्थिक साधने ही मोठी अडचण होती. मात्र, परिस्थितीसमोर हार न मानता



तिने अभ्यासात सातत्य ठेवले. आई वडिलांचे पाठबळ, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची जिद्द या जोरावर तिने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले.

संगीताचे यश केवळ एका कुटुंबाचा आनंद नाही तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे. आर्थिक परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ध्येय निश्चित असेल आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले तर स्वप्न साकार करता येते, हे संगीताने दाखवून दिले.

एमबीबीएस पूर्ण केल्याबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक आणि सिंदी रेल्वे परिसरातील नागरिकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील वैद्यकीय वाटचालीत सर्वसामान्य आणि गरजू रुग्णांची सेवा करण्यासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करावा, अशा शुभेच्छाही नागरिकांनी व्यक्त केल्या. शेतकऱ्याच्या घरातून डॉक्टर होण्यापर्यंतचा संगीताचा प्रवास अनेक लेकींना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देणारा आहे. मातीशी जोडलेली लेक आज वैद्यकीय क्षेत्रात उंच भरारी घेत आहे. तिच्या यशाने स्वप्नांसमोर परिस्थितीची भिंत कधीच मोठी नसते, हा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३०२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# घराभोवती ड्रोन फिरल्याने यशोमती ठाकूर यांची पोलिसांत तक्रार

**अमरावती/प्रतिनिधीः-** गणोडीवाल लेआउट परिसरातील माजी पालकमंत्री तथा काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांच्या निवासस्थानाच्या परिसरात ड्रोन कॅमेरा फिरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी गाडगेनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. ड्रोन कोण उडवत होते आणि तो तेथे कोणत्या कारणासाठी फिरविण्यात आला, याची चौकशी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

ठाकूर यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या निवासस्थानाच्या परिसरात ड्रोन कॅमेरा घिरट्या घालताना आढळला. ड्रोनद्वारे घराचे चित्रीकरण अथवा परिसरावर लक्ष ठेवले जात असल्याची शक्यता त्यांनी तक्रारीत व्यक्त केली आहे. त्यामुळे या प्रकाराची माहिती घेऊन संबंधित व्यक्तीचा शोध घेण्याची मागणी त्यांनी पोलिसांकडे केली. तक्रार प्राप्त झाल्यानंतर गाडगेनगर पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. ड्रोन नेमका कोणत्या दिशेने आला, तो कुठे उतरविण्यात किंवा नियंत्रित करण्यात आला, त्याचे संचालन कोणी केले आणि त्यामधून कोणतेही चित्रीकरण झाले का, याबाबत पोलिसांकडून माहिती घेतली जात आहे. परिसरातील उपलब्ध माहिती तसेच संभाव्य प्रत्यक्षदर्शींकडूनही चौकशी केली जाण्याची शक्यता आहे. ड्रोनच्या हालचालींबाबत काही दृश्य किंवा अन्य पुरावे उपलब्ध आहेत का, याचीही तपासणी केली जात आहे. गाडगेनगरचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी तक्रार प्राप्त झाल्याचे सांगून ड्रोन कुठून आला आणि तो कोणी उडविला, याबाबत चौकशी सुरू असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, ड्रोन उडविण्यामागील नेमका उद्देश अद्याप स्पष्ट झालेला नाही.

---

द डेफ अ‍ॅन्ड डम्ब रिलीफ असोसिएशन, साईनगर, अमरावती. ४४४ ६०७

## वार्षिक आमसभेची सुचना

**संस्थेची वार्षिक आमसभा रविवार दि. २५ ऑक्टोंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थेची जुनी इमारत, साईनगर, अमरावती येथे आयोजीत करण्यात आली आहे. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात येईल.**

१) **मागील आमसभा दि. १५-०२-२०२६ चे कार्यवृत्त मंजुर करणे.**
२) **वर्ष २०२५-२६ चे वाार्षिक अहवाल सचिव द्वारा प्रस्तुती.**
३) **वर्ष २०२५-२०२६ चे ऑडीट अहवाल मंजुर करणे.**
४) **वर्ष २०२६-२०२७ चे अंदाज पत्रकास मंजुरी देणे.**
५)**डॉ. नविन हंतोडकर यांचा राजीनामा मंजुर करुन रिक्त पद भरणेबाबत.**
६) **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय. आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.**

धन्यवाद !
**अमरावती.**

श्री अजयकुमार हेडा
सचिव

टिप :-१) **गणपुर्ती अभावी स्थगीत आमसभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल.**
२) **सभेनंतर स्नेहभोज आयोजीत करण्यात आला आहे.**

---

### (मालमत्ता खरेदी संदर्भात जाहीर सूचना)
### जाहीर सूचना

सर्व जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, माझे अशील १) मो. एजाजो?द्दिन व.मो. नियाजोदिन २) मो. नावेद व. अब्दुल वाहिद ३) साकिबअली व. किस्मत आली रा. अंजनगावसुर्जी ता अंजनगावसुर्जी जि. अमरावती हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मालमत्ता सध्याचे कायदेशीर मालक १) सरफराजखान व. फातेह्खान २) फातमा अजीज खान ३) मोहम्मद खान व. समदखान ४) मसूदखान व. समद खान वरील १ते ४ सर्व रा. भालदारपुरा अंजनगावसुर्जी ता. अंजनगावसुर्जी जि. अमरावती व ५) महेबूबखा व. मुस्तफाखा उमरी रोड नागपूर ता.जि नागपूर ६) महेमूद व. खानसमदखान रा. नाईकवाडी, शेवगाव अहमदनगर यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले असून, त्याबाबतचा इसार पावती/करारनामा झालेला आहे.

मालमत्तेचे वर्णन (परिशिष्ट)

जिल्हाः अमरावती तालुकाः अंजनगाव सुर्जी गाव/शहरः अंजनगाव सुर्जी
शिट नं. १६ बी प्लॉट नंबरः ३४ /२ एकूण क्षेत्रफळ : २१०.१० चौ. मी.. धारणाधिकार अ
शिट नं. १६ बी प्लॉट नंबरः ३४/३ एकूण क्षेत्रफळ : ७६.९०चौ. मी. धारणाधिकार अ
शिट नं. १६ बी प्लॉट नंबरः ३३ एकूण क्षेत्रफळ : २६८.७० चौ. मी. धारणाधिकार अ व धारणाधिकार २६.८० ब
शिट नं. ११ डी प्लॉट नंबरः १३६ एकूण क्षेत्रफळ १३१.२० चौ.मी. धारणाधिकार अ
शिट नं. ११ डी प्लॉट नंबरः १३५ एकूण क्षेत्रफळ ३९६ चौ. मी. धारणाधिकार अ

उपरोक्त प्लॉट ची सयुक्तिक चतुःसीमा (आजूबाजूची जागा)

पूर्वेसः ६ मीटर शनिवारा रोड पश्चिमेसः ६ मीटर इमाम चौक रोड
दक्षिणेसः ३ मीटर रोड उत्तरेस : ६ मीटर मज्जीद रोड

वरील चातुर्सिमे आतील संपूर्ण प्लॉट (मालमत्ता) हा खरेदी खताचा विषय आहे सदर मालमत्ता ही सर्व प्रकारचे कर्ज, बोजा, गहाण, दान, वारसा हक्क, वाद, कोर्ट कज्जे, लीन (Lien), किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर बोजापासून मुक्त व निर्वेध आहे, असा विश्वास सध्याच्या मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे.

तरी सदरहू मालमत्तेवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, वारसा हक्क, गहाण हक्क, अन्नवस्त्राचा अधिकार, स्थगिती आदेश किंवा इतर कोणताही कायदेशीर आक्षेप, निकाल, आपसी निकाल हुकुमनामा असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील स्वाक्षरीकारांच्या वरील पत्त्यावर मूळ कागदपत्रांच्या पुराव्यांसह लेखी आक्षेप माझ्या कार्यालयात कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप नआल्यास सदर मालमत्ता पूर्णपणे निर्वेध (र्णे ऊत) आहे असे समजून माझे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही आक्षेपांचा व दाव्यांचा विचार केला जाणार नाही आणि तसा कोणताही दावा माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक
एम. जयस्वाल वकील
ठिकाणः

सही
अमोलकुमार

---

### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्रमांक :- १९११/२०२६** **पुढील तारीखः २७.१०.२०२६**

Sunita Vinod Ratod + 2 Versus NIL

जाहिरनामा / सायटेशन

Applicants-1) Sunita Vinod Rathod, **Aged 49 rrs. Occ Household**
2) Yash Vinod Rathod**, Aged 25 yrs Oce Education**
3) Manthan Vinod Rathod, **Aged 22 Yrs, Occ Education, All R/o Near Hardik Colony, 6A, Gurudev Nagar, VMV Tq & Dist. Amravati**

==Versus== Non- Applicant NIL

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की** मयत deceased Vinod Pandit Rathod **हे** दि. ०२. ०८.२०२६ रोजी **अमरावती येथे मयत झाले.** Sunita Vinod Ratod + 2 Versus NIL **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सबहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा** Sunita Vinod Ratod + 2 Versus NIL **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि. १५.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले**

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय
वरीष्ठ स्तर अमरावती

---

### सायटेशन/जाहिरनामा
### विद्यमान व्यवहार न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी. यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क. /२०२६** **ने.ता. / /२०२६**

अर्जदार -१) श्रीमती सरीता हिम्मत परतेती, **वय ४९ वर्ष, धंदा-घरकाम**
२) सोनल विष्णु विधाते, **वय ३१ वर्ष, धंदा-घरकाम**
३) ममता अनिलराव नागदीवे, **वय-२९ वर्ष, धंदा-घरकाम**
४) कु. पार्वती हिम्मत परतेती, **वय-२२ वर्ष, धंदा-घरकाम अर्जदार क.१ व ४ रा. खोपडा बोडणा, ता. मोर्शी, जि. अमरावती. अर्जदार क.२ रा. नंदनवन पूणे, ता.जि.पूणे. अर्जदार क.३ रा. दर्यापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती.**

//विरूध्द // कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयांत वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ४ चे वडील नामे** हिम्मत दुबे परतेती **हे दिनांक** २२/०२/२०१७ **रोजी** Bodana, Tq. Morshi, Dist-Amravati **येथे मय्यत झालेले आहे. त्यांचे मृत्युनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहे तसेच मयताचे नांवे असलेल्या शासकिय व निमशासकिय अभिलेखांत नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलले आहे. मयताला वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाही तेव्हा या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणांवर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिण्याचे आंत विद्यमान न्यायालयांत आपला लेखी आक्षेप सादर करावा अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल.**

**दिनांक :-/ /२०२६**

शिक्का

आदेशान्वये
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, मोर्शी.

---

### मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र. : २६३/२०२६ नेमलेली तारीख : २२-१०-२०२६**

१. मालती मधुकर जाधव **रा. जय माता दी सभागृह, साई नगर, अमरावती जि. अमरावती**
२. पारुल हेमंत चौधरी **रा. वार्ड नं. ४, साहुर, वर्धा जि. वर्धा**
३. प्रत्यंच्या पराग जाधव **रा. जय माता दी सभागृह, विजय नगर, नवी वस्ती बडनेरा, अमदापूर, अमरावती जि. अमरावती**

//वि// निरंक

**ज्याअर्थी,** मयत पराग मधुकर जाधव **यांचा** मृत्यु दि. २५.०५.२०२० मध्ये छिंदवाडा, मध्यप्रदेश **येथे झाला. मयताचे पत्नी नामे प्राची पराग जाधव यांचा मृत्यु दि. २८.०९.२०२५ मध्ये** विनोबा भावे हॉस्पीटल, सावंगी मेघे, जि. वर्धा **येथे झाला. मयताचे** अर्जदार क्र. १ ही आई असून अर्जदार क्र. २ व ३ ह्या मुली **आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.**

आज दिनांक : १९ सप्टेंबर २०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालयनादगांव खंडेश्वर**

शिक्का

---

### जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती /कु.शेख अलीम शेख कलीम पत्ता-हिरपुरा अचलपूर यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र ACH A00032362 जुना मालमत्ता --- नझुल शीट नं. २६ प्लॉट नं. ०३२ ही कर आकारणी नोंदवहीनुसार श्री /श्रीमती /कु.सुनीता नरेंद्र फिसके या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु.शेख अलीम शेख कलीम या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक २८/९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

टीप / लक्षवेध :-
उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-
पूर्व- तुकडा नंबर ९२
पश्चिम :-तुकडा नंबर ९४
उत्तर -लेआउट मधील ६ मीटरचा रोड
दक्षिण :खुली जागा

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

---

### जाहीरनामा

**या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती /कु.**जमील अहमद अ. हमीद **पत्ता-**अब्बासपुरा अचलपूर **यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२७ **संगणक मालमत्ता क्र** ACH A00010042 **जुना मालमत्ता** 27000238 **नझुल शीट नं.** ६ सी **प्लॉट नं.** ९८/२ **ही कर आकारणी नोंदवहीनुसार श्री / श्रीमती /कु.** शे जामाल फखीर अहमद **या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु.**जमील अहदम अ अहमद **या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक २८/९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

टीप / लक्षवेध :-
उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-
पूर्व- **सरकारी रस्ता**
पश्चिम :-**सरकारी रस्ता**
उत्तर -**सुभान शाह यांचे घर**
दक्षिण :**अब्दुल गफुर अ रज्जाक यांचे घर**

मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर

---

### जाहीरनामा

श्रीमती रेखा या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती दिलीपराव अंबाडकर पत्ता-माळीपुरा (मोबीनपुरा) यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.१६ संगणक मालमत्ता क्र ए 60002349 जुना मालमत्ता ACH A000022981 नझुल शीट नं. २२ (A) प्लॉट नं. ८३/२ ही कर आकारणी नोंदवहीनुसार श्री /श्रीमती /कु. श्री.दिलीप विठ्ठलराव अंबाडकर अशोकराव वि अंबाडकर या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. रेखा दिलीपराव २) सुनीता अशोकराव अंबाडकर या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक २८/९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

टीप / लक्षवेध :-
उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-
पूर्व- रस्ता
पश्चिम :-सचिन अंबाडकर यांचे घर
उत्तर -आशा आंडे व दामोदर मेहरे यांचा प्लॉट
दक्षिण :रस्ता

मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर

---

### जाहीरनामा

**या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती** शेख अलीम शे कलीम **पत्ता-** हिरपुरा अचलपूर **यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२४ **संगणक मालमत्ता क्र** ACH A000323538 **जुना मालमत्ताक्र. -- नझुल शीट नं.** २६ **प्लॉट नं.** ०३ **ही कर आकारणी नोंदवहीनुसार श्री /श्रीमती /कु.** श्री. **सुनीता नरेंद्र फिसके या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु.** शेख अलीम शे कलीम **या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक २८/९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

टीप / लक्षवेध :-
उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-
पूर्व- **तुकडा नंबर ९३**
पश्चिम :- **बाळी**
उत्तर -**लेआउट मधील ६ मीटरचा रोड**
दक्षिण :**खुली जागा**

मुख्याधिकारी
नगर परिषद, अचलपूर

---

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २४**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक :- १८७६/२०२६ पुढील तारीख ०८.१०.२०२६
सुमन + १ वि निरंक
जाहिरनामा / सायटेशन

अर्जदार-1-Smt. Suman Ballabhadas Gahalot Age-Yrs, Occu: Household
R/o Ranthmabor Residency Flat no. 201, Chandrawati Nagar, Sai Nagar, Amravati
2-Dr. Neha Nikunj Vaidhya Age-41 Yrs, Occu: OBSTETREICIAN & GYNAECOLOGIST R/o 58 Hariom Nagar Part-1, D-cabin, Post Office, Sabarmati, Ahemdabad City Ahmedabad, Railway Colony, Gujarat 380019

गैरअर्जदार-NIL- विरुध्द

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत Ballabhdas Kesrimalji Gahalot हे दि. ०७.०७.२०२६ अमरावती येथे मयत झाले. अर्जदार Smt. Suman Ballabhadas Gahalot + 1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.
त्यापेक्षा Smt. Suman Ballabhadas Gahalot + 1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती

---

### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज कमांकः १९१३/२०२६** **पुढील तारीख : २१.१०.२०२६**

Vishal Ashokrao Patil + 5 Versus NIL

जाहिरनामा / सायटेशन

Applicants 1) Vishal Ashokrao Patil **Age 48 yrs, Occ- Business R/o Laxmi Vihar, Near Hanuman Temple Amravati**
2) Aparna Prakash Ijankar **Age-50 Yrs, Occ-Household R/o Adiwasi Sos, Shastri Layout, Khamla, Nagpur (MH)**
3) Archana Mukunda Morkhade, **Age-53 Yrs. Occ-Household R/o Saraswati Vihar, Tirupati Nagar, Nagpur**
4) Shubhangi Manish Patil**, Age-51 Yrs. Occ-Household**
5) Disha Manish Patil, A**ge-27 Yrs. Occu-Household**
6) Krushna Manish Patil, **Age-24 yrs, Occ- Education Applicant no.4 to 6 are R/o Ganesh Colony, Laxmi Vihar, Dasara Maidan Road, Amravati.**

==Versus== Non- Applicant NIL

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत** Ashokrao Bhagwantrao Patil **हे दि. २८.०२. २०१९ रोजी** Vandana Ashokrao Patil **हया दि. २८.०२.१९८५ रोजी दोघेही अमरावती येथेग्मयत झाले.** Vishal Ashokrao Patil + 5 Versus NIL **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा** Vishal Ashokrao Patil + 5 Versus NIL **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि. १५ १९-२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.

---

### दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. आर. आर. खामतकर, ३ रे सह
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज : १९१४/२०२६** शुभांगी +२ वि निरंक **पुढील तारीख १३.१०.२०२६**

जाहिरनामा / सायटेशन

अर्जदार 1- Smt. Shubhangi Manish Patil **Age 51 Years, Occu: Household**
2- Disha Manish Patil Age **27 Years, Occu: Education**
3- Krushna Manish Patil **Age 24 Years, Occu: Education All R/o Ganesh Colony, Laxmi Vihar Dasara Maidan Road Amravati**

विरुध्द- गैरअर्जदार- NIL

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत** Manish Ashokrao Patil **हे दि. ०३.०४.२०२० रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार** Smt. Shubhangi Manish Patil + 2 **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** Smt. Shubhangi Manish Patil + 2 **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि. २३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती

## निविदा सुचना क्र. ०१/०२०२६-२७

**विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती हे खालील बसस्थानकावरील रिक्त वाणिज्य आस्थापना मासिक परवाना शुल्कावर (फीवर) लिव्ह अ‍ॅण्ड लायरोन्स पध्दतीने चालविण्यास देणेसाठी निविदा मागवत आहेत. कोरे छापिल निविदा फॉर्म जामीनदार संमपीपत्र, अटी व शर्ती फॉर्म तसेच विक्री करावयाच्या पदार्थाची यादी, इ. तपशील विभाग नियंत्रक यांचे कार्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे उपलब्ध होतील. निविदा स्विकारण्याची शेवटची तारिख दि. ०८/१०/२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत**

| अ. क्र. | बसस्थानक | आस्थापना प्रकार | बांधीव / मोकळी | जागेचे क्षेत्रफळ (चौ.फुट) | जागा वापरणावळ रक्कम व अपेक्षित भाडे रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २ | मोझरी (तळमजला) | शेतकी भंडार | बांधीव | २६८.३ | १९३७ | २३२४४ |
| ३ | मोझरी (तळमजला) | दुरध्वनीकक्ष (मोबाईलशॉपी) | बांधीव | १९७.१ | १४२३ | १७०७६ |
| ४ | मोझरी (पहीलामजला) | जनरल प्रोव्हीजन्स स्टॉल | बांधीव | १९७.१ | १४२३ | १७०७६ |
| ५ | मोझरी (पहीलामजला) | बचत गट (उत्पादित माल विक्रीबाबत) | बांधीव | १६३.९ | १८८४ | २२६०८ |
| ६ | मोझरी (पहीलामजला) | फ्रूट ज्युस स्टॉल | बांधीव | १५६.२ | ११२८ | १३५३६ |
| ७ | मोझरी (पहीलामजला) | होजियरी स्टॉल | बांधीव | ११९.५ | १०४६ | १२५५२ |
| ८ | मोझरी (पहीलामजला) | पत्रकार भवन | बांधीव | १५६.२ | ११२८ | १३५३६ |
| ९ | मोझरी (तळमजला) | पुस्तक दुकान व झेरॉक्स सेंटर | बांधीव | १००,५ | ७१० | ८५२० |
| १० | मोझरी (तळमजला) | फळ दुकान | बांधीव | १०१.१ | ७३० | ८७६० |
| ११ | मोझरी (पहीलामजला) | स्नॅकबार | बांधीव | ११९.५ | ८४३ | १०११६ |
| १२ | धामणगाव रेल्वे | दुध व दुग्धजन्य पदार्थ | मोकळी | १०० | ८१९ | ९८२८ |
| १३ | अंजनगाव सुर्जी | सायबर कॅफे | बांधीव | ४४१.६ | २७९० | ३३४८० |
| १४ | अंजनगाव सुर्जी | पुस्तक दुकान व झेरॉक्स सेंटर | बांधीव | ६२.६२ | ३९५ | ४७४० |
| १५ | अंजनगाव सुर्जी | फळ दुकान | बांधीव | ५५.१४ | ३४९ | ४१८८ |
| १६ | अंजनगाव सुर्जी | स्नॅकबार | बांधीव | ६.७ | ३६६० | ४३९२० |
| १७ | चांदुरबाजार | मोबाईल शॉपी | बांधीव | ३४.९४ | ६४७ | ७७६४ |
| १८ | चांदुरबाजार | पुस्तक दुकान व झेरॉक्स सेंटर | बांधीव | ३४.९४ | ५५० | ६६०० |

**वरील नमुन्यातील निविदा मोहोरबंद लखोटयावर ---- येथील ---- साठी निविदा असे स्पष्ट लिहून तो लखोटा रजिस्टर्ड पोस्टाने/विभागीय कार्यालयात निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत विहीत वेळेत पोहोचेल अशारितीने पाठवावा किंवा कार्यालयात स्वतः सादर करावा.**

**४. कोणतीही निविदा/अर्ज कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार रा.प. महामंडळ राखून ठेवत आहे. रा.प. महामंडळाचे नियम/अटी यामध्ये वेळोवेळी होणारे बदल परवानाधारकावर बंधनकारक राहतील. निविदा रद्द करण्याचे किंवा त्यामध्ये दुरुस्त करण्याचे अधिकार रा.प. महामंडळ राखून ठेवीत आहे.**

**५. निविदा अर्जावर निविदाकाराचा फोटो लावणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे निविदा अर्जाची किंमत अदा केल्याशिवाय निविदा फॉर्म ग्राहय धरणार नाही.** उपहारगृह व स्नॅकबारकरीता करिता रु.११८०/- (जि.एस.टी.१८ टक्के करासह) व इतर वाणिज्य आस्थापने करिता रु.५१०/-(जि.एस.टी.१८ टक्के करासह) फॉर्म फी **भरणे आवश्यक आहे. अथवा शासनाच्या बदलणा-या नियमाच्या कर धोरणास अधिन राहून निविदा फॉर्म भरावा लागेल.**

**६. पुढील शुध्दीपत्रक ऑनलाईन प्रकाशित करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.** निविदा सादर करण्यासाठी काही प्रश्न उपस्थित झाल्यास विभागीय कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक ०७२१-२६६०३०० संपर्क साधावा.

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन अमरावता

एस टी चा प्रवास राज्याचा विकास

---

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती

## स्वारस्य अभिव्यक्ती सुचना क्र. ०१/२०२६-२७

**विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती हे (अकोला नागपूर) राष्ट्रीय महामार्ग -५३ वर येत असून नागपूर, अकोला, अकोट, वर्धा, यवतमाळ करीता साधी/निमआराम/वातानुकूलित व इतर सर्व प्रकारच्या बसकरीता वाहतूक करण्यात येणार आहे. तसेच प्रवाश्यांच्या सोईसाठी हॉटेल-मोटेल थांब्या करीता दि. २९/०९/२०२६ ते दि. ०८/१०/२०२६ या कालावधीत खाजगी हॉटेल थांबा देण्याकरीता स्वारस्य अभिव्यक्ती योजना राबविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | खाजगी हॉटेलवर थांबा दयावयाच्या मार्गाचे नावे |
|---|---|
| ०१ | अमरावती- नागपूर |
| ०२ | अमरावती - अकोला |
| ०३ | अमरावती - अकोट |
| ०४ | अमरावती - वर्धा |
| ०५ | अमरावती - यवतमाळ |

**हॉटेल थांब्यासाठी साधी बससाठी प्रतिदिन प्रति फेरी रूपये १२५/- व जी.एस.टी. १८%निमआराम बससाठी प्रतिदिन प्रति फेरी रूपये १५०/- व जी.एस.टी. १८% वातानुकूलित व इतर सर्व प्रकारच्या बससाठी प्रतिदिन प्रति फेरी रूपये १७५/- व जी.एस.टी. १८%ही अपेक्षित थांबा रक्कम ठरविण्यात आलेली आहे.**

**अधिकृत हॉटेल थांब्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रतिदिन प्रतिबस/प्रतिफेरी किमी अपेक्षित देकार रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अपेक्षित किंवा त्यापेक्षा थांबा देकार रक्कम देऊ करणा-या हॉटेल चालक-मालक यांनी सदरची रक्कम स्वारस्य अभिव्यक्ती सुचना निविदा प्रपत्रात नमुद करून सदरचे निविदा प्रपत्र हॉटेल प्रस्तावासोबत सादर करण्यात यावेत.निविदा प्र पत्राचे फार्म, अटी व शर्ती फॉर्म तसेच प्रस्तावाच्या सोबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी इत्यादी तपशिल विभाग नियंत्रक यांची कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अमरावती येथे दि. २९/०९/२०२६ ते दि. ०८/१०/२०२६ या कालावधीत दररोज रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस सोडून इतर दिवशी १०.३० ते १५.०० या वेळेत हॉटेल थांबा प्रस्ताव सादर करणेकरीता रू. २०००/- +१८% वस्तु व सेवाकर रु.३६०/- असे एकूण रू. २३६०/- व बयाणा रक्कम रू. १,००,०००/- या कार्यालयाकडे भरणा केले नंतर आपणांस निविदा प्र पत्र फॉर्म मिळतील. दि. २८/०९/२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत निविदा प्र पत्र फॉर्म व बयाणा रक्कम स्विकारणेत येईल.**

विभाग नियंत्रक
राज्य परिवहन अमरावती

एस टी चा प्रवास राज्याचा विकास

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात रक्तदान शिबीर

**अमरावती-**स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या रक्तदान शिबिराचे आयोजन जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती यांच्या सौजन्याने केलेले असून महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय पार्वती नगर, अमरावती येथे २९ सप्टेंबर रोजी सकाळी ठीक अकरा वाजता सुरू होईल.रक्तदान हे श्रेष्ठ दान असून मानवी आरोग्याच्या दृष्टीने रक्त अतिशय महत्त्वाचे आहे.आपले रक्तदान एखाद्या रुग्णाचे प्राण वाचविण्यास मदत करू शकतात. म्हणून या शिबिरात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होऊन सहकार्य करावे असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. गजानन काळे व प्रा. डॉ. बबीता येवले यांनी केलेले आहे.



### ग्रामपंचायत कार्यालयात बांधकामाच्या दर्जावर प्रश्न चिन्ह?

**अमरावती-**तालुक्यातील ब्राम्हणवाडा गोविंदपुर येथे अर्थसंकल्पीय निधीतून सुरू असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या बांधकाम कामाच्या दर्जाबाबत गंभीर आक्षेप नोंदविण्यात आला आहे.बांधकामात अंदाजपत्रकातील निकष व तांत्रिक मार्ग दर्शक सूचनांचे पालन न करता मोठ्या प्रमाणात डस्ट चा वापर करून निकृष्ट दर्जाचे काम सुरू असल्याचा आरोप मनिष धुर्वे, जिल्हा उपाध्यक्ष (बिरसा ब्रिगेड) अमरावती यांनी केला आहे.याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून बांधकामाची तातडीने पाहणी व चौकशी करण्याची मागणी केली आहे.शासकीय निधीतून उभारण्यात येणाऱ्या ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत दर्जेदार व टिकाऊ असणे आवश्यक आहे.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी बांधकाम स्थळी प्रत्यक्ष भेट देऊन वापरण्यात येणाऱ्या कॉंक्रेट डस्ट व स्टील इतर साहित्याची अधिकृत प्रयोगशाळेत गुणवत्ता परीक्षण करण्यात यावे व बांधकामाची तांत्रिक गुणवत्ता तपासावी आणि मंजूर अंदाजपत्रका नुसार काम सुरू आहे किंवा नाही याची पडताळणी करावी अशी मागणी निवेदनातून मनिष धुर्वे जिल्हा उपाध्यक्ष (बिरसा ब्रिगेड) यांनी केली आहेत.





### कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे 'गीता पठण'स्पर्धेतील यश

**अमरावती-**स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूलमधील इयत्ता ६ वी ची विद्यार्थिनी जीविका प्रमोद दांडगे हिने गीता पठण स्पर्धेत गटातून द्वितीय क्रमांक पटकाविला.चिन्मय मिशन द्वारा आयोजित ही भगवद्गीता पठण स्पर्धा दरवर्षी घेण्यात येते. चिन्मय मिशन या संस्थेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबाबत अमृत महोत्सव वर्ष साजरा करण्याकरिता ही 'भगवद्गीता पठण' स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेला उपस्थित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य भांबूरकर तसेच श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका इंगोले व कस्तुरबा इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल प्रामुख्याने उपस्थित होत्या.यामध्ये वयोगटानुसार गट विभागणी करून गीतेतील बारावा अध्याय - भक्ती योग यातील श्लोक पठणासाठी देण्यात आले होते. यंदा एकूण ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला होता. त्यातून जीविका दांडगे हिने श्लोकांची अचूक मांडणी, स्पष्ट उच्चार आणि प्रभावी सादरीकरण करून 'ड' गटातून द्वितीय क्रमांक पटकाविला. सर्वाधिक विद्यार्थी सहभागी करून घेतल्याबद्दल कस्तुरबा इंग्लिश स्कूलला प्रथम क्रमांकाचा सन्मान देण्यात आला. हा पुरस्कार शाळेच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल यांना प्रदान करण्यात आला. दरवर्षी अशा स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक करणाऱ्या चिन्मय मिशनचे आभार व्यक्त केले.

### मुख्याध्यापक संघाची कार्यकारिणी

**लेहेगाव-**विदर्भ फेडरेशन ऑफ हेडमास्टर असोसिएशन सलग्नित माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या मोर्शी तालुका पदाधिकाऱ्यांची निवडणूक विवेकानंद विद्यामंदिर शिरखेड येथे आयोजित सभेमध्ये घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी तालुका मुख्याध्यापक संघाचे मार्गदर्शक सुधाकर धोटे हे होते, प्रमुख अतिथी प्रशांत आजनकर राजेंद्र हिरडे, सुदर्शन देशमुख,दिनेश घोंगडे हे माजी पदाधिकारी उपस्थित होते. तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यामुळे नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली.यावेळी सर्वानुमते निवडणूक प्रक्रियेमध्ये अध्यक्षपदी प्रवीण लांडे सचिवपदी अमोल तट्टे,कार्याध्यक्षपदी अजय धोटे यांची निवड करण्यात आली. तीन उपाध्यक्ष पदाकरीता संदीप अढाऊ, श्रीकांत विघे, मंजुषा देशमुख,कोषाध्यक्ष म्हणून धीरज वाईन्देशकर, तज्ञ मार्गदर्शक सुधाकरराव धोटे, प्रशांत आजनकर सहसचिव भागवत चव्हाण, अर्चना खंडारे, संघटन सचिव अविनाश साळकर, सुधीर सवाई,संघटक नरेंद्र रावळे,नरेंद्र सुळे प्रसिद्धी प्रमुख नेताजी पाटील,गणेश लाडवीकर, महिला प्रतिनिधी सिमा गांधी तर कार्यकारिणी सदस्य म्हणून सुरेश राऊत, जय तट्टे, चंदु दुगाने,मनिष देशमुख या सर्व मुख्याध्यापकांची कार्यकारणीमध्ये निवड करण्यात आली.





# मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात काँग्रेसचे तीव्र आंदोलन

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसर घोषणांनी दणाणला; पदावरून हटवून चौकशीची काँग्रेसची मागणी

**अमरावती/का.प्र.**

निवडणूक आयोगाच्या कारभारासह मतदार यादीच्या पुनरिक्षण प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी (दि. २८) जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले.शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.





मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून तात्काळ दूर करावे, त्यांच्या कार्यकाळातील मतदार याद्यांमधील फेरबदलाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी,तसेच काँग्रेसने उपस्थित केलेल्या आरोपांची सखोल चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण (SIR) तसेच मतदार याद्यांमधील बदलांमुळे पात्र मतदारांच्या नावांबाबत प्रश्न निर्माण झाल्याचा दावा काँग्रेसकडून करण्यात आला. पात्र नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली जाणे किंवा त्यांच्या नोंदणी प्रक्रियेत अडथळे निर्माण होणे ही लोकशाहीच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले.

दरम्यान, अलीकडील वृत्तांचा हवाला देत काँग्रेसने निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित केले. निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंह संधू आणि डॉ. विवेक जोशी यांनी गेल्या दहा महिन्यांत आयोगाच्या काही निर्णयांवर किमान १४ वेळा लेखी आक्षेप नोंदविल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्याचे काँग्रेसने सांगितले. या आक्षेपांमध्ये इदेस-६ मधील बदल, मतदार डेटाबेसवरील नियंत्रण, मतदार यादीतील नावे वगळण्याची प्रक्रिया आणि निवडणूक तंत्रज्ञानाशी संबंधित बाबींचा समावेश असल्याचे सांगण्यात आले.या वृत्तांवर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण देताना एंईसह आयोगाचे निर्णय तिन्ही आयुक्तांच्या संमतीनेच झाल्याचे म्हटल्याचे काँग्रेसने नमूद केले. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणातील वस्तुस्थिती जनतेसमोर स्पष्ट करण्यासाठी स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक समीक्षा होणे आवश्यक असल्याची भूमिका काँग्रेसने मांडली.

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील कथित अनियमितता आणि 'वोट चोरी'च्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मतदार याद्यांबाबत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक तक्रारीची पारदर्शकपणे पडताळणी करून निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनादरम्यान काँग्रेस कार्यकर्त्यांनी 'वोट चोरी त्वरित थांबवा', 'ज्ञानेश कुमार राजीनामा द्या', 'ज्ञानेश कुमार यांच्यावर कारवाई करा', 'वोट चोर गद्दी छोड' अशा घोषणा दिल्या. यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर घोषणांनी दणाणून गेला.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून तात्काळ दूर करावे.त्यांच्या कार्यकाळातील मतदार याद्यांमधील फेरबदलाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी.पात्र मतदारांची नावे वगळली गेल्याच्या तक्रारींची विशेष तपासणी करावी.प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत सुरक्षित राहण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करावी.निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची सार्वजनिकरीत्या स्पष्टता द्यावी.निवडणूक प्रक्रियेबाबत तक्रारी असलेल्या प्रकरणांची स्वतंत्र चौकशी करून दोष आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी.

लोकशाही व्यवस्थेत मतदार हा केंद्रबिंदू असून त्याच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करणे ही निवडणूक व्यवस्थेची मूलभूत जबाबदारी आहे. मतदार यादीतील त्रुटी किंवा अनियमिततेबाबत पारदर्शक चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी काँग्रेसची भूमिका असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या आंदोलनाला जिल्ह्याचे खा.बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत, मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश सचिव नजीर खान बी.के., महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष निलेश गुहे, युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, अल्पसंख्याक विभाग अध्यक्ष अब्दुल रफीक पत्रकार, ऱ्एळध शहराध्यक्ष स्वराज पोटे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याशिवाय अशोक डोंगरे, विनोद मोदी, राजेंद्र वर्मा, विजय वानखडे, अभिनंदन पेंढारी, अरुण रामेकर, डॉ. सुजाता झाडे, डॉ. अर्चना आत्राम, राजेश्री जढाळे, वंदना थोरात, अनिला काझी, वंदना निरगुडे, शिरीन खान, रंजना कोकाटे, जयश्री मरापे, शिल्पा राऊत, अश्विनी बोंडे, वृषाली मानकर, राजू मसराम, सूर्यकांत भलावी, विजय देशमुख, अविनाश पांडे, नितीन काळे, विक्की उर्फ विशाल वानखडे, सोमेश्वर चोखट, मोहम्मद निजाम, सुनील साधनकर, भालचंद्र घोंगडे, गजानन रडके, नेमराज देशमुख, अजीम ठेकेदार, प्रशांत महल्ले, प्रदीप अरबट, दिनेश मेश्राम, दिनेश जाबुळकर, एजाज कुरेशी, संजय गायकवाड, मंगेश ठाकरे, प्रवीण नवरंगे, राकेश बंड, प्रभाकर वळसे, विठ्ठल राव मरापे, सुनील कांडलकर, प्रकाश पहुरकर, नरेंद्र तायडे, प्रा. अनिल देशमुख, अर्जुन इंगोले, किशोर पाटील बोरकर, विनोद चौधरी, सुरज खैरे, प्रथमेश गावंडे, अनिकेत क्षिरसागर, तुषार जवंजाळ, स्वराज पोटे, अजिंक्य धवने, मयुर कांडलकर, सुरज ढोके, आर्यन महाजन, साहिल पीलावन, ओम उंबरकर, सुरज चव्हाण, मयुर तायडे, राहुल चव्हाण, बबन चव्हाण, अरुण बनारसे, विजय बर्वे, अशोक राऊत, गुलाबराव मडावी, हिरामनजी गावंडे, गजानन भाऊ, अ. रफीक रफ्फु, रवि भाऊ ढोणे यांच्यासह अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, माजी व विद्यमान लोकप्रतिनिधी, युवक काँग्रेस, NSUI, महिला काँग्रेस, सेवादल तसेच विविध सेल व विभागांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## ओट्यावर इंग्रजी दारूच्या बाटल्या; अवैध दारूविक्रीची चर्चा!

**अंजनगाव बारी-**येथील आठवडी बाजार परिसरातील सार्वजनिक ओट्यावर इंग्रजी दारूच्या अनेक रिकाम्या बाटल्या आढळून आल्याने अवैध दारूविक्रीबाबत नागरिकांमध्ये चर्चा रंगली आहे. गावात अधिकृत बार असतानाही सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे दारूच्या बाटल्या आढळून आल्याने संबंधित यंत्रणेच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी उत्पादन



शुल्क विभागाने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी आणि अवैध विक्री आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँकेच्या शाखेने गाठला व्यवसायाचा उच्चांक

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी शहरात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँकेच्या अंजनगाव सुर्जी शाखेने गेल्या तीन वर्षांत उल्लेखनीय प्रगती साधली आहे. काही वर्षांपासून डबघाईस आलेल्या या शाखेने व्यवसायात उच्चांक प्रस्थापित केल्याबद्दल शाखा व्यवस्थापक राहुल वानखडे यांचा बँकेचे अध्यक्ष नरेश चंद्र मधुकरराव पाटील उपाध्यक्ष प्रशांत डवरे तसेच बँकेच्या संचालक मंडळाने मानचिन्ह देऊन गौरव केला.

डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँकेच्या एकूण २२ शाखा असून, अंजनगाव सुर्जी येथील शाखा दीर्घकाळापासून कार्यरत



आहे. मात्र मागील काही वर्षांत काही कारणांमुळे शाखेची आवक-जावक कमी प्रमाणात होत होती.तीन वर्षांपूर्वी राहुल वानखडे यांनी शाखा व्यवस्थापक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर शाखेच्या कार्यपद्धतीत अनेक सकारात्मक बदल करण्यात आले. ग्राहकांशी सन्मानपूर्वक वागणूक, बँकेच्या कर्ज वाटप योजना, डिपॉझिटवरील व्याजदर, होम लोन यासह बँकेच्या विविध उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आली.

ग्राहकाभिमुख सेवा आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अवघ्या तीन वर्षांत अंजनगाव सुर्जी शाखेने व्यवसायात उच्चांक प्रस्थापित केला. या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन बँकेच्या संचालक मंडळाने व्यवस्थापकांचा मानचिन्ह देऊन सत्कार केला.या गौरवामुळे शाखेतील कर्मचारी व ग्राहकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, भविष्यात शाखेची प्रगती अशीच सुरू राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. बँक व्यवस्थापक राहुल हरिश्चंद्र वानखडे यांचे निलेश मोरे, निलेश देशमुख, अभिजित भावे, सचिन अब्रुक यांनी अभिनंदन केले.

## एड्युस्किल्स अंतर्गत पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयाला १३ पुरस्कार

### 'वर्षातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी संस्था' पुरस्काराने गौरव

**अमरावती/का.प्र.**

जयपूर, राजस्थान येथे आयोजित करण्यात आलेल्या 'एड्युस्किल्स कनेक्ट' या भव्य सोहळ्यात पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती ने उल्लेखनीय कामगिरी करत एड्युस्किल्स अंतर्गत विविध श्रेणींमध्ये तब्बल १३ पुरस्कार प्राप्त केले.



महाविद्यालयाला कोहोर्ट १४, कोहोर्ट १५, कोहोर्ट १६ आणि कोहोर्ट १७ अंतर्गत इंटर्नशिप व कौशल्य विकास क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीसाठी हे पुरस्कार मिळाले. यामध्ये 'वर्षातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी संस्था' हा मानाचा पुरस्कार महाविद्यालयाला केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. इतर पुरस्कारही उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या पुरस्कारांमध्ये एड्युस्किल्स अकॅडमी सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी संस्था पुरस्कार, एआय स्किलिंग एक्सलन्स पुरस्कार, सेलोनिस इंटर्नशिप पुरस्कार, सिमेन्स इंटर्नशिप संस्था पुरस्कार, मायक्रोचिप इंटर्नशिप पुरस्कार, झेडस्केलर इंटर्नशिप सर्वोत्कृष्ट कामगिरी संस्था पुरस्कार, जुनिपर इंटर्नशिप संस्था पुरस्कार, वाधवानी इंटर्नशिप संस्था पुरस्कार, प्रादेशिक भाषा उत्कृष्टता पुरस्कार, मेकॅनिकल इंजिनिअरिंग उत्कृष्टता इंटर्नशिप पुरस्कार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग उत्कृष्टता इंटर्नशिप पुरस्कार आणि सिव्हिल इंजिनिअरिंग उत्कृष्टता इंटर्नशिप पुरस्कार यांचा समावेश आहे.

यासोबतच उद्योग–शैक्षणिक संस्था सहकार्यासाठी प्रभावी समन्वय साधल्याबद्दल प्रा. एस. व्ही. मिश्रा यांना 'सर्वोत्कृष्ट समन्वयक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.एड्युस्किल्स अंतर्गत विविध श्रेणींमध्ये एकूण १३ पुरस्कार मिळविणारे अमरावती जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय म्हणून पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या सोहळ्याला महाविद्यालयातून प्रा.एस.व्हि. मिश्रा, प्रा.एम. के.निचत, प्रा.एस.एस. खत्री, प्रा.एस.डी. गार्ले उपस्थित होते. अभियांत्रिकीमधील सर्व विभागातील इंटर्नशिप को ऑर्डिनेटर यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे महाविद्यालयाला विविध श्रेणीत १३ पुरस्कार मिळाले आहे असे प्रतिपादन संस्थेच्या वतीने करण्यात आले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, समन्वयक यांनी अभिनंदन केले.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन

**अमरावती-**स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाच्या वतीने नुकताच राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवास झाला. याप्रसंगी विविध उपक्रम घेऊन स्वयंसेवकांनी हा दिवस साजरा केला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे या उपस्थित होत्या. सर्व सामान्यांना रासेयोचे महत्व पटवून देण्यासाठी महाविद्यालय परिसरातून जनजागृती रॅली काढली.

याप्रसंगी प्राचार्यांच्या उपस्थितीत सेवा योजनेची प्रतिज्ञा घेतली. नंदिनी रावळे हिने उपस्थित स्वयंसेवक आणि शिक्षकांना शपथ दिली. प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांनी आपली ऊर्जा सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्यासाठी वापरावी असा संदेश दिला.कोणत्याही राष्ट्राच्या जडण-घडणीत उत्तम, चरित्र संपन्न व जबाबदार नागरिक महत्त्वाची भूमिका पार पाडीत असतात. असे नागरिक निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य महाविद्यालयीन स्तरावरूनच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होत असते. म्हणून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी होऊन राष्ट्र उभारणीत महत्त्वाची भूमिका पार पाडावी असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाचे आयोजन,संचालन प्रा. डॉ.गजानन काळे रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. बबीता येवले महिला कार्यक्रम अधिकारी यांनी मांडले. या विविध उपक्रमामध्ये महाविद्यालयातील स्वयंसेवक, विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्साहाने भाग घेतला.

## डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये फार्माकोव्हिजितन्स सप्ताहानिमित्त विविध उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, अमरावती येथे विद्यार्थी विकास कक्ष IQAC कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ६ वा राष्ट्रीय फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये औषधांची सुरक्षितता, औषधांचा विवेकी वापर, औषधांचे साईड इफेक्ट्स व त्यांचे अहवाल याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने 'फार्माकोव्हिजिलन्स



अँड ADR रिपोर्टींगः अ स्टेप टुवाईस सेफर हेल्थकेअर' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. संजियो बोराडे, प्राध्यापक व विभागप्रमुख, फार्माकोलॉजी विभाग तसेच डॉ. प्रविणकुमार, सहयोगी प्राध्यापक, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज, अमरावती हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

या स्पर्धेचा विषय 'सुरक्षित औषधांसाठी औषधशास्त्रीय संशोधनः औषध शोध, औषधसुरक्षा आणि फार्माकोव्हिजिलन्स यांच्यातील दुवा' असा होता. या स्पर्धेत देशभरातील बी.फार्म,एम.फार्म, फाम.'डी. विद्यार्थी तसेच संशोधन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.या स्पर्धेच्या निकालामध्ये दादासाहेब बालपांडे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, नागपूर येथील सिमरन चव्हाण व सृष्टी धरणेधर यांनी विजेतेपद मिळविले. शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती येथील श्रेया भैसारे यांनी प्रथम उपविजेतेपद, तर डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, अमरावती येथील मानसी मेहरे यांनी द्वितीय उपविजेतेपद प्राप्त केले.

तसेच कर्मयोगी तात्यासाहेब बोंद्रे औषधनिर्माणशास्त्र संस्था, चिखली येथील प्रथमेश कुमार इठापे आणि श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, छत्रपती संभाजीनगर येथील आर्या कैलास वढे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

हा कार्यक्रम इंदिरा बहुउद्देशीय शिक्षण संस्था चे अध्यक्ष योगेंद्रजी गोडे साहेब व सचिव तन्वी गोडे यांच्या प्रेरणेने तसेच प्राचार्य डॉ.पी.व्ही. बुरकले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी विकास कक्ष, IQAC कक्ष तसेच सर्व संबंधित प्राध्यापक व सदस्यांनी सहकार्य केले. या उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये दुष्काळी 'ट्रिगर-१' लागू



## जिल्हाधिकाऱ्यांकडून कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** खरीप हंगाम २०२६ मध्ये जून महिन्यापासून पावसाने दिलेल्या ओढ आणि इतर घटकांमुळे जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्य शासनाच्या २५ सप्टेंबर २०२६ च्या निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांमध्ये दुष्काळाची ट्रिगर-१ लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना तालुक्याचा दुष्काळ कृती आराखडा तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार सर्व संबंधित तालुक्यांमध्ये पिकांच्या नुकसानीचे पंचनामे, छायाचित्रे आणि जीपीएस स्थान निश्चितीसह पीक परिस्थितीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत दि. १ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरावर कृती आराखड्याचा आढावा घेतला जाणार आहे.



जिल्हाधिकाऱ्यांनी विविध १२ मुद्यांवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. यात पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्याची जबाबदारी तालुका कृषी अधिकारी, शेतकरी कर्ज मुक्ती योजना, नवीन ॲग्रीस्टॅक नोंदणी, ई-केवायसी आणि कर्ज वसुलीस स्थगिती, पुनर्गठनाची जबाबदारी सहायक निबंधक, सहकारी संस्था, केबी जीरामजी अंतर्गत जलसंधारणाची कामे गतीने पूर्ण करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी आणि उपअभियंता, जलसंधारण यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

शेतकऱ्यांना दररोज किमान १२ तास वीज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी उपकार्यकारी अभियंता, वीज वितरण कंपनी, डिजीटल क्रॉप, शेतकरी कर्ज वाटप व कर्जमुक्तीच्या लाभार्थ्यांचो नियोजनासाठी तहसीलदार, पिण्याच्या पाण्याचे नियोजन व आवश्यक तेथे टँकर्सचा पुरवठ्यासाठी उपअभियंता, मजिप्रा आणि उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जिप, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजनासाठी उपअभियंता, जलसंधारण, गाळपेर जमिनीवर जनावरांच्या चाऱ्याची लागवडीसाठी उपअभियंता, जलसंपदा व जलसंधारण, चाऱ्यासाठी नवीन जागा उपलब्ध करून देण्यासाठी तालुका पशुसंवर्धन अधिकारी आणि तहसीलदार, मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदण रस्ते व मातोश्री पांदण रस्त्यांची कामे सुरू करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आणि गटविकास अधिकारी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यासाठी सहसंचालक

☞(पान २ वर)

# सहा महिने अन्नधान्याची उचल नसलेल्या शिधापत्रिका निष्क्रिय होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र सरकारच्या लक्ष निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणाली सुधारणा आदेश २०२५ मधील तरतुदींनुसार, स्मार्ट-पीडीएस प्रणाली अंतर्गत 'सायलेंट शिधापत्रिका' आणि 'दुबार लाभार्थी' यांच्यावर विशेष कारवाई करण्यात येणार आहे. यात सहा महिने अन्नधान्याची उचल नसलेल्या शिधापत्रिका निष्क्रिय होणार आहे.



लाभार्थ्यांने सलग सहा महिने शिधापत्रिकांवरून अन्नधान्याची उचल केलेली नाही, त्यांचा दर महिन्याच्या २१ तारखेला आढावा घेतला जाणार आहे. त्यानंतरच्या महिन्याच्या १ तारखेला त्या शिधापत्रिका आपोआप निष्क्रिय करण्यात येतील. बंद करण्यात आलेल्या शिधापत्रिका एनएफएसए प्रणालीवर दिसत असल्या, तरी त्यावर धान्य उचलण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही. संबंधित शिधापत्रिकाधारकांनी तीन महिन्यांच्या आत कुटुंबातील सर्व सदस्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे बंधनकारक आहे. विहित ३ महिन्यांच्या मुदतीत ई-केवायसी झालेली नसल्यास सदर शिधापत्रिका राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतून कायमस्वरूपी वगळण्यात येणार आहे.

दुबार लाभार्थ्यांच्या बाबतीत 'सेंट्रल रिपॉझिटरी'मधील नोंदीनुसार 'आधार-बेस्ड मॅचिंग' करून दुबार लाभार्थी ओळखले जातील व त्यांना डिॲक्टिव्हेट केले जाईल. याबाबत कुटुंबप्रमुखाच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे सूचना दिली जाईल. दुबार लाभार्थ्यांना ई-केवायसी व पडताळणीसाठी तीन महिन्यांचा कालावधी मिळेल. पडताळणीनंतर योग्य शिधापत्रिकेवर नाव कायम ठेवून इतर ठिकाणची दुबार नोंद हटवली जाईल. तीन महिन्यात ई-केवायसी झालेली नसल्यास दुबार नाव कायमस्वरूपी योजनेतून वगळण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांनी कुटुंबातील सर्व सदस्यांचे ई-केवायसी त्वरीत पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी प्रज्वल पाथरे यांनी केले आहे.

# साधूच्या वेशातील भामट्यांने हिऱ्याची अंगठी केली लंपास

## टिळक चौक परिसरातील घटना



**अचलपूर/प्रतिनिधीः-** धार्मिक उत्साहात आणि बंदोबस्तात पोलीस प्रशासन व्यस्त असल्याचा गैरफायदा घेत शहरात भामटेगिरी करणारे भामटे भलतेच सक्रिय झाले आहेत. परतवाडा शहर हे प्रामुख्याने विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी आणि साधूसंतांच्या आगमनासाठी ओळखले जाते; मात्र याच साधूगिरीचा बुरखा पांघरून नागरिकांना लुटणाऱ्या टोळीने शहरात धुमाकूळ घालत एका व्यापाऱ्यांची तीन लक्ष रूपयाची अंगठी व रोकड लंपास केल्याची घटना २८ सप्टेंबर रोजी दिवसा ढवळ्या दुपारी २ वा. घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, परतवाडा शहरातील तिळक चौक येथील रहिवासी आणि व्यावसायिक मंगलेश जयस्वाल यांच्या प्रतिष्ठानामध्ये सोमवारी, २८ सप्टेंबर

☞(पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या बँकेला राजकारणासाठी बदनाम करू नका!

## -पोही सेवा संस्थेतील कर्जप्रकरणाचा नावनिहाय खुलासा

**चांदूर बाजार/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकरी आणि सभासदांची बँक आहे. त्यामुळे कर्जप्रकरणातील तांत्रिक बाबींचा अपुरा संदर्भ घेऊन संपूर्ण बँकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे योग्य नाही. पोही सेवा सहकारी संस्थेतील कर्जवाटपाबाबत बँकेने दिलेला खुलासा आणि संस्थेने सादर केलेली सभासदनिहाय कर्जमंजुरीची यादी या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करणारी आहे,असे सांगण्यात आले.

संस्थेच्या यादीत बबीता वामनराव बदरके, अक्षय वामराव बदरके, बंधू मनाजी बदरके आणि सागर दिलीप अडाऊ यांच्या कर्जमंजुरीच्या तारखा अनुक्रमे २२ सप्टेंबर २०२६ आणि २७ सप्टेंबर २०२६ अशा नमूद आहेत.सिमाताई विजय मते यांच्या प्रकरणात यादीत स्पष्ट कारण देण्यात आले आहे की, सादर केलेल्या सातबाऱ्यावर श्रीराम गणपत मते यांचेकडे बँकेचे थेट कर्जबाकी आहे. ते कर्ज निरंक केल्यानंतर फेरफारानुसार ४५ हजार रुपये अधिक व्याज कर्जवाटप करता येईल, अशी नोंद आहे. याचप्रमाणे आकाश राजकुमार मते यांच्या प्रकरणातही श्रीराम गणपत मते यांच्याकडील बँकेची कर्जबाकी निरंक केल्यानंतर फेरफारानुसार कर्जवाटप करता येईल, असे नमूद आहे.

चैतन वामनराव बदरके यांच्या प्रकरणात तर संस्थेच्या यादीत स्पष्ट शब्दांत 'सी-बिल प्रमाणे इतर बँकेचे केसीसी कर्ज आहे. नो-ड्यूज सादर केल्यास वाटप करता येईल' अशी नोंद आहे. गोदाबाई तेजुजी येवले आणि तेजुजी दगडुजी येवले यांच्या बाबतीत कारणच स्पष्ट आहे-'संस्थेकडून बँकेला कर्जप्रकरण अद्याप अप्राप्त.'



### -कुणाचे कर्ज मंजूर, कुणाला नो-ड्यूजची गरज, तर कुणाचे प्रकरण बँकेकडेच अप्राप्त

**सी-बिलबाबतही गैरसमज नको-** नियमित शेतकरी सभासदांकडून बँक सी-बिल घेत नाही. नवीन सभासदाने इतर बँकेचे कर्ज नसल्याचा दाखला दिल्यास सी-बिल घेतले जात नाही. मात्र असा दाखला सादर केला नसल्यास रिझर्व्ह बँकेच्या सूचनांनुसार सी-बिल मागविण्याची प्रक्रिया करावी लागते.

**उपोषणही आश्वासनानंतर मागे-** संबंधित शेतकऱ्यांनी उपोषणाचा निर्णय घेतला होता. उपनिबंधक, पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासनाने चर्चा करून वस्तुस्थिती समजावून सांगितली. त्यानंतर

☞(पान २ वर)

# विदर्भाच्या राजाची भव्य विसर्जन मिरवणूक गुरुवारी

## -राजकमल चौकात होणार महाआरती



**अमरावती/प्रतिनिधीः-** न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाच्या 'विदर्भाचा राजा'ची भव्य-दिव्य विसर्जन मिरवणूक गुरुवार, १ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी दोन वाजता मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात काढण्यात येणार आहे. अमरावती सह विदर्भातील एकूण १३ नामांकित ढोल-ताशा व वाद्य पथके सहभागी होणार आहेत. मिरवणूक राजकमल चौकात पोहोचताच महाआरती करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दिनेश बुब यांनी दिली आहे.

त्यांनी सांगितले की, १ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता न्यू आझाद गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात श्रींची विधिवत पूजा-अर्चा व आरती पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर 'गणपती बाप्पा मोरया' आणि 'विदर्भाचा राजा मोरया'च्या जयघोषात विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होईल. मिरवणूक शिस्तबद्ध, सुरक्षित आणि भक्तिमय वातावरणात पार पडावी, यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. खापर्डे बगीचा येथून निघणारी मिरवणूक इर्विन चौक, मालवीय चौक, जयस्तंभ चौक, श्याम चौक, राजकमल चौक, होत वसंत चौक, चौधरी चौक होत मोसी कॉल मध्ये विदर्भाच्या राजाचे विसर्जन केले जाणार आहे. मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरणाऱ्या १३ पथकांमध्ये अमरावतीतील रामराज्य, स्वराज्य, श्री शिवसम्राज्य, वाद्य सम्राट, शौर्य रुद्राक्ष, वक्रतुंड, शिवराज्यम आणि रुद्रावतार ढोल-ताशा पथकांचा समावेश आहे. तसेच परतवाडा येथील हिंदवी स्वराज्य, वर्धा येथील दैवत, चिमूर येथील शिव स्पर्श, चंद्रपूर येथील सह्याद्री आणि वाशिम येथील नरसिंह वाद्य पथक सहभागी होणार आहेत. मिरवणुकीदरम्यान राजकमल चौकात भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषद मध्ये मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दिनेश बूब, संपादक अनिल अग्रवाल, संपादक विलास मराठे, बालाजी

☞(पान २ वर)

# पिकांसाठी अप्पर वर्धा धरणातून पाण्याची एक पाळी तातडीने द्या

### आमदार राजेश वानखडे यांचे जलसंपदा विभागाला निर्देश



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील १४ ही तालुक्यात घोषित झालेल्या कोरड्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अप्पर वर्धा धरणातून तिवसा विधानसभा मतदारसंघातील अप्पर वर्धा प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील भागांना सिंचनाची सोय उपलब्ध आहे. अल-नीनो या वातावरणीय बदलामुळे तब्बल ५० दिवसाच्या वरती मोठा खंड पावसात पडलेला असून पाण्याअभावी सोयाबीन पिकाच्या उत्पादनात मोठी घट येणार असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. अशा परिस्थितीत किमान सद्यस्थितीत हाती असलेले तूर व कापूस ही पिके तरी वाचली पाहिजे जेणेकरून शेतकऱ्यांना या पिकांचा तरी थोडासा आधार होईल या अनुषंगाने अप्पर वर्धा सिंचन प्रकल्पातून तिवसा विधानसभा मतदार संघातील लाभक्षेत्रात तातडीने तूर व कपाशीच्या पिकाकरिता पाण्याचे एक पाळी (आवर्तन) तातडीने सोडण्यात यावे असे स्पष्ट निर्देश आमदार राजेश वानखडे यांनी जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता राजभोज यांना दिले. त्या अनुषंगाने तातडीने या आवर्तनाचे नियोजन करून लवकरात लवकर तूर व कापूस या पिकाला पाण्याचे एक आवर्तन देण्याची प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येईल अशी माहिती जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता राजभोज यांनी आमदार राजेश वानखडे यांना दिली.

सद्यास्थितीत अप्पर वर्धा प्रकल्पामध्ये ५८३ जलसाठा उपलब्ध असून जलाशयाच्या मृत साठ्याच्या व्यतिरिक्त संपूर्ण जलसाठा हा वापरण्यायोग्य आहे. अशा परिस्थितीत आरक्षित पिण्याच्या पाण्याचे नियोजन व सिंचनाच्या पाण्याचे नियोजन करणे तसेच उपलब्ध

☞(पान २ वर)

# दै. हिंदुस्थानचे संपादक उल्हास मराठे यांना पत्नीशोक

## ज्योती मराठे यांचे दीर्घ आजाराने निधन



**अमरावती/प्रतिनिधीः-** दै. हिंदुस्थानचे संपादक उल्हास मराठे यांच्या पत्नी ज्योती उल्हास मराठे (वय ७०) यांचे सोमवारी, दि.२८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

ज्योती मराठे या कष्टाळू, जिद्दी, उद्यमशील आणि प्रेमळ स्वभावासाठी परिचित होत्या. साध्या कौटुंबिक वातावरणातून आलेल्या ज्योतीताईंनी विवाहानंतर मराठे परिवाराच्या संघर्षमय वाटचालीत पती उल्हास मराठे यांना खंबीर साथ दिली. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळतानाच त्यांनी विविध व्यवसाय व उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत स्वावलंबनाचा आदर्श निर्माण केला.कुटुंबीयांप्रती असलेली त्यांची आत्मीयता आणि माणसे जोडण्याचा स्वभाव ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची

☞(पान २ वर)

# अमरावती जिल्हा मजूर सहकारी संस्थांच्या संघाची आमसभा उत्साहात





**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मजूर सहकारी संस्थांचा संघ यांची वार्षिक आमसभा संघाचे अध्यक्ष माधव रामचंद्रसा शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडली.यावेळी संघाच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सभासदांच्या अडचणी, मजूर सहकारी संस्थांसमोरील विविध प्रश्न, संस्थांच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना तसेच सभासदांच्या हितासाठी भविष्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.अध्यक्ष माधव रामचंद्रसा शेंडे

☞(पान २ वर)

# अर्चित जाजोदिया यांचा भाजयुमोमध्ये प्रवेश



**अमरावती/प्रतिनिधीः-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त व सार्वजनिक जीवनाला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारतीय जनता युवा मोर्चा, अमरावती शहर-जिल्ह्याच्या वतीने आयोजित 'वडनगर ते वाराणसी' सेवा संकल्प अभियानात प्रसिद्ध समाजसेवक चंद्रकुमार (लप्पीभैया) जाजोदिया यांचे सुपुत्र अर्चित जाजोदिया यांनी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला.

भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या नेतृत्वात हा सोहळा पार पडला. या वेळी भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, गुजरातच्या द्वारकाचे खासदार जितेंद्रभाई खंजरिया, विदर्भ संयोजक प्रा. दिनेश सूर्यवंशी व अमरावती भाजयुमो शहर जिल्हाध्यक्ष विजय (विक्की) शर्मा आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत सफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, लहान मुलांना खेळणी आणि खेळाडूंना स्पोर्ट्स बॅग व प्रोटीन किटचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमानंतर शहरात भव्य बाइक रॅली काढून महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले.

# विदर्भ राज्य आंदोलन समितीने केली नागपूर कराराची होळी



**अचलपूर/प्रतिनिधीः-** विदर्भ राज्य आंदोलन समिती अचलपूर विभागाच्या वतीने २८ सप्टेंबर रोजी परतवाडा येथे विभागीय संपर्क प्रमुख बंटी केजरीवाल यांच्या नेतृत्वात नागपूर कराराची होळी करण्यात आली. आंदोलन करताना विदर्भ वाद्यांमध्ये आक्रोश दिसला. स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीसह अचलपूर जिल्हा निर्मितीच्या मागणीने जोर धरला आहे.स्वतंत्र विदर्भ झालाच पाहिजे असे विविध नारे विदर्भवादी कार्यकर्ते देत होते. यावेळी विभागीय संपर्क प्रमुख बंटी केजरीवाल , विदर्भवादी कार्यकर्ते रवि वानखडे , जिल्हा संपर्क प्रमुख नितीन यादव , शहराध्यक्ष तेजा धवने , राजु शनवारे , कालु झामरे , योगीराज ढोरे , समाधान मावस्कर , अमन मिश्रा , मधुकर कास्देकर , वेदांत बिजागरे यादी विदर्भवादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भारतरत्न द्या



## -गुरुदेव भक्तांचे आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, या मागणीसाठी गुरुदेव भक्तांनी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. येत्या २६ जानेवारी रोजी जाहीर होणाऱ्या भारतरत्न पुरस्काराच्या यादीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे नाव समाविष्ट करावे,राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामविकास, स्वच्छता, व्यसनमुक्ती, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करावा, अशी भूमिका गुरुदेव भक्तांनी

☞(पान २ वर)

### अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६

# विभागीय आयुक्त कार्यालयात तक्रार नियंत्रण कक्ष स्थापन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विभागीय स्तरावर तक्रार नियंत्रण/निवारण कक्ष विभागीय आयुक्त कार्यालयात स्थापन करण्यात आला आहे. तक्रारदारांना निवडणुकी संदर्भातील तक्रारींची नोंद प्रत्यक्ष तक्रार निवारण कक्षात तसेच ई-मेलद्वारेही करता येणार आहे. तक्रार निवारण कक्षाचा पत्ता नैसर्गिक आपत्ती कक्ष, पहिला माळा, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती असा असून तक्रारींसाठी ई-मेल: dycomm.amt@gmail.com आणि दूरध्वनी क्रमांक : ०७२१-२६६१३६४ असा आहे. यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. असे विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (आस्थापना) अमरावती विभाग, अमरावती यांनी कळविले आहे.